09-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

NTK/ 10:00

09-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

NTK/ MMP/ 10:00

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

पृ.शी.: राज्यात स्त्रीभ्रूण हत्यांचे वाढते प्रमाण

मु.शी.: राज्यात स्त्रीभ्रूण हत्यांचे वाढते प्रमाण या विषयावर सर्वश्री विनायक मेटे, सुभाष चव्हाण, अशोक उर्फ भाई जगताप, हेमंत टकले, राजन तेली, रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, मोहन जोशी, सतीश चव्हाण, उल्हास पवार, सुभाष भाईर, श्रीमती विद्या चव्हाण यांचा प्रस्ताव

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण घटत असणे, स्त्रीभ्रूण हत्यांचे वाढते प्रमाण, मुलगी नको या भावनेतून गर्भलिंग चाचणी करुन राज्यात दिवसाला सुमारे 150 मुलींचे घेण्यांत येत असलेले बळी, स्त्रीभ्रूण हत्या करण्याच्या प्रमाणात समाजातील उच्चभ्रू व सुशिक्षितांचा वाढत असलेला सहभाग, बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील गावांतील एका नाल्यांत तब्बल 9 स्त्री अर्भके सापडणे, राज्यात गर्भपातांच्या संख्येत झालेली दुप्पटीने वाढ, राज्यात दर हजारामागे मुलींचे प्रमाण 883 वर घसरणे, स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण असे वाढत गेल्यास समाजात मोठी विषमता निर्माण होण्याचा संभाव्य धोका, सोनोग्राफी पध्दतीचा गैरवापर करुन राज्यात मुलींना संपविण्याचे प्रकार सर्रास घडत असणे, स्त्रीभ्रूण हत्येचे वाढते प्रमाण आणि मुलींचा घटता जन्म दर याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करण्याची निर्माण झालेली परिस्थिती, गर्भलिंग चाचणी केंद्राविरुध्द धडक मोहिम हाती घेवून गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे राबवून यावर नियंत्रण ठेवण्याबाबत व स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारांत घेण्यात यावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, अनेक दिवसानंतर आज या प्रस्तावावर चर्चा होत असल्यामुळे त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो. अनेक दिवस कामकाजपत्रिकेवर हा प्रस्ताव दाखविण्यात येत होता. परंतु त्यावर आजपर्यंत चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा सुरु होण्यासाठी अनेक दिवस गेले आहेत. परंतु या चर्चेला वेळेच्या बाबतीत आपण बंधन घालू नये अशी मी सुरुवातीलाच विनंती करतो. मी सुरुवातीचा वक्ता असल्यामुळे मला अर्धा तास बोलण्याची परवानगी द्यावी.

सभापती महोदय, खरे तर स्त्रियांना या देशात खूप महत्व आहे हे मी वेगळे सांगण्याची गरज नाही. आपण जन्माला आल्याबरोबर आपल्याला प्रथम आईचे दर्शन होते. आईला आपण प्रत्येकजण प्रथम गुरु मानतो. एवढे अनन्य साधारण महत्व आईला आहे. अनेक गोष्टींमुळे महिलांचे स्थान अनेकांनी, अनेक ठिकाणी अधोरेखित केलेले आहे. "यत्र नारी, पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता:" जेथे स्त्रियांचा सन्मान केला जातो, त्यांची पूजा केली जाते त्याच ठिकाणी देवाचा वास असतो असे साधारणपणे म्हटले जाते. एवढे आपल्या हिंदुस्थानामध्ये, हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रियांना महत्व आहे, हे सगळयांना माहीत आहे. म्हणूनच लक्ष्मी, पार्वती, सरस्वती, आदिशक्ती या सगळयांना जगाची आपण जननी म्हणतो. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी." पुराणामध्ये सुध्दा स्त्रियांचे महत्व सांगितलेले आहे. ते आपल्या मनावर आपण बिंबवत असतो. असे असताना आपल्या मानसिकतेमध्ये एवढा बदल कसा झाला, यावर विचार करण्याची वेळ आली आहे. आज आपल्याला काय दिसत आहे ? आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये महिलांचे, स्त्रियांचे महत्व सांगितले जाते. परंतु आज महिलांना तेवढे महत्व, मान, सन्मान देण्याचे दूरच राहिले. एका बाजूला आपण प्रगती करीत आहोत, विकास करीत आहोत. नवीन गोष्टी पादाक्रांत करीत आहोत. दुसऱ्या बाजूला जी स्त्री आहे, जगाची जननी आहे, तिला जन्माला येण्यापूर्वीच नख लावण्याचे, तिला संपविण्याचे काम, तिला नष्ट करण्याचे काम आपण करीत आहोत. ही अमानुषता वरचेवर कशी वाढत चालली आहे, त्याच्यावर शासनाने कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. शासन आपल्या पातळीवर यासाठी प्रयत्न करीत असते. परंतु ते प्रयत्न निश्चितच अपुरे आहेत. कमकुवत आहेत. यामुळेच केवळ हा प्रश्न जटील, गंभीर व सामाजिक होऊ घातलेला आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, काल एक बातमी माझ्या वाचनात आली आहे. या बातमीला वर्तमानपत्रात ठळकपणे प्रसिध्दी देण्यात आली आहे. "हरियाणात एका मुलीस विकले" असे हेडींग आहे. नांदेड जिल्ह्यामधील कु.अन्नपूर्णा नावाच्या एका मुलीला तिच्या शेजारच्या ट्रक चालकाने व त्याच्या मैत्रिणीने हरियाणामध्ये नेऊन विकले आहे. त्याच्या तपासासाठी पोलीस गेले होते. हरियाणात आमचे पथक पोहोचले. त्या पोलिसांनी स्थानिक पोलिसांची मदत घेऊन आम्ही कु.अन्नपूर्णाला शोधून काढले. परंतु तिचे लग्न झाल्याचे समजले. तिला तेथे फसविण्यात आले होते. हे सत्य असले तरी तिच्या सासरच्या मंडळींचा यात दोष नाही. कारण त्यांनी तेथील रितीरिवाजाप्रमाणे, कायदा पाळून तिचे लग्न लावले आहे. तेथे मुलींची संख्या कमी असल्यामुळे असे प्रकार सर्रास चालतात त्यामुळे हा प्रश्न कायदेशीरपेक्षाही सामाजिक समस्या म्हणून महत्वाचा मानला पाहिजे व त्यावर उपाययोजना केली पाहिजे. हरियाणात जाऊन आल्यानंतर पोलीस निरीक्षकांनी आपले मत सांगितले आहे. हरियाणा राज्यात आज ही परिस्थिती उद्भवली आहे. हरियाणात लग्नासाठी मुली मिळत नाहीत.

आपल्या मराठवाड्यात, विदर्भात अशा अनेक केसेस झालेल्या आहेत. अनेक मुलींना पळवून नेण्यात आले आहे. पैसे देऊन त्यांना नेलेले आहे. या मुलींची लग्ने लावण्यात आली आहेत. ही परिस्थिती महाराष्ट्रात उद्भवलेली आहे. आज महाराष्ट्रात एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण किती आहे याची आकडेवारी मी देणार आहे. देशात एक हजार मुलांमागे मुलींची संख्या 914 इतकी आहे. राज्याचा विचार केला तर ही संख्या 883 आहे. जी 1991 साली 946 इतकी होती. 2001 मध्ये 913 होती आणि 2011 मध्ये 883 वर आली आहे. म्हणजे 10 वर्षात 30 ने कमी झाली आहे. यानंतर महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचा विचार केला तर सगळयात कमी मुलींची संख्या बीड जिल्ह्यात आहे. त्या जिल्ह्यात ही संख्या 801 इतकी आहे. 1991 मध्ये ही संख्या 939 इतकी होती. 2001 मध्ये 894 व 2011 मध्ये 801 वर पोहोचली आहे. म्हणजे जवळपास 100 ने कमी झाली आहे. सन 2021 पर्यंत ही संख्या कदाचित 700 पर्यंत पोहोचू शकते. तसेच तालुका घटक मानला तर बीड जिल्ह्यातील शिरुर कासार या तालुक्यात ही संख्या 750 इतकी आहे. ही संख्या गृहित धरली तर 2021 पर्यंत ही संख्या 125 ने कमी होण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनायक मेटे...

यावरुन पुढच्या वर्षामध्ये स्त्रियांचे प्रमाण हजारी 650 ते 625 इतके होईल. म्हणजे मुलांच्या प्रमाणामध्ये मुलींचे प्रमाणे हे 35 टक्के इतके राहील. मग अशा वेळी आपण काय करणार ? सामाजिक परिस्थिती काय होईल ?

सभापती महोदय, मी हरियाणाचे उदाहरण सांगितले. तीच परिस्थिती महाराष्ट्रामध्ये सुरु झालेली आहे. चार मुलामागे 1 मुलगी असेल तर एकाच मुलाचे लग्न होऊ शकेल. 25-30 टक्के मुलांची लग्ने होऊ शकली नाहीत तर किती अराजकता माजेल ? कोणतीही स्त्री घराच्या बाहेर पडू शकणार नाही आणि ती बाहेर पडली तरी सुखरुप घरी परतेल की नाही याची कोणी खात्री देऊ शकणार नाही. इतकेच काय कोणीही आपल्या घरच्या स्त्रियांना, मुलींना नातेवाईकाकडेही पाठवू शकणार नाही. कारण कोणीही कोणाचा भरवसा देऊ शकणार नाही. एवढी समाजामध्ये अराजकता माजेल, एवढ्या सामाजिक समस्या निर्माण होतील. हे जे मुलींचे प्रमाण कमी झालेले आहे ते वाढविण्याची नितांत गरज असून त्यानुषंगाने शासनाने विचार करण्याची गरज आहे. सभापती महोदय, अशा प्रकारची परिस्थिती का निर्माण झाली ? याला सामाजिक मानसिकता हे एक कारण पुढे येते. प्रत्येकाला वाटते की आपल्या वंशाचा दिवा पुढे तेवत राहिला पाहिजे. स्त्रिया देखील पुरुषांपेक्षा कर्तृत्ववान आहेत. जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, इतकेच काय तर आताच्या आपल्या देशाच्या राष्ट्रपती या देखील महिला आहेत. आशिया खंडातील अनेक स्त्रियांनी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात देदिप्यमान कामगिरी केलेली आहे. कुणी पंतप्रधान तर कुणी राष्ट्रपती झालेल्या आहेत. कल्पना चावला यांनी अवकाशात भरारी मारली आहे. अशा प्रकारे कर्तृत्व स्त्रियांमध्ये असून देखील वंशाला दिवा लागतो ही समाजाची मानसिकता बदले गरजेचे आहे. आपल्या आई-वडिलांना वेळेवर जेवण देखील न देणारे, त्यांची देखभाल न करणारे वंशाचे दिवे आपण पाहतो. तरी देखील वंशाच्या दिव्यासाठी अट्टाहास असतो. म्हणून समाजाची ही मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे. जोपर्यन्त ही मानसिकता बदलत नाही तोपर्यन्त स्त्रीभ्रूण हत्येला पायबंद बसणे कठीण होणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्येचे दुसरे कारण पुढे येते ते म्हणजे आर्थिक चणचण होय. अनेक कुटुबांना मुलांचे संगोपन करण्याची ऐपत नसते. त्यातच मुलगी झाली तर तिच्या लग्नाची चिंता असते. समाजामध्ये हुंडा देण्याची वाईट प्रवृत्ती अजूनही नष्ट झालेली नाही. तेव्हा ज्या कुटुंबाला आर्थिक चणचण असते अशा कुटुंबाची मुलगी नको अशीच मानसिकता असते. मी नाव न घेता आमच्या शिरुर तालुक्याचे एक उदाहरण देतो. आमच्या भागातील एका जिल्हाधिका-याने गर्भपात करुन घेतलेला आहे. म्हणजे शासकीय सेवेमध्ये उच्चपदावर असलेल्या अधिका-यांची जबाबदारी ही स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याची असताना हेच उच्च शिक्षित लोक असे वागत असतील तर जे अडाणी आणि अशिक्षित आहेत त्यांची मानसिक तशी होणे स्वाभाविक आहे. तेव्हा ही मानसिकता बदलण्यासाठी आर्थिक संपन्नता देखील असणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. स्त्रीभ्रूण हत्या होऊ नये यासाठी जिल्हाधिका-यांपासून, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक असे जवळपास 2 हजार जबाबदार अधिकारी काम करीत आहेत. एवढे सगळे अधिकारी काम करीत असताना देखील मुलींचा जन्मदर खाली का येत आहे ? याचे कारण असेही असू शकते की हे जे जबाबदार अधिकारी आहेत ते एक तर काम करीत नसावेत किंवा ते या सामाजिक प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष तरी करीत असावेत. या सामाजिक प्रश्नाच्या बाबतीत 2000 पेक्षा अधिक जबाबदार अधिकारी दुर्लक्ष करीत असतील तर ही बाब फार भयंकर आहे. तेव्हा या प्रश्नाच्या बाबतीत जे जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. त्याच प्रमाणे कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. मी या सामाजिक प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याशी चर्चा केली. आपण स्त्रीभ्रूण हत्या असे म्हणतो. म्हणजे यामध्ये एका जिवाची हत्या केली जाते. जर एखाद्या माणसाने एखाद्याचा खून केला तर त्याला 302 कलम लावले जाते. मग स्त्रीभ्रूण हत्या ही देखील एका जिवाची हत्या असल्यामुळे ती करणा-याला 302 कलम लावले पाहिजे. अशा प्रकारची सुधारणा कायद्यामध्ये झाली पाहिजे. कायद्याचा धाक आणि जरबच सामाजिक मानसिकतेमध्ये परिवर्तन घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरेल. तेव्हा जे गर्भपात करणारे डॉक्टर असतील, नवरा-बायको असतील त्यांच्यावर कलम 302 खाली गुन्हा दाखल केला पाहिजे. जोपर्यन्त ही सुधारणा करणार नाही तो पर्यन्त लोकांना वचक बसणार नाही. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे....

सभापती महोदय, मी मघाशी काही कारणांचा उल्लेख केला. कायदेशीरदृष्टया गर्भपाताची 5 कारणे सांगितली जातात. पहिले कारण, बाळंतपणामध्ये मातेच्या जिवाला धोका असेल तर गर्भपात करता येतो. दुसरे कारण, बाळाच्या जिवाला धोका असेल तर गर्भपात करता येतो. तिसरे कारण, मातेला मानसिक व शारीरिक धोका असेल तर गर्भपात करता येतो. चौथे कारण, जन्माला येणारे बाळ अपंग, व्यंग असेल तर गर्भपात करता येतो आणि पाचवे आणि सर्वात महत्वाचे कारण असे सांगितले जाते की गर्भनिरोधक साधने फेल गेली तर गर्भपात करता येतो. जवळ जवळ 75 टक्के गर्भपात गर्भनिरोधक साधने फेल गेल्याचे कारण पुढे करुन केले जातात. तेव्हा गर्भनिरोधक साधने फेल जाणे हे जे कारण पुढे केले जाते त्याबाबतीत पायबंद घालणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये 8 हजारापेक्षा जास्त सोनोग्राफी सेंटर्स आहेत आणि गर्भपात सेंटर्स वेगळे आहेत. माझे म्हणणे असे आहे की, हे सोनोग्राफी सेंटर कुणीही काढू शकतो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

एखादा हलवाई किंवा दूधवाला देखील असे केंद्र काढू शकतो. त्याला अजिबात बंधन नाही. मात्र असे केंद्र चालविणारी व्यक्ती ही त्या क्षेत्रातील तांत्रिकदृष्टया तज्ज्ञ असली पाहिजे असे बंधन आहे. परंतु अशी तांत्रिकदृष्टया तज्ज्ञ असलेली व्यक्ती किती ठिकाणी सेवा देऊ शकते याला कोणतही बंधन नाही. माझ्या माहितीनुसार एक व्यक्ती आठ ते दहा केंद्रांमध्ये सेवा देत असते. केवळ जिल्हयात नव्हे तर पर जिल्हयामध्ये त्यांची केंद्रे आहेत तेथे जाऊन सेवा देण्याचे काम केले जाते. केंद्र किती काढावी याला बंधन नाही, किती ठिकाणी सेवा द्यावी यालाही बंधन नाही. शासन जोपर्यंत या संदर्भात दुरुस्ती करणार नाही तोपर्यंत फारसा बदल होईल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, या राज्यात जवळपास 8 हजाराहून अधिक सोनोग्राफी केंद्रे आणि गर्भपात केंद्रे अस्तित्वात आहेत. परळी तालुक्याचे उदाहरण लक्षात घेतले तर त्या तालुक्याची लोकसंख्या लक्षात घेता तेथे किती केंद्रे असावीत याला बंधन नाही. परळी तालुक्यामध्ये तालुक्याच्या बाहेरील गावातून महिला गर्भपात करण्यासाठी येत असतात. किमान 20 ते 25 सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रे त्या तालुक्यात कार्यरत असून त्यांच्यावर किरकोळ कारवाई केली जाते. संपूर्ण महाराष्ट्रात या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी सुमारे 2 हजारपेक्षा जास्त अधिकारी वर्ग कार्यरत आहे. असे असताना मे-जून, 2011 मध्ये परळी येथे ज्या घटना उघडकीस आल्या त्यामुळे संपूर्ण परळी तालुका बदनाम झाला आहे. राज्यात इतरत्र अशा प्रकारच्या घटना घडत असतात, परंतु त्याची माहिती समोर येत नाही. जी भ्रूण हत्या केलेली अर्भके रस्त्याच्या कडेला, विहिरीत, नाल्यात फेकून दिली जातात. त्या अर्भकाचा उंदीर, घुशी, कुत्री फडशा पाडत असल्याची चित्रे आपल्याला प्रसिध्दी माध्यमाद्वारे पहावयास मिळतात, हे पाहून अतिशय वाईट वाटते. अशा प्रकरणात संबंधित डॉक्टर, पालक यांना कठोर शिक्षा देण्याबाबत शासनाने निश्चित विचार केला पाहिजे. राज्यातील सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांवर बंधन आणले पाहिजे. जोपर्यंत गर्भपात केंद्राच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाची नोंद शासकीय पातळीवर केली जात नाही तोपर्यंत अशा घटनांवर बंधन येणे कठीण आहे. हे करण्यासाठी अनेक गोष्टी पुढे आल्या आहेत.

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयामध्ये शासकीय यंत्रणेकडून या क्षेत्रात चांगल्या प्रकारचे काम झालेले आहे. तेथे शासनाला बऱ्यापैकी यश आलेले आहे. तेथील सोनोग्राफी केंद्रांमध्ये

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सायलेंट ऑब्झर्व्हर हे पुण्यातील एका कंपनीने तयार केलेले नवीन सॉफ्टवेअर वापरात आणले आहे. कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक सोनोग्राफी केंद्रामध्ये सायलेंट ऑब्झर्व्हर मशिन बसविण्यात आले आहे. त्याचा परिणाम असा झाला की, तेथील मुलींचे प्रमाण वाढण्यास मदत झाली आहे. कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा तालुका संपूर्ण राज्यात मुलींची संख्या कमी असलेला तालुका होता. आज त्या तालुक्यातील मुलींची संख्या वाढलेली दिसून येत आहे.

सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये अतिशय वाईट परिस्थिती आहे. पालकमंत्री लक्ष द्यायला तयार नाहीत. त्या जिल्हयात सोनोग्राफी केंद्रावर सायलेंट ऑब्झर्व्हर मशिन बसविले तर प्रत्येक प्रकरणाची शासकीय यंत्रणेकडे नोंद होईल. त्यात काही त्रुटी निश्चितपणे आहेत, परंतु त्या त्रुटी दूर करण्यासाठी आता ॲक्टिव्ह ट्रॅकर हा पर्याय समोर आला आहे. ॲक्टिव्ह ट्रॅकर बसविण्याचे काम शासनाने केले पाहिजे. त्यात कोणतीही अडचण येणार नाही. ॲक्टिव्ह ट्रॅकरचा पर्याय आपल्या राज्याने पुढे आणला. परंतु आपण त्याची योग्य ती दखल घ्यायला तयार नाही. अनेक दिवसापासून आरोग्य विभागात केवळ विचार सुरु आहे. प्रस्ताव तयार केला आहे, अधिकारी फक्त चर्चा करीत आहेत, फाईल एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे पाठविण्यात मग्न आहेत. सायलेंट ऑब्झर्व्हर आणि ॲक्टिव्ह ट्रॅकर मशिनचा वापर इतर राज्यांनी सुरु केला आहे. पंजाब, हरियाणा, ओरिसा आदी राज्यांनी महाराष्ट्राकडून बोध घेऊन प्रक्रिया सुरु केली आहे. परंतु आपले राज्य अद्याप झोपी गेले आहे. भ्रूणहत्या मात्र सुरुच आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. शासनाच्या वतीने ताबडतोब सायलेंट ऑब्झर्व्हर आणि ॲक्टिव्ह ट्रॅकर मशिन राज्यातील सोनोग्राफी केंद्र आणि गर्भपात केंद्रांमध्ये बसविणे नितांत गरजेचे आहे.

सभापती महोदय, सोनोग्राफी केंद्रामध्ये नाव नोंदणी करताना एफ फॉर्म भरुन द्यावा लागतो. त्या फॉर्ममध्ये नाव, गाव, वय, गर्भाचा काळ आदी गोष्टींची नोंद करावी लागते. त्यामुळे डॉक्टरांना पळवाटा काढता येत नाहीत. निश्चितपणे जोपर्यंत याची जबाबदारी फिक्स होत नाही तोपर्यंत या घटनांना पायबंद बसणार नाही. या गोष्टीला पायबंद घालण्यासाठी जी यंत्रणा आहे त्या यंत्रणांची नावे घेण्यामध्ये बराचसा वेळ निघून जाईल, त्यामुळे मी नावे वाचून दाखवू इच्छित नाही. परंतु आतापर्यंत किती लोकांना शिक्षा झाली याची माहिती घेतली तर केवळ 5 ते 10 लोकांना शिक्षा झाल्याचे दिसून येते. जबाबदार अधिकारी मग ते जिल्हाधिकारी असतील, आरोग्य

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकारी असतील, आरोग्य उपसंचालक असतील त्यांच्यावर जबाबदारी टाकणे गरजेचे आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे लोकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. प्रचार, प्रसार, भित्तीपत्रके, शॉर्ट फिल्मद्वारे लोकांची मानसिकता बदलण्याचा विचार केला पाहिजे. कायद्यामध्ये निश्चितपणे आवश्यक ते बदल केले पाहिजेत.

सभापती महोदय, आर्थिक बाबीची तरतूद केल्याशिवाय काही प्रगती होईल असे वाटत नाही. आज शासनाच्या विविध विभागांच्या योजना डीआरडीए यंत्रणेमार्फत राबविल्या जातात. ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना आर्थिक मदत दिली जाते. आज डीआरडीए यंत्रणेमध्ये कर्मचारी वर्ग अपुरा आहे. अशा गर्भवती महिलांसाठी आर्थिक योजना पुढे आणली तर निश्चितपणे त्याचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. बीड जिल्हयातील शिरुर कासार हा तालुका संपूर्ण राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे, त्या तालुक्यात मुलींचे प्रमाण 750 पर्यंत खाली गेले आहे. आम्ही तो संपूर्ण तालुका दत्तक घेणार आहोत. शासन काही करायला तयार नाही म्हणून दुर्दैवाने आम्हाला हे पाऊल उचलावे लागत आहे. तो संपूर्ण तालुका दत्तक घेतल्यानंतर त्या तालुक्यातील सर्व महिलांची वयोमानानुसार, अपत्यांनुसार सर्वे करुन वर्गीकरण करण्यात येईल आणि नंतर सर्व महिलांची वैद्यकीय तपासणी करुन ज्या गरोदर माता असतील त्यांची वेगळी माहिती संकलित केली जाईल. गरोदर मातांची प्रत्येक महिन्याला वैद्यकीय तपासणी करण्यासाठी डॉक्टरांचे पथक तयार केले आहे. वैद्यकीय तपासणी करीत असताना महिला भगिनींना व गर्भाच्या दृष्टीने जर काही वैद्यकीय उपचाराची गरज भासली तर मेडिकल ट्रिटमेंट सुध्दा दिली जाणार आहे. त्यांना आवश्यक असलेली औषधे पुरविली जाणार आहेत. नैसर्गिकरित्या गर्भपात घडून आला तर त्याला काही पर्याय नाही, परंतु स्वत:हून गर्भपात करु नये या दृष्टीने लक्ष दिले जाणार आहे. या कामासाठी गावागावात कार्यकर्ते तयार केले आहेत.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

आमची भगिनी बाळंत होऊन तिला मुलगी झाली तर त्या नवजात मुलीच्या नावाने 5 हजार रुपये डिपॉझिट वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत ठेवणार आहोत. तसेच यासंदर्भात आम्ही एलआयसी बरोबर चर्चा करीत आहोत. त्या माध्यमातून एकदम प्रिमीयम भरुन या मुलीला किमान एक लाख रुपये मिळावेत व मध्ये आजारी वगैरे पडली तर आजारपणाचा खर्च देखील त्यात कव्हर करता येईल काय असा विचार सुरु आहे. या योजनेचे नाव "अजात बालक सुरक्षा योजना" असे आहे. अशा प्रकारे ही योजना सुरु केल्यानंतर किमान पाच वर्षापर्यंत ती सुरु ठेवू व या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यातून किमान 1500 मुलींना तरी वाचविता येईल. त्याचबरोबर संपूर्ण जिल्ह्यात किती गरोदर महिला व त्यातून किती बाळंत झाल्या याची आकडेवारी जुळत नाही व ही तफावत रोखण्याचे काम जोपर्यंत आपली मानसिकता, आर्थिक सुबत्ता व कायद्याच्या माध्यमातून प्रयत्न होत नाही तोपर्यंत यावर रोख लावणे शक्य होणार नाही, हेही तितकेच खरे आहे. अशा प्रकारे आम्ही आमच्या परीने एक छोटासा प्रयत्न आमच्या तालुका व जिल्ह्यापुरता सुरु केला आहे.

महोदय, या निमित्ताने माझी अशी मागणी आहे शासनाने सुध्दा अशाच प्रकारचा कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबवावा. आपण डीआरडीएच्या माध्यमातून थोडीफार मदत करतोच पण त्याच्या पलीकडे जाऊन जोपर्यंत आपण पुरेपूर प्रयत्न करीत नाही तोपर्यंत अशा प्रवृत्तीला आळा बसणार नाही. तसेच यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली गेली पाहिजे. ही चर्चा खालच्या सभागृहात सुध्दा झाली, पण त्यानंतर वर्तमान पत्रातून जे वाचायला मिळाले त्यातून काही निष्पन्न झालेले नाही असेच मला वाटते. शासनाच्या माध्यमातून मे व जून महिन्यात राज्यातील सोनोग्राफी सेंटर्सवर फक्त धाडी टाकल्या जातात. त्याला माझी हरकत नाही पण अशा धाडी टाकून संबंधितांवर फक्त गुन्ह्यांची नोंद होते, त्यापलीकडे काहीच होत नाही, हे दुर्दैव आहे. बीड जिल्ह्याचे उदाहरण सांगायचे झाल्यास गेल्या पाच वर्षात फक्त 7 सोनोग्राफी सेंटर्सवर धाडी टाकण्यात आल्या. पण यासाठी जितके डॉक्टर्स आणि पालक जबाबदार आहेत तितकेच आरोग्य विभागाचे अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत, त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. बोलण्यासारखे बरेच काही आहे पण अद्याप अनेक सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावयाचे असल्याने मी माझे भाषण आटोपते घेतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, स्त्री भ्रूण हत्यांचे प्रमाण राज्यात वाढत आहे ही चिंतेची बाब आहे. या अनुषंगाने जो प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी सभागृहात चर्चेला आणला व या विषयाला वाचा फोडली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, भारताच्या संविधानाच्या माध्यमातून स्त्री-पुरुषांना समानतेचा अधिकार देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या जीवनात ऐतिहासिक क्रांती घडवून आणली. आदरणीय महात्माजी फुले यांनी स्त्रियांसाठी शिक्षणारी दारे खुली केली. समानतेचे धोरण राबविण्यामध्ये राजर्षी शाहू महाराजांचा मोठा वाटा आहे. आज स्त्रियांनी सर्व क्षेत्रात पदार्पण केले असून पुरुषांपेक्षा आम्ही कुठेही कमी नाही असे दाखवून दिले आहे. स्त्रियांनी आपली प्रगती झपाट्याने केली असली तरी आजही स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन पुरुष प्रधान संस्कृतीने बदलला नाही. स्त्री म्हणून माता, पत्नी किंवा बहीण चालते परंतु मुलगी नको, ही जनावरांपेक्षा हीन वृत्तीची माणसे समाजामध्ये आढळून येत आहेत. भारतीय संस्कृतीने इतिहासाने स्त्रियांचा आदर करुन गोडवे गाण्याचा प्रयत्न असला तरी त्याच समाजाने स्त्रियांना नेहमीच झिडकारले, नाकारले व स्वार्थासाठी तिचा वापर करुन तिला परावलंबी ठेवले. केवळ वंश वाढविण्यासाठी तिचा उपयोग राहिला. पुत्रप्राप्त होणे हे प्रतिष्ठेचे तर मुलगी जन्माला येणे हे कमीपणाचे व अप्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले. मुलगी हे परक्याचे धन, मुलीवर होणारा खर्च हा व्यर्थ आहे, अशी विकृत भावना येथील संस्कृतीने जोपासली व यातूनच मुलगी जन्माला येणे नकोसे वाटू लागले. मुलगा व्हावा व आपल्या कुळाचा वेल वाढवावा अशी प्रत्येकाची धारणा झाली व आजही ती अस्तित्वात आहे. मुलगी जन्माला येण्यापूर्वीच तिची गर्भात निर्दयीपणे हत्या करणारे आई-बाप ही जनावरांपेक्षा वाईट वृत्तीची माणसे आहेत. कारण जनावरांमध्ये सुध्दा अशी कृती करीत नाहीत. समाजातील सर्व स्तरातून मुलगाच हवा ही मानसिकता सर्वत्र समानच आढळते. आपल्याला मुलगा हवा की मुलगी या निवडीचा अधिकार वा मुलगाच हवा ही इच्छा कौटुंबिक किंवा खाजगी मानली तरी त्या हीन महत्वाकांक्षेतून त्या काही वर्षात भयंकर विकृत सामाजिक समस्येस आपण जन्म देत आहोत याची सुतराम कल्पना कोणत्याही सुसंस्कृत मनाला शिवत तर नाही, याउलट काही लोकांकडून त्याचे उघडपणे समर्थन केले जाते, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वैज्ञानिक प्रगतीने माणसाच्या हितासाठी व त्यांच्या स्वास्थ्यासाठी अनेक नवनवीन शोध लावले परंतु माणसाने या वैज्ञानिक शोधांचा वापर स्वार्थासाठी करुन घेतला आहे. गर्भातील बाळाची शारीरिक, मानसिक वाढ योग्य आहे की नाही हे बघण्यासाठी विज्ञानाने सोनोग्राफीचे यंत्र माणसाच्या हाती दिले. माणसाने मात्र या तंत्राचा गैरवापर करुन आपला स्वार्थ दाखवून दिला. या सोनोग्राफी तंत्राने बुध्दीमान डॉक्टर व स्वार्थांध आई-वडील यांनी संगनमताने गर्भातील बाळ मुलगा की मुलगी हे बघायला सुरुवात केली. मुलगी आहे हे समजल्यानंतर गर्भपात करुन त्या वाढणाऱ्या जिवाची निर्दयीपणे हत्या करण्यापर्यंत मजल गेली. आपण खुनी आहोत याची खंत ना डॉक्टरांना, ना त्या निष्पाप जिवाच्या आई-वडिलांना. याउलट सुशिक्षीत, सुसंस्कृत व खेड्यातील निरक्षर व्यक्ती सर्वच याला बळी पडले. सगळीकडे गर्भलिंग चाचणीचे पेव फुटले व त्या विरोधात अनेक सामाजिक संस्थांनी या चाचणीला विरोध केला. मुलींची संख्या आज समाजात कमी झाली तर त्याचा समाजावर मोठा परिणाम होईल.

स्त्री-भ्रृण हत्या व गर्भजल चाचणी हे जरी कायद्याने विहित केले असले तरी त्यातून अनेक पळवाटा सुध्दा शोधून काढल्या आहेत. मुळात कायद्यापेक्षा समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. आज पुरुषांच्या दर हजारी संख्येपेक्षा स्त्रियांची संख्या अत्यंत कमी आहे व दिवसागणिक ती कमी कमीच होत आहे. याकडे आपण समाजमन म्हणून दुर्लक्ष करणे समाजाच्या स्वास्थ्यासाठी विघातक आहे. मुलगा किंवा मुलगी हा भेद करणेच अयोग्य आहे. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, त्यानेच आई-वडिलांचे नाव चालवावे, घराणे पुढे न्यावे, त्यांना पाणी द्यावे, अशा खुळचट समजुती आजही भारतीय संस्कृतीला चिकटून बसल्या आहेत. केवळ पुत्र प्राप्तीसाठी बळी देणे व मुलींना मारुन टाकणारा समाज अत्यंत निर्दयी आहे. आज मुलीने प्रत्येक क्षेत्रात आघाडी घेतली आहे. स्त्री ही किती कर्तबगार आहे हे स्त्रियांनी विविध क्षेत्रात घेतलेल्या आघाडीतून दाखवून दिले आहे. आई-वडिलांची सेवा वृध्दापकाळात केवळ मुलगाच करु शकतो याला सुध्दा छेद दिला आहे. आज अनेक मुली आपल्या आई-वडिलांची सेवा अत्यंत चांगल्या प्रकारे करीत आहेत. अनेक उच्चपदस्थ, चांगले पगार घेणाऱ्यांचे आई-वडील मात्र अनाथाश्रमात आहेत. अनेक मुले आपल्या आई-वडिलांचा शारीरिक व मानसिक छळ करीत आहेत. हे आपण नेहमीच वृत्तपत्रातून वाचत असतो व आजुबाजूला बघतो किंवा ऐकत असतो, अशी अनेक उदाहरणे आहेत.

....4

श्रीमती दिप्ती चवधरी .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, माझे तर असे म्हणणे आहे की, अशा प्रकारे स्त्री-भ्रृण हत्या न करता, मुला-मुलींमध्ये कुठलाही भेद न करता मुलींनाही जगू द्या, त्यांना फुलू द्या, उमलू द्या. त्या सुध्दा आपले नाव निश्चितपणे उज्ज्वल करतील यात तिळमात्र शंका नाही. गर्भजल चाचणीच्या माध्यमातून मुलींची गर्भात हत्या करणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात लढा देऊन अशा खुनी नराधमांना कायदेशीर शासन करण्यास भाग पाडण्यासाठी आपण लोक जागृती करु.

महाराष्ट्रासारख्या प्रागतिक समजल्या जाणाऱ्या राज्यात दिवसेदिवस दर हजारी झपाट्याने मुलींची संख्या घटत आहे. तर पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराचे नाव देखील लिंग परीक्षणाच्या आणि नंतरच्या भ्रृण हत्यांच्या संदर्भात पुढे येत आहे. पुण्याच्या त्या विशिष्ट डॉक्टरांविरुध्द वीस-बावीस वर्षापूर्वीही याच कारणासाठी आंदोलन झाले होते, असे पुणेकर सांगत आहेत. पण त्याचे पुढे काय झाले ते मात्र कोणालाही माहीत नाही. संपूर्ण राज्यात, देशात मोठ-मोठे डॉक्टर्स गर्भ लिंग परीक्षा आजही करीत आहेत, हे खरेच आहे. पण त्या बरोबरच त्याविरुध्द अनेक जण आवाजही उठवित आहेत. कोणी आंदोलन चालवित आहेत तर कोणी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करीत आहेत, तर कोणी चित्रपट काढत आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

सभापती महोदय, अर्जुन जगधने हे गोरेगावच्या एका शाळेत शिक्षक होते तसेच त्यांचे काही समविचारी शिक्षक गर्भजलपरीक्षा आणि त्यानंतर होणा-या स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात खूप अस्वस्थ होते. हे चार शिक्षक एकत्र आले व त्यांनी अस्वस्थ करणा-या या विषयावर एक चित्रपट काढून जागृती करण्याचे ठरवले, चित्रपट काढावयाचा तर पहिली गरज अर्थात पैशाची असते. चित्रपट काढण्यासाठी शेकडो, हजाराचे नाही तर ते थेट कोटीचे कामच असते. या मंडळीनी आपली कल्पना अनेक लोकांसमोर मांडली आणि निधी गोळा केला. 22 लाख रुपये जमा झाले आणि ते जमा होता होताच त्यांनी कथानकावर काम करावयास सुरुवात केली. चित्रपटाचे नाव होते "सावित्रीच्या लेकी" दिग्दर्शक होते जालिंदर कुंभार. दोन मुली असलेल्या आणि म्हणूनच मांडलेल्या कुटुंबाची ही कथा, घराण्याला वारस हवा म्हणून पती पत्नीला सोनोग्राफी करावयाला लावतो, पण असते मुलगीच, तो तिला गोळया घेऊन गर्भपात करायला सांगतो, पण पत्नी तयार होत नाही, तिला तो घटस्फोट देतो, आणि पती दुसरे लग्न करतो. पत्नी वेगळी होते, दुस-या मुलीला जन्म देते, त्यांना वाढवते, हिंमत देते, आत्मविश्वास देते. एक मुलगी पोलीस दलात जाते, तर दुसरी पत्रकार होते. या मुली नाव कमावतात त्याच वेळी दुस-या पत्नीपासून झालेला मुलगा दिवे लावतो, तेव्हा मुलीच्या वडिलांना जाग येते.

सभापती महोदय, चित्रपट पूर्ण झाला पण काही मोजकी ठिकाणे सोडली तर तो इतरत्र रिलीजच होऊ शकला नाही. मुंबई-पुण्यात तर अजिबातच यश आले नाही. याचं कारण होते अर्थात आर्थिक अडचण, 22 लाख रुपये जमा झाले खरे पण त्यात चित्रपट पूर्ण कसा होणार ? काही जणांकडून नंतर पैसे घ्यावे लागले. यातील जे पाच शिक्षक होते त्यांना इंडस्ट्रीजचे गणित, त्यातल्या खाचाखोचा कशा कळणार ? त्यांच्याकडे एवढे पैसे तरी कुठून असणार ?

दरम्यानच्या काळात हा चित्रपट सुभाष घईंनी पाहिला आणि वितरणासाठी घेतला. त्यांनी दिलेल्या रकमेतून निर्मात्यांनी त्यांच्यावरचं देणं फेडले. काही पैसे कर भरण्यासाठी गेले. पुढे काहीच झाले नाही. चित्रपट तसाच पडून राहिला, गावागावात, शहराशहरात हा चित्रपट दाखवणे आवश्यक असतांना देखील हा चित्रपट आपल्यापर्यंत आलाच नाही. चित्रपट हे समाज प्रबोधनासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

अतिशय प्रभावी माध्यम आहे. माझी शासनाला विनंती आहे की, हा चित्रपट विकत घेऊन या चित्रपटाद्वारे समाज प्रबोधनाचे काम करावे तसेच स्त्रीभ्रूण हत्येविषयी जनजागृती करावी.

सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात मी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

..3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेला स्त्रीभ्रूण हत्येचा प्रस्ताव अतिशय गंभीर आहे. सन 2001 मध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्यामुळे शासनाने मोठया प्रमाणात पैसा खर्च करुन शासकीय कार्यक्रम हाती घेतला होता. सन 2010 मध्ये पुन्हा एकदा जनगणना झाली त्या जनगणनेमध्ये सुध्दा मुलींचा जन्म दर कमी असल्याचे आढळून आले. शासनाने मुलींचा जन्म दर वाढविण्यासाठी जे काही कार्यक्रम राबविले होते, जो काही खर्च केला होता तो कारणी लागला नाही असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. खरे म्हणजे वैद्यकीय अधिका-यांची मानसिकता मुलींचा जन्म दर वाढावा अशी नाही. कोणत्याही परिस्थितीत मुलगी नकोच असा अलिखित कायदा झाला आहे की, काय असे वाटावयास लागले आहे. संवेदन शून्य समाजाचाच हा परिणाम आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. सुशिक्षित असो की, अशिक्षित, गरीब असो की, श्रीमंत सगळेच फक्त मुलगा हवा अशीच मानसिकता घेऊन जन्माला आलेले आहेत की, काय असे वाटावयास लागले आहे. ही जी मानसिकता आहे ती बदलिवण्याची फार गरज आहे. काही डॉक्टरांनी तर हा व्यवसाय महत्वाचा मानून, पैसे कमावण्याचा मानून धंदा सुरु केलेला आहे.

सभापती महोदय, "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी", "लेक वाचवा", "मुलांपेक्षा मुलगी बरी", "प्रकाश देते घरोघरी" अशा प्रकारचे बोर्ड सगळीकडे लावण्यात आले. बोर्ड लावल्याने मानसिक प्रवृत्ती बदलते हा चुकीचा समज आहे. अधिका-यांनी फक्त बोर्ड लावण्याचेच काम केलेले आहे. प्रत्यक्षात मुलींचा जन्म दर वाढविण्यासाठी मानसिक प्रवृत्ती बदलावयास पाहिजे ती प्रवृत्ती बदलविण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. वैद्यकीय अधिका-यांनी केवळ बोर्ड लावून त्यामध्येच स्वतःचे समाधान करुन, आम्ही काम केले अशा प्रकारे ढोल पिटविण्यात आला.

सभापती महोदय, 10 वर्षामध्ये 4 लक्ष 68 हजार मुलींची हत्त्या केल्याचे आढळून आलेले आहे. शहराप्रमाणेच आता ग्रामीण भागातही सोनोग्राफी सेंटर्स उघडण्यात आलेले आहेत. गडचिरोली, नंदूरबार जिल्हयातील ग्राणीम भागातही सोनोग्राफी सेंटर्स उघडण्यात आलेली आहेत. दर दिवशी 150 मुलींची हत्त्या केली जात आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. मुलींचे घटते प्रमाण हा फार मोठा गहन प्रश्न आपल्या समोर उभा राहिलेला आहे. भविष्यामध्ये मुलांना मुलगीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

मिळाली नाही तर विकृती निर्माण होईल व त्यामुळे स्त्रियांना व मुलींना सांभाळणे कठीण जाणार आहे. मुलगी सांभाळणे कठीण असल्यामुळे मुलगी नको अशी प्रवृत्ती निर्माण झाली तर मात्र या राज्याचेच नाही तर या देशाचेही वाटोळे होण्यास काही वेळ लागणार नाही.

सभापती महोदय, मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाकडून मोठया प्रमाणात पैसा खर्च करण्यात आला परंतु त्याचा काही एक परिणाम झाला नाही कारण सर्व करुन सुध्दा मुलींचा जन्म दर कमी झालेला आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या गाडीवर लाल दिवा असतो, परंतु गाडीचा ड्रायव्हर मात्र तुम्हाला बुमरँग करतो. ड्रायव्हरचा गाडीच्या इंजिनवर पूर्ण कंट्रोल असल्यामुळे गाडी नादुरुस्त करण्याचे काम ड्रायव्हर करीत असल्यामुळे तुम्ही फसले जाता. ख-या अर्थाने ब्युरोक्रसी तुम्हाला बुमरँग करीत आहे केवळ तुम्ही गाडीत बसला म्हणून तुमची जबाबदारी असेल तर याबाबतही विचार करण्याची गरज आहे. अधिका-यांवर आपला अंकुश असण्याची आवश्यकता आहे.

सोनोग्राफी करताना पालकांकडून फॉर्म भरुन घेण्याची आवश्यकता असते परंतु तो भरुन घेतला जात नाही. या फॉर्ममध्ये मुली व मुले किती हे लिहिणे बंधनकारक आहे. त्यासाठी "एफ" फॉर्म भरणे आवश्यक असते. सोनोग्राफी करण्याच्या अगोदर जर अगोदर दोन मुली असतील तर तो फॉर्म सुध्दा पालकांनी संभाळून ठेवण्याची आवश्यकता आहे. मुले किती, मुली किती यासंदर्भात फॉर्म भरत असताना ही माहिती खोटी राहणार नाही याकरिता पालकांला हमी पत्र भरुन द्यावे लागत असते व ही सर्व माहिती दोन वर्षे सांभाळून ठेवावी लागत असते. ही माहिती खोटी आढळून आली तर डॉक्टरांना नव्हे पालकांना दोन वर्षाची शिक्षा तसेच दंड भरावा लागत असतो. परंतु कोणत्याही सोनोग्राफी सेंटर्समध्ये हा फॉर्म भरुन घेतला जात नाही हे दुर्दैव आहे. आरोग्य यंत्रणेने राज्यातील 16 जिल्हयात व 13 महानगरपालिकेत गर्भ लिंग निदान कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली नसल्याची ग्वाही दिलेली आहे. आरोग्य खात्याने यासंदर्भातील अपयश मान्य केलेले असल्यामुळे मुलींच्या संदर्भात अशा प्रकारचा रिझल्ट येणे स्वाभाविकच आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, यासंदर्भातील आपले कायदे प्रभावी आहेत परंतु कायदे राबविणारी यंत्रणा प्रभावी नसल्यामुळे हे सर्व प्रकार घडत आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. गर्भाला जन्माच्या आधी सुध्दा जगण्याचा हक्क असावा म्हणून 1860 मध्ये ब्रिटीश सरकारने प्रस्थापित केलेल्या इंडियन पिनल कोड कायद्या प्रमाणे जबरदस्तीने केलेल्या गर्भपाताची नोंद घेऊन गुन्हा म्हणून नोंद केला व कायद्याच्या कलम 312 ते 315 चा समावेश केला. परंतु त्या काळात अशा पध्दतीची गर्भपात करण्याची पध्दत नव्हती. त्या काळात बाईच्या जीवाला धोका असेल, मूल ॲबनॉर्मल असेल तरच गर्भपात करण्यास परवानगी दिली जात होती. या कायद्यांचा उपयोग झाला नसला तरी हे कायदे ब्रिटीश काळात सुध्दा लागू होते व आजही ते लागू आहेत.

सभापती महोदय, सन 1968 मध्ये भारत सरकारने प्रथमच स्त्री पुरुष जणगणनेत स्त्रियांच्या संख्येत मोठया घटीचे प्रमुख कारण स्त्रियांचे गर्भपातात होणारे मृत्यू हेच होते. 1968 मध्ये सर्वात प्रथम केंद्र सरकारने स्त्री आणि पुरुषांची वेगळी जणगणना करावयास सुरुवात केल्यामुळे स्त्रियांची संख्या कमी कशी झाली हे दिसून आले. काही राज्यामध्ये मुलगी जन्माला आल्या बरोबर तिला मारुन टाकले जाते. राजस्थान, हरियाणा, बिहार या राज्यामध्ये जन्मास आलेल्या मुलींचे मृत्यू झालेले आहेत. एका सिरियलमध्ये तर राजस्थानमधील मुलींचे चित्रच दाखवलेले आहे. मुली जन्माला येऊ नये अशा पध्दतीची ती सिरीयल आहे. मुलींचे प्रमाण सगळीकडे कमी होत असतांना केरळ राज्यामध्ये मुलींचे प्रमाण का वाढले ? केरळमध्ये 1000 पुरुषांमागे 1084 स्त्रियांचे प्रमाण आहे. केरळमध्ये व पांडेचरीमध्ये स्त्रीप्रधान राज्य पध्दती आहे. या राज्यामध्ये महिलांचे महत्व विशेष आहे. नवरा परणून जातो, नवरा घरजावई होतो त्यामुळे या दोन राज्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे याबाबत आपण विचार करण्याची आवश्यकता आहे.

गरिबी व विवाहाच्या सामाजिक रुढीने लग्नाला लागणारा पैसा व त्याची कमतरता ही कारणे असावीत असे मला मुळीच वाटत नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

याचे कारण असे आहे की, भारत सरकारने 1971 मध्ये मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी कायदा लागू केला. या कायद्यान्वये रजिस्टर्ड डॉक्टरांना फक्त गर्भपात करण्याचा अधिकार होता. जर स्त्रीला काही धोका असेल, मूल ॲबनॉर्मल असेल तरच डॉक्टरांना गर्भपात करण्याचा अधिकार होता. या कायद्यामध्ये नंतर बदल करण्यात आला.

सभापती महोदय, सन 1971 ते 1993 या काळात वैद्यकीय शास्त्र प्रगत झाले आणि सोनोग्राफी सेंटर उदयास आले. या सेंटर्सच्या माध्यमातून आपल्याला मुलगा आहे की मुलगी हे पाहता येत असल्यामुळे लोकांना फार आनंद झाला. जर मुलगी असेल तर गर्भपात करायचा आणि मुलगा असेल तर गर्भ वाढू द्यायचा अशी लोकांची मानसिकता झाली. वैज्ञानिकांनी शास्त्र पुढे नेले असले तरी त्यातील काय चांगले आहे आणि काय वाईट आहे याचा अभ्यास केला तर हे सेंटर एका बाजूने चांगले असले तरी ते दुसऱ्या बाजूने वाईट आहे, हे या ठिकाणी सिध्द झालेले आहे.

सन 1994 मध्ये या सर्व गोष्टींचा विचार करुन केंद्र शासनाने या कायद्यामध्ये पुन्हा काही बदल केले. द प्री कन्सेप्शन व प्री नेटल डायग्नोस्टीक (प्रोहिबिशन टेक्निक ऑफ सिलेक्शन) ॲक्ट लागू केला. या कायद्याची अंमलबजावणी बरोबर होते किंवा कसे यासाठी एक केंद्रीय निरीक्षक मंडळ स्थापन करण्यात आले. या कायद्यामध्ये प्रामुख्याने स्त्रीच्या जीवाचा धोका आणि गर्भाची नॉर्मलता हेच पाहण्यात आले. परंतु हे सर्व करीत असताना असे लक्षात आले की, या कायद्यामुळे देखील काही प्रभाव पडत नाही. हा कायदा लागू करुनही स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. म्हणून सन 2001 आणि 2003 मध्ये या कायद्यामध्ये आणखी सुधारणा करण्यात आल्या. परंतु भ्रष्टाचारामुळे काय परिणाम झाला हे आपण सर्वजण पाहत आहोत.

सभापती महोदय, आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, राज्यात एकूण 7939 गर्भपात सेंटर्स आहेत. यापैकी 6339 सेंटर्सची जून 2011 पर्यंत तपासणी झालेली आहे. तर फक्त 75 गर्भपात सेंटर्सची मान्यता रद्द करण्यात आली तर 276 सेंटर्सवर कारवाई करुन त्या सेंटर्सना सील ठोकण्यात आले. ठाणे, लातूर, नाशिक येथील काही सेंटर्स आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

सभापती महोदय, पोर्टेबल सोनोग्राफी हा एक महत्वाचा विषय आहे. राज्यात जवळपास एक हजाराच्या वर पोर्टेबल सोनोग्राफी सेंटर्स आहेत. या पोर्टेबल सोनोग्राफीमुळे गर्भात मुलगा आहे की मुलगी आहे हे पाहून मुलगी असेल तर गर्भपात करण्यात येतो. या पोर्टेबल सोनोग्राफीमुळे कोठेही गर्भपात करता येतो. तेव्हा प्रथम पोर्टेबल सोनोग्राफी सेंटर्स ताबडतोब बंद करावेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आपल्या कायद्यामध्ये कोणत्या तरतुदी आहेत त्या मी थोडक्यात सांगते. जर एखाद्याने पहिल्यांदाच गुन्हा केला असेल तर त्याला तीन वर्षाचा कारावास तसेच दहा हजार रुपये दंडाची शिक्षा अशी तरतूद आहे. तसेच त्याला तीन वर्षे सेंटर चालविता येणार नाही. दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास 7 वर्षाची शिक्षा आणि 50 हजार रुपये दंडाची शिक्षा आहे व डॉक्टरवर कायमची बंदी आहे. माझे असे म्हणणे आहे की, जे सोनोग्राफी करुन घेतात ते सुध्दा दोषी आहेत असे आपणास वाटत नाही काय? डॉक्टर ॲबॉर्शन करतात. परंतु असे कृत्य करण्यास त्याला भाग पाडणारे कोण आहेत, मग त्यामध्ये नवरा असेल, सासू-सासरे असतील, आपण त्यांना देखील जबाबदार धरणार की नाही ? त्यांच्यावर काही कारवाई करणार आहात की नाही ? याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण केलेल्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही याचे कारण म्हणजे केसच्या सुनावणीसाठी अधिकारी उपस्थित राहत नाहीत, तर मग केसचा निकाल कसा लागणार ? ज्या अधिकाऱ्याने केस केली तो केसच्या वेळी उपस्थित राहत नसेल तर मग ती केस मांडण्यात येत नाही. सरकारी वकील देखील प्रभावीपणे बाजू मांडत नाही. शासनाच्या प्रत्येक केसमध्ये असे दिसून आले आहे की, सरकारी वकील फार काही बोलत नाही आणि दुसऱ्या बाजूचे वकील केस जिंकून जातात. तीच परिस्थिती या बाबतीत आहे. अधिकारी केसच्या वेळी उपस्थित राहत नाही. सरकारी वकील प्रभावीपणे बाजू मांडत नाही. त्यामुळे आरोपीची सुटका होते. अधिकारी केसच्या वेळी का उपस्थित राहत नाही, तो मॅनेज होतो का, संबंधितांकडून पैसे घेतो काय ? त्याला प्रकरणाची गंभीरता कळत नाही काय ? याचाही विचार करण्याची आवश्यकता

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

आहे. तेव्हा सरकारी वकिलांना देखील प्रशिक्षण देण्याची गरज आहे. तारखेच्या वेळी सरकारी वकील उपस्थित राहत नसतील तर त्यांना सरकार वकील म्हणून का ठेवायचे ? आपण दुसऱ्या वकिलाची नियुक्ती करु शकता. महाराष्ट्रामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये असमानता निर्माण होणार असेल तर भविष्यातील धोके आपणास विचारात घेतले पाहिजेत. कायदा कितीही कडक असला तरी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली नाही तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक बाब नमूद करु इच्छिते की, रेडिओलॉजिस्टच्या प्रमाणपत्रा शिवाय सोनोग्राफी करता येत नाही. आपल्या राज्यात रेडिओलॉजिस्टची संख्या फार कमी आहे. औरंगाबादमध्ये एक प्रकरण उघडकीस आले होते की, एका सोनोग्राफी सेंटरने रेडिओलॉजिस्टचे पत्र घेतले आणि त्या पत्राच्या हजारो झेरॉक्स कॉपी करुन सोनोग्राफी केल्या. वास्तविक रेडिओलॉजिस्टचे पत्र किमान सहा महिने ठेवणे आवश्यक आहे. सोनोग्राफी रिपोर्टला रेडिओलॉजिस्टचे पत्र जोडले नसेल तर ती सोनोग्राफी अवैध ठरविली जाते. आपल्याकडे रेडिओलॉजिस्टची संख्या किती आहे हे माहीत नाही. ॲबॉर्शन करताना रेडिओलॉजिस्टचे पत्र जोडले आहे किंवा कसे हे पाहिले जात नाही. ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे असत्य रेकॉर्ड जोडण्याची प्रवृत्ती वाढू लागली आहे. आपण ज्या निरीक्षण समित्या केल्या, त्या कुठे गेल्या ? त्या समित्या हा रेकॉर्ड तपासत नाही काय ? "एफ फॉर्म" तपासत नाहीत काय ? रेडिओलॉजिस्टचे प्रमाणपत्र का तपासण्यात येत नाही ? औरंगाबाद येथे रेडिओलॉजिस्टने महानगरपालिकेला कळविले की, "माझे खोटे प्रमाणपत्र वापरुन मुलींची भ्रूणहत्या होत आहे. तेव्हा कृपया याबाबत चौकशी करावी." त्याप्रमाणे औरगांबादमध्ये मोठ्या प्रमाणावर सेंटर्सवर धाडी टाकण्यात आल्या. औरंगाबादमध्ये हे प्रकरण घडले मग आपण इतर जिल्ह्यांमध्ये का धाडी टाकल्या नाहीत ? कारवाई करण्यासाठी सरकारची देखील मानसिकता लागते. परंतु सरकार याबाबतीत उदासीन दिसत आहे. आपण कायदा केला म्हणजे आपल्याला यश आले असे म्हणता येणार नाही. तेव्हा जी बाब औरंगाबादमध्ये घडली ती राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्ये देखील घडू शकते. तेव्हा याबाबत लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

सभापती महोदय, या संदर्भात लोकांची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. एक "मातृभूमी" सिनेमा आहे. या सिनेमामध्ये स्त्रियांची संख्या कमी झाल्यानंतर काय परिस्थिती ओढवू शकते याचे चित्रीकरण आहे. स्त्रीची संख्या कमी झाल्यामुळे पुरुष कसे जनावरा प्रमाणे वागू शकतात हे देखील त्यामध्ये दाखविलेले आहे. आम्ही या चित्रपटातील काही क्लिपिंग घेऊन अर्ध्या तासाची सी.डी.तयार केली. ही सी.डी.महिला मंचाच्या माध्यमातून महिलांच्या मेळाव्यामध्ये दाखविण्यास सुरुवात केली. ही सी.डी. पाहिल्यास आपल्या देखील डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. माणसे रानटी जनावरासारखे वागायला लागली तर स्त्रियांना शेवटी जनावरांपेक्षा वाईट जीवन जगावे लागेल अशी परिस्थिती येईल. ही सर्व माहिती त्या सी.डी. दाखविलेली आहे. तेव्हा स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी आपण मातृभूमी हा सिनेमा गावोगावी दाखविला पाहिजे. आम्ही डॉक्टर्सना देखील ती सी.डी.दाखविली आणि आम्हाला मदत करण्याबाबत त्यांना सांगितले. याचा परिणाम असा झाला की, माझ्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मुलींच्या संख्येत वाढ झालेली आहे.

सभापती महोदय, मध्य प्रदेश सरकारने मुलींसाठी एक "लाडली" योजना राबविली आहे. ही योजना आपल्या राज्यात राबवावी अशी माझी विनंती आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार असो ज्या गोष्टी आपल्या फायद्याच्या आहेत त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे. या लाडली योजनेमध्ये मुलीच्या पहिल्या वाढदिवसाला दोन हजार रुपये देण्यात येतात. केवळ मुलींचा जन्म दर वाढवावयाचा नाही तर त्या बरोबर शैक्षणिक दर वाढवावयाचा आहे. या दृष्टीने ही योजना अतिशय चांगली आहे. जेव्हा मुलगी पाचवी इयत्ता पास होईल त्यावेळी तिला चार हजार रुपये दिले जातात. सातवी इयत्ता पास झाल्यानंतर तिला महिन्याला दोन हजार रुपये दिले जातात. मुलीने 21 व्या वर्षी लग्न केल्यानंतर तिला एक लाख रुपये देण्यात येतात. यासाठी अट म्हणजे तिने वयाच्या 18 वर्षी लग्न करु नये, तसेच ती किमान बारावी इयत्ता उत्तीर्ण असली पाहिजे. या अटींची पूर्तता केल्यास तिला वयाच्या 21 व्या वर्षी 1 लाख रुपये मिळतात. ही योजना फक्त दोन अपत्यांसाठी आहे. मध्य प्रदेशमध्ये या योजनेमुळे फार फायदा झालेला आहे. मध्य प्रदेश मध्ये ही योजना अतिशय प्रभावी ठरलेली आहे. तेव्हा महाराष्ट्रामध्ये देखील ही योजना राबवावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.सरफरे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

आपल्याला असा प्रश्न पडतो की, यासाठी आर्थिक तरतूद नसल्यामुळे आपण पैसे कोठून आणणार? आपण जेंडर बजेट मंजूर केले आहे, त्यामध्ये मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी आणि त्यांची सामाजिक, राजकीय प्रगती करण्यासाठी या बजेटचा वापर होणार आहे. जागतिक पातळीवरील, देशामधील आणि महाराष्ट्रामध्ये असलेल्या 50 टक्के स्त्रियांवर हे पैसे खर्च करावेत अशी अट आहे. त्या जेंडर बजेटचा लाभ या योजनेसाठी घेतल्यास आपल्याला आर्थिक अडचण येणार नाही. या सभागृहामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री बसले आहेत. त्यांना मला असे सांगावयाचे आहे की, जेंडर बजेटच्या माध्यमातून या योजनेचा लाभ महिलांना दिला तर मुलींचा जन्मदर वाढू शकेल आणि देश पातळीवर महाराष्ट्र राज्य या योजनेमध्ये यशस्वी ठरु शकेल एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नियम 260 अन्वये या सभागृहामध्ये प्रस्ताव आणला आहे हा या राज्यामधील नव्हे, देशामधील नव्हे तर दक्षिण आशियातील अतिशय महत्वपूर्ण असा प्रस्ताव आहे. या विषयावर आपण गेल्या 26 वर्षापासून सतत चर्चा ऐकत आहोत. समाज आपली मानसिकता बदलू इच्छित नाही आणि जर समाज मानसिकता बदलू इच्छित नसेल तर सरकारने समाजाची मानसिकता बदलण्यासाठी काम केले किंवा आपल्या सारख्या लोकप्रतिनिधींनी काम केले तरी त्याचा अजिबात परिणाम होत नाही. त्यामुळे सातत्याने मुलींचा जन्मदर घसरत चालला आहे हे त्यावरुन स्पष्ट होते. सभापती महोदय, पुणे येथे पी. एम. शहा फाऊंडेशन नावाची एक संस्था आहे. या संस्थेने पुणे महानगरपालिकेला अशी विनंती केली की, पीसीपीएनडी ॲक्टची कितपत अंमलबजावणी होत आहे हे पाहण्याकरिता पुणे शहरामध्ये जेवढी सोनोग्राफी सेंटर्स आहेत त्यांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी आपण आम्हाला परवानगी द्यावी. परंतु प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेने त्या संस्थेला आम्ही तुम्हाला सर्व्हे करण्यासाठी परवानगी देणार नाही असे सांगितले. एका बाजूला स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली पाहिजे असे पुणे महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी सांगतात आणि दुसऱ्या बाजूला या संस्थेला परवानगी दिली जात नाही. सभापती महोदय, बहुतेक ठिकाणी सोनोग्राफी सेंटरमधील डॉक्टर्सनी स्वत: ओळखपत्रे लावली पाहिजेत. त्यांनी फॉर्म भरतांना हा फॉर्म आपण कशासाठी भरीत आहोत हे गरोदर महिलेला सांगितले पाहिजे. इतकेच नव्हेतर संबंधित महिलेला स्पष्टपणे सांगून तिच्याकडून मान्यता पत्र घेणे अपेक्षित आहे. याबाबतच्या पहाणीमध्ये 68 टक्के घटनांमध्ये गर्भवती स्त्रीला फॉर्मची प्रत दिली नव्हती, 83 टक्के महिलांना ही तपासणी कशासाठी चालली आहे याची माहिती नव्हती. इतकेच नव्हे तर सोनोग्राफी सेंटर्सनी एफ फॉर्म भरल्यानंतर तो दर महिन्याच्या 5 तारखेपूर्वी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना द्यावयाचा असतो. प्रत्यक्षात सर्व सेंटरपैकी 67 टक्के सेंटर्सनी या कामासाठी नकार देवून आम्ही तुम्हाला फॉर्म दाखविणार नाही असे सांगितले आहे.

सभापती महोदय, मी आजच्या या प्रस्तावाचे तीन भाग करु इच्छिते. त्यापैकी पहिला भाग मानसिकता बदलण्याचा आहे. त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे एका तालुक्यामध्ये ही योजना राबविणार असून तेथील स्त्री गर्भ हत्या रोखण्याचा ते प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. असे सर्व्हेक्षण करतांना किंवा कार्यक्रम हाती घेतांना त्याला जर शास्त्रीय आधार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

दिला जात नसेल तर मधल्या काळात शिरुर तालुक्यातील महिला संभाजीनगर, बीड किंवा सोलापूरला जावून लिंग निदान तपासणी कशावरुन करुन घेणार नाहीत, त्यांच्या येण्या-जाण्यावर आपण बंदी घालणार काय, ही योजना आपण कशी अंमलात आणणार? या गोष्टी आपण संशोधकांकडून समजून घेतल्या पाहिजेत. लग्नाला जावयाचे आहे, किंवा दुसऱ्या कामासाठी जावयाचे आहे असे सांगून या महिला दुसऱ्या शहरामध्ये जावून गर्भ लिंग चाचणी करुन व गर्भपात करुन परत येतील. त्यामुळे आपण एका तालुक्यावर लक्ष केंद्रित करावयाचे ठरविले तरी त्यामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतील असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रियाताई सुळे यांच्याकडून यशवंतराव प्रतिष्ठानच्या वतीने मला आलेले एक पत्र माझ्याजवळ आहे. त्यामध्ये त्यांनी 25 ऑगस्ट ते 28 ऑगस्ट या दरम्यान "आधार हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा" या करिता जनजागरण यात्रा काढणार असल्याचे म्हटले आहे. त्यामध्ये आम्हा महिला आमदार व खासदारांना बोलाविले आहे. सभापती महोदय, मला असा प्रश्न पडतो की, सत्तेमध्ये असलेल्या लोकांकडे हा कार्यक्रम राबविण्याची क्षमता आहे, त्यांची मानसिकता बदलण्यासाठी अशाप्रकारचा कार्यक्रम घेणे चांगले आहे, त्या कार्यक्रमाचे मी स्वागत करते. या कार्यक्रमामुळे सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांचे किंवा सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रियाताई सुळे यांचे नाव झाले तर त्याचे आम्हाला दु:ख नाही. कोणत्याही माध्यमातून सूर्य उगवला आणि कोंबडा आरवला तरी हा सामाजिक प्रश्न सुटणे हे महत्वाचे आहे. या कायद्याच्या पाठीमागे राजकीय इच्छाशक्ती असली पाहिजे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी पीसीपीएनडी ॲक्टच्या अंमलबजावणीबाबत उत्तर दिले. त्यासाठी नियम 93 अन्वये दिलेली सूचना आम्हाला क्लब करण्यास सांगितले. विधानसभेमध्ये या चर्चेला मंत्रीमहोदयांनी दिलेले उत्तर आम्ही ऐकले आहे.. मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकरिता हा एक सुंदर थिसीस आहे, हा एक चांगला प्रबंध होईल. त्याची अंमलबजावणी करीत असताना ॲप्रोप्रिएट ॲथॉरिटी म्हणून फक्त महानगरपालिकेवर जबाबदारी टाकणे योग्य होणार नाही. आज सर्व महानगरपालिकांची रचना पाहिल्यानंतर त्यापुढे जावून आपण जिल्हा परिषदांवर ही जबाबदारी टाकावी असे म्हटले तरी ग्रामीण भागातील जिल्हा परिषदांची आरोग्य यंत्रणा कशी आहे हे आपल्याला माहीत आहे. ती व्यवस्था नीट नसल्यामुळे आज परळीला

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...
घडलेल्या घटनेचा सारखा उल्लेख होत आहे. परळीच्या नगरपालिकेची ती जबाबदारी आहे असे आपण म्हणत असतांना ती जबाबदारी ते पार पाडू शकले नाहीत हे सत्य आपण स्वीकारले पाहिजे. ते जबाबदारी स्वीकारु शकत नसतील तर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना फक्त नोडल ऑफिसर म्हणून नेमणे योग्य नाही.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये शिक्षण विषयक विधेयक मंजूर करण्यात आले आहे, त्या मधील तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी एफ.आय.आर. दाखल करणार आहेत. या ठिकाणी संस्थांनी स्टिंग ऑपरेशन करावे असे आपण त्यांना सांगत आहात. एखाद्या गरोदर महिलेला स्टिंग ऑपरेशनसाठी पाठविले जाते त्यावेळी दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यामध्ये किती मानसिक व शारीरिक त्रास होत आहे याचा कुणी विचार करीत आहे काय? ज्या महिलांना स्टिंग ऑपरेशनमध्ये सहभागी होण्यास सांगितले जाते त्यांना दिवसभर उपाशी बसवून ठेवलेले असते. पोलीस स्टेशनमध्ये जावून तक्रार केली तर मीडियावाले त्या महिलेच्या पाठी लागतात. त्यांना कितीही सांगितले तरी त्या महिलांचे पुन्हा पुन्हा चित्रण करतात व ते चॅनेलवर दाखवितात. अशा पध्दतीने त्या महिलेकडून स्टिंग ऑपरेशन करुन घेण्याऐवजी सर्व महानगरपालिका व शासकीय हॉस्पिटलमध्ये ज्या महिलेला पहिली मुलगी झाल्यानंतर दुसऱ्यांदा ती गरोदर राहते त्यावेळी त्या महिलेवर लक्ष केंद्रित करुन तिच्या बरोबर चर्चा करणे किंवा समुपदेशन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर तिच्या कुटुंबीयांचे सुध्दा समुपदेशन करणे फार आवश्यक आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर फक्त महिला आमदारांनी भाषण करण्याचा विषय नसून महिला व पुरुष सर्वांनी या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे. मी डॉक्टर म्हणून 12 वर्षे मराठवाडयात प्रॅक्टिस केली आहे. ज्यावेळी एखाद्या महिलेला कोणतेही औषध घेण्यास सांगितले जाते त्यावेळी ती आपल्या नवऱ्याच्या तोंडाकडे पहाते. ती आपल्या नवऱ्याला विचारते की, हे औषध मला परवडेल काय, मी हे औषध घेऊ काय? किंवा मी माझ्या नवऱ्याला विचारुन सांगते असे डॉक्टर्सना सांगते. अशाप्रकारे डॉक्टरकडे उपचार घेण्यासाठी गेलेल्या स्त्रियांचे उत्तर असेल तर फक्त स्त्रियांमध्ये जागृती आणून उपयोग होणार नाही तर पुरुष वर्गाला सुध्दा त्यामध्ये सहभागी करुन घेतले पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे काही जैन धर्मगुरुंनी या बाबत एक जागृतीचा कार्यक्रम घेतला होता व त्या ठिकाणी मला बोलाविले होते. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, यामध्ये रेडिऑलॉजिस्टवर आपण नियंत्रण ठेवले पाहिजे. सभापती महोदय, एके ठिकाणी करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

आलेल्या स्टिंग ऑपरेशन संदर्भात "मिरर" या वर्तमानपत्राने बातमी छापली होती. त्यामध्ये तीन महिन्याच्या आत लिंगनिदान केल्यानंतर त्या ठिकाणी मुलगी असल्याचे आढळले तर तिचा गर्भपात केला जातो. अशाप्रकारे चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या महिन्यात सुध्दा बेकायदेशीररित्या गर्भपात करुन व मुलींना मारुन त्यांची अर्भके टाकण्याचे प्रकार होतात. या करिता गर्भपातावर बंदी आणण्याबाबत सरकार विचार करीत असल्याचे वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. तसे नसेल तर शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी. याचे कारण असे की, 1981 सालापूर्वी गर्भपाताचा कायदा नव्हता, गर्भपात करण्यासाठी मान्यता घेण्याची प्रोसिजर नव्हती. त्यावेळी निवडुंग, पपया अशा वेगवेगळया वनस्पती खायला देऊन गर्भपात करण्याचे प्रकार गावो गावी होत होते. सातव्या, आठव्या महिन्यात स्वत:ला इजा करुन गर्भपात करुन जेलमध्ये गेलेल्या महिला आम्ही पाहिल्या आहेत. त्यामुळे गर्भपातावर आपल्याला सरसकट बंदी आणता येणार नाही. ज्याप्रमाणे आपण जन्मदर नोंदवितो त्याप्रमाणे जनगणनेच्या वेळी सुध्दा प्रत्येक नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये किती लहान मुले आढळली, त्यामध्ये मुलांची व मुलींची संख्या किती आहे? याची रजिस्ट्रारकडे नोंद झाली पाहिजे. जळगाव जिल्ह्यातील एका गावात नऊ वर्षाच्या आतील मुलींचे तीन आठवडयात विहिरीमध्ये पडून मृत्यू झाले. अशा घटनांमध्ये झालेल्या मृत्यूची नोंद नसते, त्याचप्रमाणे स्मशानामध्ये सुध्दा नोंद केली जात नाही. ती मुलगी बाहेरगावी गेली असल्याचे सांगितले जाते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून आपण ज्या भ्रूण हत्या म्हणतो, तेव्हा यामध्ये तीन महिन्याच्या आतील गर्भांचा होणारा गर्भपात, तसेच तीन महिन्यानंतर औषधांचा विचार न करता तसेच त्याचा स्त्रीच्या शरीरावर काय परिणाम होणार आहे याचा विचार न करता मुद्दाम सक्तीने घडविलेला गर्भपात आणि तिसरा प्रकार म्हणजे मूल जन्माला आल्याबरोबर त्याच्या तोंडावर उशी दाबून मारुन टाकणे आणि ती मेलेलीच होती अशा पध्दतीने होत असते. त्याच्यानंतर अपघात किंवा घातपाताने सुध्दा तीन वर्षाच्या, सहा वर्षाच्या मुलींचे घरातल्या घरात होणारे मृत्यू या सर्व बाबतीत विचार केला पाहिजे. ज्यांना पहिल्या मुली आहेत आणि जर ती महिला दुसऱ्यांना गर्भवती आहे त्यांच्यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे हा एक मुद्दा आहे.

सभापती महोदय, दुसरे म्हणजे जे लोक धर्माच्या बाबतीत किंवा संस्कारांच्या बाबतीत काम करीत आहेत, त्यांच्याशी चर्चा करुन लोकांमध्ये या विषयाच्या बाबतीत जागृती होऊ शकेल काय आणि अशा मार्गाचा उपयोग होत आहे की नाही हे देखील पहावयास पाहिजे. तसेच तिसरा भाग असा की, तुम्ही नेहमी शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन बोलावयास सुरुवात करता. पण प्रत्यक्षात अंमलबजावणीच्या बाबतीत काय होत आहे याकडे आपण जास्त लक्ष केंद्रीत केले पाहिजे. त्यादृष्टीने मला असे सुचवावयाचे आहे की, यासंबंधातील कायद्यासाठी जी कमिटी केलेली आहे, त्या कमिटीच्या बैठका होत नाहीत. श्रीमती वर्षा देशपांडे या त्यामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. त्या सरकारमध्ये थोड्या अप्रिय आहेत. परंतु मला असे वाटते की, जेव्हा कार्यकर्ता टोकाला जाऊन बोलू लागतो, याचे कारण जर कोणी त्याचे ऐकणारे नसेल तर माणूस सारखे तेच-तेच बोलू लागतो. म्हणून श्रीमती वर्षा देशपांडे यांच्यासारख्या कार्यकर्त्या आहेत, त्यांना शासनाने प्रत्येक जिल्ह्यामध्ये काम करण्यासाठी प्रोत्साहित करावयास पाहिजे. परळीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य मुद्दा मांडतील. पण मला असे वाटते की, परळी असो किंवा इतर कोणतीही नगरपालिका असो किंवा कोणतीही जिल्हा परिषद असो, याबाबतीत केवळ त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यापेक्षा आरोग्य विभागाच्या नोडल ऑफीसरनी या विषयाच्या संबंधात किती एफ.आय.आर. दाखल केले आहेत ते पाहिले पाहिजे आणि ज्याप्रमाणे कोठेवाडीच्या प्रकरणामध्ये संबंधितांना शिक्षा झालेली आहे, त्याप्रमाणे भ्रूण हत्येच्या बाबतीत एक-दोन केसेसमध्ये संबंधितांना दहा-दहा, वीस-वीस वर्षाची शिक्षा झाली तर मग आपोआप लोकांची मानसिकता बदलावयास सुरुवात होईल. जर

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

केवळ पदयात्रा काढून जन मानसिकता बदलली असती तर आपण खूप पुढे गेला असतो असे मला वाटते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)

एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सध्या याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण उपस्थित नाहीत म्हणून मी सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांना भाषण करण्यासाठी संधी देतो.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

उप सभापती : मी आज सभागृहातील सर्व महिला सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी संधी देणार आहे, त्यानंतर मग तुमचा विचार करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहालामध्ये ज्या प्रश्नाला वाचा फोडण्यात आलेली आहे, त्याबद्दल मी सभागृहाला आणि माननीय सभापतींना धन्यवाद देते.

सभापती महोदय, मी याठिकाणी सदरहू विषयाबाबत काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करते. आम्ही ज्या झाडावरच जन्माला आलो आणि ज्या झाडावर बसलो, ते झाड तोडण्याचा प्रयत्न समाज घटक करीत आहेत की काय अशा प्रकारचा चित्र दिसावे हे बरोबर नाही. शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये कल्याणच्या सुभेदाराची सून चांगल्या प्रकारचे आपले आयुष्य घालवू शकली. पण आज मातेच्या पोटातील गर्भ ओरडून सांगत आहे की, "आई,मला जगावयाचे आहे, मला मारु नको." हे कशाचे द्योतक आहे. याचा देखील विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला मुलगी नको तर वंशाला दिवा म्हणून मुलगाच हवा या भावनेतून गर्भलिंग चाचणीचे जे भूत उभे केले, त्यामुळे 2011 मध्ये 150 मुली महाराष्ट्रातून बाजूला केल्या. केवळ महाराष्ट्रातच नाही तर सर्व भागांचा विचार केला तर एकंदर 4 लाख 55 हजार 36 मुली अनैसर्गिक पध्दतीने गर्भामध्ये नष्ट करण्यात आल्याचे आढळून आले.

(सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण सभागृहामध्ये येतात.)

उप सभापती : मी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना सांगू इच्छितो की, मघाशी भाषण करण्यासाठी आपले नाव पुकारण्यात आले होते, परंतु आपण सदनामध्ये उपस्थित नव्हतात म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांना भाषण करण्यासाठी संधी दिलेली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ठीक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांचे भाषण झाल्यावर मला संधी देण्यात यावी.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना दुपारच्या सत्रामध्ये भाषण करण्यासाठी संधी दिली जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, आठ राज्यांमध्ये 7800 सोनोग्राफी सेंटर आहेत. सोनोग्राफी सेंटरमध्ये .....

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे (खाली बसून) : महिलांनी महिलांचे ऐकावे. ....

उप सभापती : सन्माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांनी शांत चित्ताने ऐकावे. मध्येच उठून जाऊ नका.

(सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे खाली बसून बोलतात.)

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छिते की, मी त्यांच्या विरोधात बोलणार नाही. पण त्यांनी कृपा करुन मध्ये-मध्ये बोलू नये. मी तुमचे दु:ख समजू शकते. कारण बीड आणि तेथील परिसरामध्ये जो काही प्रकार झाला, त्यातून हे सगळे निर्माण झाले. मी त्याबद्दल काही म्हणणार नाही. तो तुमचा प्रश्न आहे.

श्री.कपिल पाटील (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांना असे वाटले की, बीडचा उल्लेख केल्यामुळे ते दु:खी झाले. पण तसे नाही, त्यांना बरे वाटत आहे. तुमच्याकडे चुकीची माहिती दिसते.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपले भाषण सुरु करावे. इतर सन्माननीय सदस्य आपल्याला डिस्टर्ब करीत आहेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी त्या सर्वांचे दु:ख समजू शकते. या विषयाला वाचा फोडत असताना मला असे सांगावयाचे आहे की, मुलीच्या जन्माचे स्वागत करण्याऐवजी आपण त्यांचा दुश्वास करु लागलो. जर आमच्या सारख्या स्त्रिया कोणाच्या मुली नसत्या आणि आमच्या पालकांनी आम्हाला ताकदीने उभे केले नसते तर कदाचित या सभागृहाचे देखील दर्शन झाले नसते असे मला वाटते. म्हणून याठिकाणी दोन-चार मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, लग्न झाल्यानंतर खेडेगाव असू दे किंवा शहर असू दे, लग्नाचे रजिस्ट्रेशन करावे लागते. मग कोणत्याही समाजामध्ये लग्न झालेले असले तरी रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे आणि तसे कायद्यात आहे असे मी मानते, जर तसे नसेल तर सरकारने शोधण्याचा प्रयत्न करावा. पण मला असे सुचवावयाचे आहे की, जेव्हा आपण रजिस्ट्रेशन करतो, त्या अर्जामध्ये एक कॉलम घालण्यात यावा आणि त्यामध्ये नमूद करावे की, "मला दोन मुले हवीत किंवा तीन मुले हवीत. पण जर तीनही मुली झाल्या तरी मी त्यांना मारुन टाकणार नाही"आणि तसे काही झाल्याचे

श्रीमती अलका देसाई . . ..

सरकारला आढळले तर आमच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी "तीन" वगैरे असे म्हणू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नये. दोन मुलांपेक्षा जास्त मुले असतील तर निवडणुकीला उभे रहाता येत नाही असा नियम आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, जर दोन मुली असतील तर त्यांना मारुन टाकणार नाही ....

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना चांगला सल्ला दिलेला आहे की, तीन मुली असल्या तरी तुम्हाला त्या सांभाळल्या पाहिजेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, तीन मुली असल्या तरी सांभाळल्या पाहिजे आणि जर त्या मुलींना सांभाळण्यात आले नाही तर आमच्यावर सरकारने कायदेशीर कारवाई करावी अशा प्रकारे सदरहू अर्जामध्ये कॉलम टाकण्यात यावा. मग तो कोणताही समाज असू दे, त्याला ही बाब अपवाद रहाणार नाही आणि हे एका गायनॉकॉजिस्टचे मत आहे आणि त्यांनी असे सांगितले की, चर्चेच्या वेळी हा मुद्दा सुचविण्यात यावा आणि तसा बदल करुन घ्यावा.

सभापती महोदय, आणखी दोन मुद्दे सुचवून मी माझे भाषण संपविणार आहे. नागपंचमी सारखा सण आला की मग आम्ही मुली लहान असताना परकर-पोलका घालून इकडे-तिकडे बागडत असू. आज नागपंचमीच्या सणाच्या दिवशी नागाला दूध पाजतो पण भ्रुणहत्त्येसारखा विषय मुलींच्या जीवावर बेतला आहे याचे शोभाताई दु:ख होते. त्याचे कारण असे आहे की, आजच्या पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्री जन्माकडे पहाण्याचा जो दृष्टीकोन आहे तो बदलला आहे. जर आपण एखाद्या श्रीमंती थाटातील लग्नाला गेल्यानंतर, मी माझ्या मुलीचे लग्न देखील असेच करु काय किंवा माझ्या मुलाचे लग्न असेच करु काय अशा प्रकारे विचार करण्याची प्रवृत्ती वाढीला लागली आहे. त्यामधून एक मुलगी पाहिजे की मुलगीच नको अशा प्रकारचा विचार करण्याच्या दृष्टीने संदेश गेलेला आहे आणि तो बदलण्याची तुम्हाला-आम्हाला गरज आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आज पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये असेही पहावयास मिळते की, जर घरामध्ये सासुबाई असतील आणि जर सुनेला दुसरी मुलगी झाली तर त्या सासुबाई सुनेकडे फार चांगल्या प्रकारे बघतात असे मला म्हणावयाचे नाही. आपल्या वंशाला दिवा का नाही ? अशा प्रकारचे विचार

श्रीमती अलका देसाई . . . .

संपूर्ण समाजामध्ये पहावयास मिळते आणि त्यातून मुलीचा जन्मदर कमी करीत आहोत हे मला सांगावयाचे आहे. 1991 च्या जनगणनेमध्ये दरहजारी मुलींचा जन्मदर 945 होता. पण 2001 ते 2011 पर्यंत आपण 883 पर्यंत खाली आलो आहोत. हे कशाचे द्योतक आहे याची तपासणी करण्याची वेळ आली आहे. सरकारी यंत्रणा याच्यामध्ये कुठे कमी पडत आहे काय? जर सरकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यंत्रणा कमी पडत असेल तर मग सरकारची जबाबदारी काय आहे?तसेच आमच्याप्रमाणे सामाजिक बांधिलकी घेऊन काम करणाऱ्यांची देखील यामध्ये जबाबदारी असेल असे मला सुचवावयाचे आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

मुलींचा जन्मदर जर कमी झाला तर आपल्याला या सगळ्या गोष्टींमध्ये पुढे जाता येणार नाही. स्त्री काय करणार आहे, त्या बाईला काय कळते, असे लोक सहज बोलून जातात. परंतु ज्या महाराष्ट्रामध्ये सावित्रीबाई फुलेंचा जन्म झाला, ज्या देशामध्ये आपल्याला राणी लक्ष्मीबाई लाभल्या, ज्या देशामध्ये आपल्याला इंदिरा गांधी यांच्यासारखे सक्षम नेतृत्व लाभले...

श्री. दिवाकर रावते : आपल्याला जिजामाता आठवली नाही का ?

श्रीमती अलका देसाई : आपण मला पुढे बोलू द्यावे. अजून माझे बोलणे संपलेले नाही. आपण अजिबात दु:खी होऊ नका. मी असा प्रपंच करणार नाही. ज्या जिजाऊने आपल्या कणखर नेतृत्वाखाली या महाराष्ट्राला शिवाजी महाराज दिले त्या महाराष्ट्रामध्ये आपण मुलींना कमी लेखतो हा आपला करंटेपणा आहे. हा करंटेपणा जर थांबवावयाचा असेल तर मुलींचा जो जन्मदर कमी होत आहे तो दर वाढवून समान पातळीवर आणून ठेवावा लागेल. सन्माननीय सदस्या ताईंनी एका चित्रपटाच्या बाबतीत सांगितले की, तो चित्रपट बघा आणि त्यातून काय निष्पन्न होते ते बघा. मी फार विवेचन करणार नाही पण सामाजिक असमतोल बिघडला तर समाजामध्ये एक वेगळ्या तऱ्हेचा मेसेज जाईल. समाजामध्ये वेगळ्या प्रकारचे वातावरण निर्माण होईल आणि मग त्या वातावरणाला कोण सांभाळणार आहे, हे देखील बघण्याची गरज आहे. त्यामुळे आपण या बाबतीत अत्यंत जबाबदारीने काम केले पाहिजे. पैसे घेणाऱ्या डॉक्टरांवर सुध्दा आपल्याला ब्रेक लावावा लागेल. पैशाच्या आशेने 16-16 मुलींचा गर्भपात करुन त्यांना पाण्यामध्ये टाकून दिले जाते. हा फक्त पैशाचाच मोह आहे. डॉक्टरांनी हा मोह कोठे तरी कमी करावा अशी मी त्यांना या माध्यमातून सूचना करते आणि माझे भाषण संपविते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, हा विषय नुसताच गंभीर नाही तर प्रत्येक महिलेला अतिशय दु:खी करणारा आहे. आज प्रत्येक घराघरामध्ये जी मुलगी आहे ती फुलपाखरासारखी बागडणारी एक चिमुकली, दादाच्या बरोबरीने हट्ट करणारी, मनासारखे नाही झाले तर रागावून बसणारी, आई-आजीला घरकामात मदत करणारी, डोकं चेपून देऊ का गं, बरं वाटत नाही का, असे प्रेमाने विचारणारी, दादाच्या हातावर राखी बांधणारी, दिवसरात्र अभ्यास करुन दादापेक्षाही जास्त गुण मिळविणारी, मेडिकल-इंजिनियरींगला ॲडमिशन घेणारी, अशी ही आपली शहरी कन्या आहे. शेतात आईसोबत राबणारी, घरातील चुलीला फुंकर मारुन भाकरी थापणारी, आपली लहानगी भावंड सांभाळणारी, घर अंगण सारवून सणवार सांभाळणारी गावातील पोर अचानक नकोशी का होते, हा सगळ्यात महत्वाचा प्रश्न आहे. आज घरातल्या मुलीचे जे स्थान आहे ते खूप महत्वाचे असून सुध्दा एक मुलगी आहे आणि त्यानंतर दुसरी मुलगी झाली, पुन्हा तिसरीही मुलगी झाली तर तिला संपविण्याचे कटकारस्थान आपल्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये होत आहे. ज्यावेळी एक मुलगी मोठी होते, तरुण होते तेव्हा आई-वडील तिचे लग्न करुन देतात, आपले आवडते घर आणि प्रेमळ माणसे सोडून ती माप ओलांडून दुसऱ्या घरामध्ये जाते. ज्या घरातील लोकांशी संबंध नसतो, परिचय नसतो अशा लोकांबरोबर ती स्वत:ला ॲडजस्ट करुन घेते. प्रत्येक गोष्टीत तिला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, तोंड द्यावे लागते. परंतु ती कधीही त्याचे दु:ख करत नाही. ज्यावेळी तिला असे कळते की आपण गर्भवती आहोत, आपल्याला बाळ होणार आहे तेव्हा तिचे सबंध अंग मोहरुन जाते आणि तिला असे वाटते की, आता मला मूलं होणार. नंतर ती आई होते. मुलगी झाली तर घरातील सर्वांच्या कपाळावर आठ्या पडतात, नाके मुरडली जातात आणि मुलगा झाला तर पेढे वाटले जातात. हे जे मुलीला नाकारणे आहे, मुलगी झाली म्हणजे काही तरी भयंकर झालेले आहे आणि मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आहे अशी जी मानसिकता आपल्या संपूर्ण समाजाची झालेली आहे ती कोठे तरी बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये माता, भगिनी, पत्नी हवी असते परंतु मुलगी मात्र नकोशी असते. आपण देवी म्हणतो, दुर्गा म्हणतो आणि लक्ष्मी म्हणून पूजाही करतो पण आपल्या घरात मुलगी झाली तर आपल्याला असे वाटते की, आता कोठल्या तरी डॉक्टरकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

गेले पाहिजे आणि आपल्या बायकोची तपासणी करुन घेतली पाहिजे. आपण या ठिकाणी फक्त महिला सन्माननीय सदस्यांनाच बोलावयास सांगितले आहे ते चुकीचे आहे.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मी महिला सदस्यांना प्राथम्य दिलेले आहे. मी कोणत्याही सन्माननीय सदस्याला नकार दिलेला नाही. त्यामुळे चुकीचे रेकॉर्डवर जाऊ नये. या सभागृहामध्ये पुरुष सदस्य सर्वाधिक संख्येने आहेत. आपल्याला बोलावयास मिळत नाही म्हणून आपण वारंवार तक्रारी करीत असता. म्हणून मी असे ठरविले की, स्त्रीभ्रूण हत्येच्या विषयावर पहिल्यांदा महिला सदस्यांना बोलू द्यावे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी प्रस्ताव मांडून भाषण केले. त्यानंतर मी महिला सदस्यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया गैरसमज करुन घेऊ नये आणि दुसऱ्यांचाही करु नये.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला तसे म्हणावयाचे नव्हते. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, गेले अनेक दिवस ही चर्चा सातत्याने पुढे ढकलली गेली आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. सभागृहामध्ये सगळेच विषय महत्वाचे असतात परंतु हा विषय फार महत्वाचा आहे म्हणून मी आपल्याला सांगितले. आज आपली अशी समजूत का झाली आहे की, मुलगाच फक्त वंशाचा दिवा आहे ? आज आपण विज्ञान युगात राहतो. आपल्या दैनंदिन जीवनातील सर्वच क्षेत्र विज्ञानाने व्यापलेले आहे. एकही क्षेत्र असे नाही की, ज्या ठिकाणी विज्ञानाचा वापर केला जात नाही. विज्ञानाशिवाय आता आपल्याला पुढे जाता येत नाही. पण विज्ञानालाही मर्यादा असतात. विज्ञानाच्या सहाय्याने टेस्टट्यूब बेबीही निर्माण करणे शक्य झाले. उद्या आणखी प्रगती हाईल, आणखी काही तरी दुसरे शोध लागतील. आजचा हा विषय असाच मानवतेला वाचविण्याचा आहे. 1975 पासून गर्भजल परीक्षा सुरु झाली. आईच्या पोटात असलेले बाळ निरोगी आहे की त्याला काही विकार वगैरे आहे याची तपासणी करण्यासाठी सोनोग्राफी मशिनचा वापर करण्यात आला. आईच्या पोटातील बाळ निरोगी आहे की नाही याची खात्री करुन घेण्यासाठी सोनोग्राफीचा वापर केला जातो. जीवदान देणे ही डॉक्टरांची नैतिक जबाबदारी असते. मुलगी नकोशी वाटणाऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

कुटुंबाकडून पैसे घेऊन मुलींची हत्या करुन देणे अशा पध्दतीने हा डॉक्टरी पेशा अनेक वर्षापासून पैसे कमाविण्याचा धंदा झालेला आहे. पण आता तर पैशासाठी गर्भातच मुलींची हत्या करण्यामध्ये काही गैर करतो असे डॉक्टरांनाही वाटत नाही. रेडिऑलॉजिस्ट असल्याशिवाय सोनोग्राफी करण्याची परवानगी नाही परंतु एकट्या औरंगाबाद शहरामध्ये 214 सोनोग्राफी केंद्र आहेत आणि शहरात फक्त 51 रेडिऑलॉजिस्ट आहेत. त्यांच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स करुन सोनोग्राफी केंद्रात वापरली जाते आणि त्यांच्या नावावर चाचण्या केल्या जातात. औरंगाबादच्या रेडिऑलॉजिस्टने महानगरपालिकेकडे या बाबतीत तक्रार सुध्दा केली आहे. आज राज्यात 7939 सोनोग्राफी मशिन्स आहेत. सोनोग्राफी मशिन्स फक्त शासकीय व महानगरपालिकांच्या रुग्णालयातच बसविण्यास हरकत नाही.

सभापती महोदय, मला या ठिकाणी अशी सूचना कराविशी वाटते की, आज खाजगी डॉक्टरांकडे सोनोग्राफी मशिन्स आहेत आणि त्या ठिकाणी मुलगी असली तर गर्भपाताचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे अशा चाचण्या खाजगी रीतीने करण्यापेक्षा त्या शासकीय किंवा महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये केल्या तर ते फार सयुक्तिक होईल. मुलगी नकोशी आणि वंशाला दिवा म्हणून मुलगा हवा. महाराष्ट्रात दिवसाला सुमारे 150 मुलींना संपविले जाते. 2011 च्या जनगणनेत पुरोगामी महाराष्ट्रात 4 लाख 55 हजार 36 इतक्या मुली मारल्या गेल्या. याची जबाबदारी आरोग्य विभागाचे सचिव आणि आरोग्य मंत्री यांनी घ्यावयास पाहिजे. 2001 पासून 2011 पर्यंत 7939 सोनोग्राफी मशिन्सच्या माध्यमातून खुलेआम स्वत: व्यवसाय करीत आहेत आणि आपण आज खडबडून जागे झालेलो आहोत. सगळ्यात दुर्दैवाची गोष्ट ही आहे की, गेल्या 11 वर्षामध्ये सर्वसामान्य माणसांना माहीत आहे की, या ठिकाणी अशा प्रकारे स्त्रीभ्रूण हत्या होत आहेत

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

परंतु आमच्या शासनाला, आमच्या सन्माननीय आरोग्य मंत्र्यांना त्याची काहीही कल्पना नाही ही सगळयात दुर्दैवी गोष्ट आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना मी विचारु इच्छितो की, आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला आणखी 10 मिनिटांचा वेळ लागणार आहे.

उप सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांचे भाषण अपूर्ण आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.30 ते 11.45 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय सभापती

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

सभापती : माझ्याकडे सकाळी 9 वाजून 8 मिनिटांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, संजय केळकर, डॉ. रणजित पाटील, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, सय्यद पाशा पटेल, धनंजय मुंडे, रामनाथ मोते या सन्माननीय सदस्यांनी ही सूचना दिलेली आहे. "शासनाने दिनांक 1 एप्रिल 2011 पासून उपभोग, उपयोग किंवा विक्रीसाठी सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, वसई-विरार या शहराच्या नागरिकांवर स्थानिक संस्थाकर (एल.बी.टी.) लागू करणे, राज्यात सन 2005 साली मूल्यवर्धित कर (व्हॅट) लागू करते वेळी इतर कोणताही कर लागू करणार नाही असे शासनाने दिलेले आश्वासन" या संबंधीचा नियम 289च्या प्रस्तावाची सूचना आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या संदर्भात एक-दोन मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2005 साली या राज्यात मूल्यवर्धित कर (व्हॅट) लागू करते वेळी इतर कोणताही कर लागू करणार नाही असे आश्वासन शासनाने दिलेले असताना एल.बी.टी. लागू करण्यात आलेला आहे. उपयोग, उपभोग किंवा विक्रीसाठी सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, वसई-विरार या शहराच्या नागरिकांवर स्थानिक संस्थाकर लागू करण्यात आलेला आहे. हा स्थानिक संस्थाकर लागू केल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये 5 ते 10 टक्के वाढ झालेली आहे. या कराचा अंतिम बोजा सर्वसामान्य माणसावर पडलेला आहे. आज "ड" वर्ग नगरपालिकेतील व्यापा-यांनी राज्यभर बंद पुकारलेला आहे. हा जनसामान्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळयाचा प्रश्न आहे. या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. ही सूचना मान्य करावी अशी मी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील "ड" वर्ग नगरपालिकांमध्ये आज व्यापा-यांनी बंद पुकारलेला आहे. सरकारने हा जो एलबीटी लावलेला आहे त्या विरुद्ध व्यापा-यांनी आणि जनतेने निदर्शने केलेली आहेत. त्यांचे प्रतिनिधीत्व करणारा हा आजचा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. शासनाने लावलेल्या कराच्या संदर्भातील हा विषय आहे. "आगीतून सुटून फुफाट्यात पडावे" या म्हणीचा प्रत्यय शासनाने आणून दिलेला आहे. जकात रद्द व्हावी यासाठी महाराष्ट्रामध्ये प्रचंड आंदोलने झाली. युती शासनाने जकात काढून टाकली. परंतु त्यावेळी अन्य कोणताही कर लावलेला नव्हता. नगरपालिकांचे उत्पन्न कमी व्हायला लागले म्हणून या सरकारने पुन्हा जकात चालू केलेली आहे. सभापती महोदय, आपल्या साक्षीने या सभागृहामध्ये जकात बंद करण्यासंबंधीचे आश्वासन शासनाने दिले होते. शासनाने असे सांगितले होते की जेव्हा मूल्यवर्धित कर लावण्यात येईल त्यावेळी कोणताही कर लावणार नाही. या व्हॅटमुळे शासनाचे उत्पन्न प्रचंड वाढलेले आहे. अन्य कोणताही कर न लावण्यासारखी परिस्थिती असताना व्यापा-यांवर स्थानिक संस्था कर लावण्यामुळे व्यापा-यांची आणि जनतेची मोठया प्रमाणावर पिळवणूक होत आहे. हा कर लावल्यामुळे महाराष्ट्रभर व्यापा-यांनी बंद पुकारलेला आहे. महाराष्ट्रभर या कराच्या विरोधात निदर्शने चालू आहेत. व्यापा-यांवर लादलेला हा जिझिया कर बंद करावा यासाठी आणि यासबंधी निषेध व्यक्त करण्यासाठी या प्रस्तावाला आजच्या कामकाजामध्ये वाव द्यावा. सर्व कामकाज तहकूब करावे या संदर्भातील हा प्रस्ताव असला तरी या महत्वाच्या विषयावर अर्धा-एक तास चर्चा करण्याकरिता आणि त्यावर शासना तर्फे निवेदन करण्याकरिता संधी द्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती : माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांना या बाबतीत शासनाच्या वतीने काही सांगायचे आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : या विषयी लवकरच निवेदन करण्यात येईल.

सभापती : एलबीटी या नावाने असलेला कर लावण्याच्या अनुषंगाने व्यापा-यांनी जो संप पुकारलेला आहे या अनुषंगाने या ठिकाणी चर्चा व्हावी अशा पध्दतीचा हा प्रस्ताव आहे. आजच्या कामकाजामध्ये या विषयाच्या संदर्भात कोणताही विषय नाही. एकूणच विधानपरिषदेचे कामकाज

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहता फक्त 4 दिवसांचा वेळ राहिलेला आहे. तेव्हा या विषयाच्या संदर्भात शासनाने येत्या एक-दोन दिवसात वस्तुस्थितीदर्शक निवेदन करावे अशा सूचना मी शासनाला देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(१) * १९००३ श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १४०२० ला दिनांक २१ मार्च, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटनाच्या माध्यमातून विकास करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच वेंगुर्ला तालुका (जि.सिंधुदुर्ग) पर्यटन महामंडळाच्या उदासिनतेमुळे पर्यटन विकासामध्ये मागे असल्याचे माहे मे, २०११ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकामांसाठी शासनाने काही ठोस उपाययोजना, आराखडे तयार केले वा करण्यात येत आहे, तसेच पर्यटन विकास कामात दिरंगाई केल्याने पर्यटन महामंडळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.छगन भुजबळ : (१) धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. तथापि दिनांक १७ एप्रिल २०११ रोजी वा त्या सुमारास नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : छापील प्रश्नाला सुधारित उत्तर दिलेले आहे. त्यामधील प्रश्न क्रमांक 2,3 आणि 4 ला "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, गोव्यापेक्षा अतिशय सुंदर, शुभ्र आणि पांढरा असा समुद्र किनारा सिंधुदुर्ग जिल्ह्याला लाभलेला आहे. तसेच हिरवागार निसर्ग, डोंगर-द-या आणि विपुल साधनसंपत्ती या जिल्ह्यामध्ये आहे. देशीविदेशी पर्यटक सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पर्यटनासाठी येत असतात. आपल्या राज्यामध्ये सिंधुदुर्ग हा एकमेव जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. हा सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून कोणत्या वर्षी आणि कोणत्या तारखेला घोषित करण्यात आला ? या सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी वास्तुविशारद नेमून पर्यटन आराखडा तयार करण्यात आलेला आहे काय ? सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनासाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात येणार आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : छापील प्रश्नाला सुधारित उत्तर देण्याचे कारण असे की, "17 एप्रिल 2011 रोजी धोरणात्मक निर्णय घेतला काय" असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न होता. त्या तारखेला धोरणात्मक निर्णय घेतलेला नव्हता. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये "नाही" असे उत्तर देण्यात

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आले होते. परंतु धोरणात्मक निर्णय घेतलेला असल्यामुळे नंतर सुधारित उत्तर देण्यात आलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत एक्स्पर्ट कमिटी नेमली होती. त्या कमिटीने जेथे चांगले पर्यटन होऊ शकेल अशी जवळ जवळ 50 ठिकाणे निवडलेली होती. त्यापैकी 25 ठिकाणांची निवड करण्यात आली आणि त्याबाबतीत काम सुरु केले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेगवेगळया माध्यमातून आपण खर्च करीत आहोत. दिनांक 26 ऑगस्ट, 1997 रोजी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. साधारणपणे त्या तारखेला धोरणात्मक निर्णय घेतला आहे. दुसरा निर्णय दिनांक 16 डिसेंबर, 2006 रोजी घेण्यात आला. त्या निर्णयानुसार सिंधुदुर्ग जिल्हयातील पाणीपट्टी व वाहनांवरील प्रवासी शुल्क यामध्ये सवलत देण्याच्या संदर्भात भूमिका घेतली होती. तिसरा निर्णय उद्योग विभागाने घेतला होता. पर्यावरणाचे संतुलन आणि संरक्षण करण्याकरिता खाणकाम प्रकल्पासाठी पर्यटन खात्याकडून एनओसी घेतली पाहिजे अशा प्रकारचे वेगवेगळे निर्णय घेण्यात आले.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात पर्यटनाच्या विकासाची वेगवेगळी कामे होत आहेत. पहिल्यांदा कोकण रिव्हीएरा सर्किट-1 हा कार्यक्रम 2003 साली राबविण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग किल्ल्यावर जाण्यासाठी जेटी बांधणे, जेटीपर्यंत रस्ता बांधणे वगैरे 3.02 कोटी रुपयांची कामे केली. कोकण रिव्हीएरा सर्किट-2 हा 2004-05 मध्ये कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यामध्ये धामापूर येथे पर्यटक निवास बांधण्यासाठी 2.88 कोटी रुपयांची कामे केली. आंबोली येथे 1.75 कोटी रुपयांची, उभादांडा येथे 88 लाख रुपयांची कामे पूर्ण झाली. कोकण रिव्हीएरा सर्किट-3 हा 2005-06 मध्ये कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यामध्ये पर्यटक निवास व्यवस्थेसाठी 1.34 कोटी रुपये खर्च करुन कामे पूर्ण केली.

सभापती महोदय, कोकण विकास पॅकेज अंतर्गत निर्णय घेतल्यानुसार जो निधी देण्यात आला, त्यामध्ये कुडाळला 101 लाख रुपये मंजूर करण्यात आले. नेरुरपार येथे बोटींग आणि हाऊसबोट सुविधा निर्माण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आरोंदा येथे 1.30 कोटी रुपये मंजूर करण्यात आले, माडखोल येथे 27 लाख रुपये मंजूर करण्यात आले. त्या ठिकाणी जलक्रीडा केंद्रासाठी बोट खरेदी करणे, जेटीपर्यंत रस्ता बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मालवण-तारकर्ली येथे 37 लाख रुपये खर्च करुन उपाहारगृहाचे काम पूर्ण केले आहे. आंबोली येथे 45 लाख रुपये खर्चून पर्यटक निवासाचे नूतनीकरण, नवीन पर्यटक निवास बांधण्यात येत आहे. पहिले काम पूर्ण झाले असून दुसरे काम प्रगतीपथावर आहे. सावंतवाडी, शिरोडा, आंबोली, कुडाळ, आचरा, कणकवली, नाचणे, खारेपाटण, मोचेमाड, पत्रादेवी येथे वेगवेगळी कामे करण्यासाठी 12.27 कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यातील बहुतांश कामे पूर्ण झाली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. या शिवाय 12 व्या वित्त आयोगामार्फत 70.90 कोटी रुपये इतका निधी मंजूर झाला आहे. त्यामधून 23 कामे हाती घेण्यात आली. सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग किल्ल्याचे जतन व विकास कामासाठी पर्यटन विभागाला 7.5 कोटी रुपये वितरीत केलेले आहेत. त्याचा सुध्दा यामध्ये समावेश आहे. अशा प्रकारे वेगवेगळी कामे करण्यात येत आहेत.

सभापती महोदय, समुद्र किनाऱ्याच्या पर्यटन विकासाचा बृहत आराखडा राज अँड हावरा कन्सलटन्ट कंपनीकडून तयार करुन घेतला. इतर छोटी मोठी कामे करावयाची असतील तर त्यांनी कामे सुचवावीत यासाठी 5 कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. हे सगळे करीत असताना आतापर्यंत जो निधी वितरीत केला आहे तो 95.10 कोटी रुपये इतका आहे. मी स्वत: या संदर्भात तीन बैठका घेतल्या आहेत. त्यानंतर मी प्रत्यक्षपणे बहुतेक साईटवर जाऊन आलो आहे. जिल्हाधिकारी, पुरातत्व विभाग, वन विभाग, बंदरे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमटीडीसी अशा वेगवेगळ्या विभागांना कामे दिलेली आहेत. त्यांच्याशी मी स्वत: त्या जिल्हयात जाऊन बैठका घेतल्या आहेत. मी तीन बैठका मुंबईमध्ये घेतल्या आहेत आणि सचिवांनी सुध्दा अनेक बैठका त्यांच्या स्तरावर घेतल्या आहेत. एकूण या संदर्भात सातत्याने शासनाचे लक्ष असून जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, बंदरे विभाग, पुरातत्व विभागांकडून कामे करुन घेत आहोत. अनेकदा आपल्याला अमुक ठिकाणी काम करावयास पाहिजे असे वाटते, परंतु त्या ठिकाणी काम करता येत नाही. पुरातत्व विभागाच्या अडचणी असतात. शेवटी शासनाने निर्णय घेतला आहे की, आम्ही निधी देऊ आणि पुरातत्व विभागाने ती कामे पूर्ण करुन घ्यावीत. त्यांनी काम करण्यास सुरुवात केली आहे. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग किल्ल्यामध्ये मी स्वत: जाऊन आलो. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांना त्याची माहिती आहे. एकंदरीत कोकणासाठी 225 कोटी रुपये मंजूर केले परंतु तो निधी खर्च झाला नाही ही गोष्ट मागील अधिवेशनात आमच्या लक्षात आली. तेव्हापासून सर्वच जिल्हयाच्या ठिकाणी आम्ही आढावा घेत आहोत. सिंधुदुर्ग जिल्हयाबाबतची माहिती मी सभागृहासमोर ठेवली आहे. त्यापेक्षा अधिक माहिती उपलब्ध आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी माननीय पर्यटनमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यापूर्वी या सभागृहात उत्तर दिले होते की, सी वर्ल्ड प्रकल्पाच्या संदर्भात सायंटिफिक अँड टेक्नॉलॉजी, पुणे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या कंपनीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून दोन वर्षात हे काम पूर्ण होईल असे सांगितले होते. त्या प्रकल्पाबाबत काय प्रगती झाली? ताज, ओबेरॉय आणि सीडा-डे-गोवा या हॉटेलांना 15 वर्षापूर्वी जागा मंजूर केली होती, त्यांच्याकडून हॉटेल उभारण्याबाबतचे धोरण निश्चित झाले आहे काय?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सीडा-डे-गोवा यांच्याकडून काम सुरु केले जात आहे असे कळले आहे. ताज कंपनीला कळविले आहे की, तुम्हाला जी जागा दिली आहे त्या संदर्भात जर काही अडचणी असतील तर शासनाच्या निदर्शनास आणाव्यात, त्या अडचणी सोडविण्यात येतील. अन्यथा मंजूर केलेली जागा शासनास परत केली पाहिजे असे सगळ्यांनाच कळविले आहे. शासन या संदर्भात लक्ष घालीत आहे. सी वर्ल्डबाबत सल्लागार कंपनीला काम दिले होते. त्यांनी शासनास अहवाल सादर केला आहे. 550 ते 600 कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प आहे. त्यामध्ये जमिनीच्या पैशाचा अंतर्भाव नाही. हा अतिशय महत्वाकांक्षी आणि मोठा प्रकल्प आहे. हा प्रकल्प झाला तर त्या माध्यमातून 2 ते 3 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या संदर्भात पुढील चर्चा माननीय मुख्यमंत्री, सर्व संबंधित विभागाचे सन्माननीय मंत्री यांच्याबरोबर करुन त्या संदर्भातील पावले उचलीत आहोत.

....4...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरु होण्यापूर्वी स्थानिक विकास कर या विषयाबाबत नियम 289 अन्वये सूचना दिली होती आणि स्थगन प्रस्ताव चर्चेला घ्यावा अशी विनंती केली. सन्माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी या विषयाबाबत शासनाच्या वतीने निवेदन करण्यात येईल असे सांगितले होते. मला सभागृहाच्या एवढेच लक्षात आणून द्यायचे आहे की, या विषयाबाबत निवेदन करण्याऐवजी आज माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये सायंकाळी 4.00 ते 5.00 वाजेपर्यंत चर्चा करण्यात येईल. माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि इतरही माननीय सदस्यांना चर्चेमध्ये सहभागी व्हायचे असेल तर त्यांचेही स्वागत आहे. विधानसभेतील माननीय विरोधी पक्षनेते देखील त्या वेळेत चर्चेमध्ये सहभागी होणार असल्यामुळे ही चर्चा एकत्रितपणे व्हावी आणि स्थानिक विकास कराबाबत राज्य सरकारने जी भूमिका घ्यायची आहे ती घेण्यात येईल. त्यामुळे या विषयाबाबत वेगळे निवेदन करण्याचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून मी शासनाची भूमिका या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

ता. प्र. क्र. 19003..... (चर्चा पुढे सुरु .....

श्री. विनोद तावडे : महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाच्या अनुषंगाने मला प्रश्न विचारावयाचा आहे पण तत्पूर्वी मी असे सांगू इच्छितो की, या जिल्ह्यात शासनाने पर्यटनाच्या माध्यमातून खाजगी एअरपोर्ट मान्य केले आहे हे लक्षात घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटन विकासाच्या संधी वाढू शकतात पण त्याला वेळेत मंजुरी दिली नाही तर असे प्रकल्प अन्य राज्य, गोवासारखे राज्य घेऊन जातील अशीही भीती वाटते. म्हणून यासंदर्भात सर्वंकष असा पर्यटन विकास करण्यासाठी एक बैठक घेण्यात यावी. ज्याप्रमाणे सी-वर्ल्डचा येथे उल्लेख झाला. हे आपण अनेक वर्षे ऐकत आहोत. यासंबंधी शासनासमोर कोणत्या योजना आहेत ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, आपण यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी 225 कोटी रुपये मंजूर केले पण त्यात कामच झाले नाही. म्हणून आम्ही या पर्यटन विकासामध्ये केंद्र शासनाकडून मोठा हिस्सा मिळावा यासाठी केंद्र शासनाला कळविले की, आम्हाला या जिल्ह्यात अमुक प्रकारे विकास करावयाचा आहे, आम्ही अमुक प्रकारचे काम करणार आहोत, त्या पलिकडे दुसरा कोणताही स्कोप नाही म्हणून ही कामे करुन घेणे आवश्यक आहे. म्हणून पुढील काळात यासंदर्भात जास्तीत जास्त लक्ष केंद्रीत केले आणि जी अपूर्ण कामे होती ती पूर्ण करण्यात येतील, त्याचबरोबर आपण सी-वर्ल्डबाबत जो उल्लेख केला त्यासंदर्भात शासन अतिशय गांभीर्याने विचार करीत आहे. तसेच या अनुषंगाने आपल्या काही सूचना असतील तर त्याचाही विचार करण्यात येईल व आपल्यासोबत चर्चा करण्यात येईल. आपण केलेल्या सूचनांचाही त्यात विचार करण्यात येईल व त्यांचा उपयोग या पर्यटन विकासासाठी करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : महोदय, मंत्री महोदयांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकासामध्ये चांगल्या पध्दतीने निर्णय घेतले आहेत, त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. सन 1996 साली सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाला, आज सन 2011 हे साल सुरु आहे. या निमित्ताने मी अशी विचारणा करु इच्छितो की, शासनाने पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशनच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण 25 साईट्स आयडेंटिफाय केल्या आहेत. या सर्व साईट्स शासनाने एकट्याने विकसित करावयाच्या झाल्या तर त्याला बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. म्हणून अशा काही लोकांना बरोबर घेऊन या प्रकल्पांना गती देता येईल काय, दुसरे म्हणजे सी-वर्ल्डसंबंधीचा उल्लेख येथे झाला. पूर्वी मंजूर केलेले 200 कोटी रुपये खर्च झाले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाहीत असेही सांगण्यात आले. पण टुरिझमचा विकास केवळ 200 कोटीने होणे शक्य नसून त्यासाठी काही विशिष्ट निधी किंवा विशिष्ट पॅकेज देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, जे मोठे प्रकल्प आहेत त्यांची कामे आपल्याला पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशनच्या माध्यमातून करावे लागतील आणि शासनाचे तसे धोरण आहे. कारण शेकडो नव्हे तर हजारो कोटीची गुंतवणूक पर्यटन विकासासाठी आपल्याला करावी लागणार आहे. तत्पूर्वी जी लहान लहान कामे आहेत ती पूर्ण करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. तर दुसरीकडे पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशनसाठी कन्सल्टंट नेमण्याची कार्यवाही सुध्दा येत्या 15 दिवसात पूर्ण करणार आहोत. त्यासाठी आपण अतिशय रि-नाऊन अशा प्रकारचे लोक यासाठी घेतलेले आहेत. त्यांची स्क्रुटिनी चालू असून त्यांच्या सहकार्याने हे काम करता येईल.

श्री. संजय केळकर : महोदय, ज्याप्रमाणे पर्यटन विकासावर आपण निधी खर्च करतो तशी पर्यटनाच्या विकासासाठी लोकांनी आपली जमीन दिली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मिठबाव येथील शेतकऱ्यांनी आपली 66 हेक्टर जमीन या कामासाठी दिली. या जागेवर दिल्ली येथील "इस्ट इंडिया हॉटेल कंपनी" ला हॉटेलिंगचा विकास करावयाचा होता. ही जागा सन 1995 मध्ये 30 वर्षाच्या भाडेकराराने देण्यात आली होती. आज 15 वर्षे झाली पण करारातील पहिल्या टप्प्याचे काम देखील या जागेवर सुरु झालेले नाही. यासंदर्भात भारताचे महालेखाकार यांनी आक्षेपही नोंदविले आहेत. त्या प्रकरणाची चौकशी सुरु झाली असून त्यातही असे निष्पन्न झाले की, 15 वर्षापूर्वी भाडे कराराने घेतलेल्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचा विकास अथवा करारातील पहिल्या टप्प्याचे कामही सुरु झालेले नाही. या निमित्ताने माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासनाने निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांच्या जमिनी भाडे कराराने घेतलेल्या आहेत, जागा भाडे कराराने घेऊन तेथे विकास करावयाचा ही संकल्पना चांगली आहे पण यासंदर्भात जर करारानुसार कोणतेच काम झाले नसेल तर असे करार रद्द करण्याची भूमिका शासन घेणार काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, मिठबाव येथील जमीन आपण "ओबेरॉय" कंपनीला हॉटेलसाठी दिलेली होती. त्यांनी तेथे काहीच काम न केल्यामुळे ती जागा आपण परत घेतली असून या परत घेतलेल्या जागेवर एमटीडीसीच्या माध्यमातून विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. हे काम लवकरच सुरु करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईसह राज्यात सातत्याने होत असलेल्या घरफोडया व चोरीच्या घटनांबाबत

(2) *18433 श्री.विनोद तावडे, श्री.रामनाथ मोते, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.संजय केळकर, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.उल्हास पवार, श्री.मोहन जोशी, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विजय सावंत, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.राजन तेली, डॉ.सुधीर तांबे , श्रीमती अलका देसाई, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.सुभाष भोईर : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरात दिनांक 14 एप्रिल ते 25 मे, 2011 या कालावधीत 77 घरफोड्या व 42 सोनसाखळ्या चोरल्याच्या घटना घडल्या, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबईतील दहिसर, जोगेश्वरी, गोरेगांव, खार,दिंडोशी येथे सोनसाखळया चोरीच्या तसेच दादर, वर्सोवा, बांगुरनगर, मालाड, बोरिवली येथे पाच घडफोडीच्या घटना दिनांक 7 व 8 मे, 2011 रोजी घडल्या, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच गेल्या 25 वर्षापासून घडफोड्या करुन कोट्यवधी रुपये लुटणाऱ्या चोरास दिनांक 7 मे, 2011 रोजी वा त्या दरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(4) मुंबईसह राज्यात, सातत्याने घरफोडया व चोरीच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, या घटनांमधील किती गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे व त्यांच्याकडून किती रक्कम व ऐवज हस्तगत करण्यात आला आहे,

(6) राज्यात सातत्याने घडत असलेल्या घरफोडया व चोरीच्या घटनांना तातडीने आळा घालण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

##श्री.आर.आर.पाटील : (1) मुंबई शहरात दिनांक 14 एप्रिल, ते 25 मे, 2011 या कालावधीत 265 घरफोडया व 114 सोनसाखळया चोरल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

(2) मुंबईत दिनांक 7 व 8 मे, 2011 च्या दरम्यान दहिसर, खार, दिंडोशी येथे प्रत्येकी 1 अशा एकूण 3 सोनसाखळी चोरीच्या घटना घडलेल्या आहेत तसेच वर्सोवा, मालाड व बोरिवली येथे प्रत्येकी 1 अशा एकूण 3 घरफोडीच्या घटना घडलेल्या आहेत.

(3) व (4) होय.

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(5)सदर घटनांमध्ये एकूण 2593 आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून 21,05,29,517/- किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

6) घरफोड्या व चोरीच्या सातत्याने घडणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. बीट मार्शल, गुन्हे प्रकटीकरण पथक, निगरानी पथक व मोबाईलची सतर्क गस्त ठेवण्यात येते. अभिलेखावरील गुन्हेगारांची नियमित तपासणी करुन त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते. सोसायटींच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन करण्यात येते. गुन्ह्यातील दोषींवर कडक कारवाई करुन सबळ पुरावा प्राप्त होताच मा. न्यायालयात दोषारोपत्र पाठविण्यात येते.

(7) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, कायदा व सुव्यवस्थेबाबतचा विषय म्हटल्यानंतर हे राज्य चोर व दरोडेखोरांचे आहे, असे वाटते. त्यामुळे माननीय गृह मंत्री अस्वस्थ झाले होते. केवळ 14 एप्रिल ते 25 मे यादरम्यात फक्त 40 दिवसातच 265 घरफोड्या व 114 सोनसाखळ्या चोरल्याच्या घटना राज्यात घडल्या तसेच 2593 आरोपींना अटक करण्यात आली असे शासन म्हणते. हा विषय उपस्थित झाल्यानंतर पोलीस उपायुक्त त्या त्या भागातील नागरिकांना आवाहन करीत आहेत की, रहिवाशांनी संकुलाच्या जागी सुरक्षा व्यवस्था ठेवावी, सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवावी, रात्रीच्या वेळेस सुरक्षा रक्षक सोसायटीभोवती फिरते ठेवावेत, सी.सी. कॅमेरे बसवावेत, घर बंद करुन बाहेर जाऊ नये, घर बंद करुन बाहेर जायचे असल्यास विश्वासू नातेवाईकांना घरात ठेवावे. अशा प्रकारची प्रेस नोट उपायुक्तांनी काढली आहे. घर बंद करुन बाहेर जाऊ नका, रात्री घराभोवती फिरावे, मग राज्याचे माननीय गृह मंत्री काय म्हणणार की महाराष्ट्रात लोकसंख्या वाढली, अमुक लोकसंख्येमागे अमुक इतके पोलीस, अमुक इतके पीएसआय आहेत. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, पश्चिम उपनगरामध्ये अशा घटनांची संख्या वाढलेली आहे. तसेच झोपडपट्यांमध्ये अशा प्रकारच्या चोऱ्या होत नाहीत, झोपड्यांमध्ये पैसेच नसतात तर चोऱ्या कशा होणार आहेत, हा महत्वाचा भाग आहे.

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे तीन-तीन मिनिटे प्रश्न डेव्हलप करण्यासाठी न घेता स्पेसिफिक प्रश्न विचारावा. इतका वेळ प्रश्न डेव्हलप करण्यासाठी घेतला तर प्रश्नोत्तराच्या यादीतील केवळ दोन किंवा तीनच प्रश्न चर्चेला येऊ शकतील.

श्री. विनोद तावडे : महोदय, अशा प्रकारचे प्रश्न विचारल्यानंतर उत्तर काय मिळते हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत होतो. यापूर्वी पर्यटनाच्या प्रश्नावर मात्र 20 मिनिटे चर्चा चालली. माझा साधा व सरळ प्रश्न आहे की, राज्यात घरफोडी व सोनसाखळी चोरीच्या ज्या घटना घडल्या आहेत त्यांच्या आकडेवारीमध्ये न जाता त्याबाबत शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो लांबलचक प्रश्न विचारलेला आहे त्याला थोडक्यात "होय" असेच उत्तर देता येईल. तसेच राज्यात सोनसाखळी चोरीचे प्रमाण वाढले आहे, त्याचबरोबर घरफोडीचे प्रमाण वाढल्यानंतर प्रत्येक भागातील उपायुक्तांनी आपापल्या विभागात कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत यासंदर्भात तयार केलेली प्रेस नोट सन्माननीय सदस्यांनी वाचून दाखविली....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:18433 .....

श्री. आर.आर.पाटील....

रात्रीची गस्त वाढविण्याच्या संदर्भात तसेच चो-या आणि सोनसाखळया चोरीच्या प्रकरणांमध्ये नागरीकांचेही सहकार्य घेतले पाहिजे याबाबत पोलीस अधिका-यांबरोबर बैठक घेऊन त्यांना आदेश देण्यात आलेले आहेत. मुंबई शहरामध्ये आता रात्रीची गस्त वाढविण्यात आलेली आहे. मुंबईची सातत्याने वाढत चाललेली लोकसंख्या विचारात घेऊन मुंबई शहरात पोलीस स्टेशन वाढविण्याची बाब सुध्दा शासनाच्या विचाराधीन असून या संदर्भातील प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आलेला आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस दल कमी पडते त्यामुळे दर वर्षी आपण 11000 पोलिसांची भरती सुरु केली असून त्यातील सर्वाधिक हिस्सा मुंबई शहरासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या वर्षीची पोलीस भरती प्रक्रिया लवकरच सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. पोलिसांना अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करुन देणे, पोलिसांची संख्या वाढविणे, गस्त वाढविणे तसेच जे सराईत गुन्हेगार आहेत अशांवर प्रतिबंधात्मक कारवाया करणे या बाबी करण्यात आलेल्या आहेत. सोनसाखळया आणि चोरीचे प्रमाण कमी करण्यामध्ये राज्यात आणि मुंबई शहरात यश आले आहे. घरफोडया डिटेक्ट करतांना मोठया प्रमाणात अडचणी येतात यासाठी क्राईम ब्रँचला विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, चोरीच्या घटना या विशिष्ट कालावधीतच जास्त प्रमाणात घडत असतात. एप्रिल व मे महिन्यात जेव्हा लोक गावाला जातात तेव्हा चोरीच्या घटना मोठया प्रमाणात घडत असतात. एप्रिल व मे या दोन महिन्याकरिता विशिष्ट कृती दलाची व्यवस्था उपलब्ध करुन दिली जाणार आहे काय ? दिनांक 14 एप्रिल ते 20 मे,2011 या कालावधीत घरफोडीच्या घटना जास्त घडलेल्या आहेत. घरफोडीमधील ऐवज सुध्दा पोलिसांनी हस्तगत केलेला आहे. परंतु हा ऐवज संबंधिताला देण्यामध्ये मोठया प्रमाणात दिरंगाई होत असते. त्यामुळे ज्याचा ऐवज आहे तो ऐवज त्यांना लवकरात लवकर देण्याच्या बाबतीत कोणती उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जी मालमत्ता चोरीला जाते अशी मालमत्ता मूळ मालकाला परत देतांना कोर्टाची परवानगी घ्यावी लागत असते व त्यामुळे काही वेळेस मालमत्ता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:18433 .....

श्री. आर.आर.पाटील....

मूळ मालकाला देण्यामध्ये विलंब होत असतो. पोलिसांनी जप्त केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात कोर्टाला सांगून या मालमत्ता नागरिकांना त्वरित परत करण्यासाठी पोलिसांकडून उपाययोजना केल्या जातात. कार्यक्रम घेऊन अनेक मालमत्ता मूळ मालकांना दिल्या जातात. सुट्टीच्या वेळी सोसायटीतील सर्वच रहिवासी गावी निघून गेले तर अशा ठिकाणी कोणाचीही देखरेख नसल्यामुळे चो-या होत असतात. ब-याच घरांचे कडी आणि कुलपं मजबूत नसतात. साध्या कटावणीने सुध्दा ते तोडले जाऊ शकते. त्यामुळे सुरेक्षेच्या संदर्भात नागरिकांनी किमान काळजी तसेच अवेरनेस घेण्याची आवश्यकता असते व तसा अवेरनेस नागरिकांमध्ये निर्माण करणे, गस्त वाढवणे या गोष्टीला विभाग प्राधान्य देईल.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मुंबईमध्ये ज्या प्रमाणे घरफोडयाच्या घटना घडत आहेत तशाच घटना कोल्हापूर शहरातही घडत आहेत. कोल्हापूरमध्ये दैनिक लोकमतने घरफोडया सुरु असतांना स्टींग ऑपरेशन करुन पोलीस स्टेशनमध्ये झोपलेल्या पोलिसांचे फोटो फोटो लोकमत वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले होते हे खरे आहे काय ? नागरिकांपेक्षा एनसीसी, एनएसएस अशांचा सहभाग चो-यांवर कंट्रोल करण्यासाठी घेता येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अधून मधून पेंगाळलेल्या पोलिसांचा फोटो वर्तमान पत्रात येतो तो बघून मलाही वाईट वाटते परंतु पोलिसांना दोन दोन दिवस सारखी ड्यूटी करावी लागते, त्यांना विश्रांतीसाठी सुट्टी सुध्दा मिळत नाही. शेवटी ती सुध्दा माणसे आहेत म्हणून अशा घटनाकडे सहानुभुतीने बघितले जाते परंतु आता ड्यूटीवर असतांना झोपू नका अशा सूचना पोलिसांना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे की, मुंबईमध्ये पोलिसांची संख्या कमी आहे. माझा प्रश्न असा आहे की, सुरक्षेची आपल्याकडे जी काही उपकरणे उपलब्ध आहेत त्या उपकरणांचा वापर नागरिकांनी जास्तीत जास्त केला पाहिजे. परंतु या उपकरणावरील कर रद्द करण्यासाठी शासनाला विनंती केली जाणार आहे काय ? तसेच उपकरणावर कस्टम डयुटी लागत असेल तर ही कस्टम ड्यूटी न घेण्याची विनंती केंद्र सरकारला केली जाणार आहे काय ? उपकरणावरील टॅक्स कमी झाला तर नागरिक सुरक्षेची उपकरणे घराघरात लावू शकतील त्यामुळे अशा उपकरणावरील कर रद्द केला जाणार आहे काय ? ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सुरक्षेच्या संदर्भातील उपकरणावरील कस्टम ड्यूटी कमी करण्याच्या संदर्भातील विनंती केंद्र सरकारला या पूर्वीच करण्यात आली होती. परंतु यावर केंद्रसरकारने अजूनपर्यंत निर्णय घेतलेला नाही. सुरक्षसा उपकरणावर राज्य सरकारचे जे काही टॅक्स असतात ते कमी करावेत याबाबत येत्या बजेटच्या वेळी गृह विभागाकडून वित्त विभागाला विनंती करण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, 2593 आरोपींना आपण पकडले आहे. यातील काही आरोपींनी यापूर्वी सुध्दा चो-या केल्या असतील व त्यांच्यावरील चोरीचे आरोप सिध्द देखील झाले असतील. पूर्वी पोलीस स्टेशन मध्ये त्या त्या भागातील चोरांचे फोटो लावले जात होते. चोरांना ओळखण्यासाठी चोरांचे फोटो आपण जो पर्यंत वेबसाईटवर टाकत नाही तोपर्यंत नागरिकांना चोर कोण आहेत कळणार नाही. एका ठिकाणी चोरी करुन चोर दुस-या भागात जात असतात. त्यामुळे वेबसाईटवर चोरांचे फोटो टाकले जातील काय ? काही चोर चोरी करुन शेजारच्या राज्यात जातात तसेच शेजारच्या राज्यात चोरी करुन आपल्या राज्यात येत असतात. त्यामुळे चो-यांमध्ये परप्रांतियांचा संबंध आढळून आलेला आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, परप्रांतियांना दोष देण्याइतपत आपल्याकडे चोरांची संख्या कमी आहे अशी परिस्थिती नाही. आपल्याकडील चोर सुध्दा चो-या करतांना आढळून आलेले आहेत तसेच बाहेरच्या राज्यातील चोर सुध्दा आपल्या राज्यात चो-या करतांना आढळून आलेले आहेत. सांगली जिल्हयात 8-10 दिवसापूर्वी जे चोर सापडले होते ते मेरठ मधील होते. मेरठ मधून आपल्या राज्यातील दुर्गम भागात चो-या करतांना ग्रामस्थांनी आणि पोलिसांनी त्यांना पकडले आहे. यामध्ये 7 चोरांना पकडण्यात आलेले आहे. सांगली जिल्हयातील जे रस्ते आपल्याला माहिती नाहीत ते रस्ते या चोरांना माहिती होते. ब-याच वेळा आपल्या राज्यातील माणसे चो-या करीत असतात.

सभापती महोदय, पुण्यामध्ये मधुकर प्रभाकर नावाचा एक चोर सापडला होता. हा चोर कोर्टामध्ये वकिलापेक्षा चांगले बोलू शकतो. 150 ग्राहक एकाच वेळी बसू शकतील असे एक हॉटेल त्याच्या मालकीचे आहे. 26 माळयाच्या इमारतीत त्याच्या मालकीचे 9 फ्लॅटस् आहेत. या चोराने

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

दीड कोटी रुपये खर्च करुन गणपतीचे मंदिर बांधले असून या मदिराच्या माध्यमातून चोराला दर महिन्याला एक लाख रुपयाची दक्षिणा मिळत असल्याची बाब इन्कम टॅक्स विभागाने उघड केलेली आहे. हा चोर विमानाने जाऊन चो-या करीत असे. या चोराला रंगेहात पकडल्यानंतर त्याने आतापर्यंत 15 चो-या केल्याचे उघड झालेले आहे. या चोराचे वैशिष्ट म्हणजे हा चोर पुण्याचा आहे. पोलीस ब-याच वेळेस चोराला पकडत असतात, एखाद्यावर चोरीचा आक्षेप घेतला जात असतो. चोराचे नाव वेबसाईटवर टाकण्याच्या संदर्भात तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात येईल. परंतु ज्यांच्यावर चोरीचे आरोप सिध्द झालेले आहेत, ज्यांना शिक्षा झालेली आहे अशा चोरांचे तसेच गुन्हेगारांचे फोटो वेबसाईटवर टाकण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कनेडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे बेकायदेशीर दारु विक्री स्टॉलवर टाकलेला छापा

(३) * १७८०५ श्री.परशुराम उपरकर , श्री.किसनचंद तनवाणी : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनेडी बाजारपेठेतील (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) पशुवैद्यकीय दवाखान्यासमोर असलेल्या पान स्टॉलवर दिनांक २४ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास छापा टाकून बेकायदा दारुची विक्री करणाऱ्या एकाला अटक करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) तसेच कणकवली (जि.सिंधुदूर्ग) शहरातील मुख्य चौकात चहाच्या टपरीवर दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास गांजाची विक्री करीत असतांना एकाला अटक केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी किती मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे,

(४) असल्यास, संबंधितांवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला व त्याचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

##श्री.आर.आर.पाटील : (१) व (२) होय.

(३) व (४) कनेडी बाजारपेठेतील पान स्टॉलवर छापा टाकून दारु विक्री करणाऱ्या एकनाथ दत्ताराम गावकर, याचेविरुध्द कणकवली पोलीस ठाणे क्लेम प्रोहिबिशन गु.र.नं.६०२२/२०११, मुंबई प्रोहिबिशन ॲक्ट कलम ६५ (ई) प्रमाणे दिनांक २४/०४/२०११ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्या ताब्यातील रु.५६०/- किंमतीच्या १८० मि.ली. मापाच्या रॉयल चॉईस व्हिस्की दारुने भरलेल्या ८ बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत.

कणकवली जि.सिंधुदुर्ग शहरातील मुख्य चौकशीत चहाच्या टपरीवर दिनांक २०/०४/२०११ रोजी गांजाची विक्री करीत असताना आरोपी सुनील अजित पवार यास अटक करुन कणकवली पोलीस ठाणे गु.र.नं.३००९/२०११ नाराकोटिक्स ड्रग्ज अधिनियम १९८५ चे कलम २२ प्रमाणे दिनांक २०/०४/२०११ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीकडून रुपये ९००/- किंमतीचा १०५ ग्रॅम गांजा व रुपये ६२३५/- इतकी रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये दारु व गांजा विकणा-यांवर छापा टाकून आरोपींना पकडण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17805.....

श्री.दिवाकर रावते..

आरोपीला पकडल्यानंतर पोलीस स्टेशनला घेराव घालण्यात आला, तेथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.रामचंद्र शिगवण यांनी घेराव घातलेल्या कार्यकर्त्यांना सांगितले की, इतर बाबी बरोबर संबंधित आरोपिवर उद्या गुन्हा दाखल करुन त्यांना पकडण्यात येईल असे सांगून त्यांनी आरोपीला सोडून दिले. तेथील कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनला घेराव घातला म्हणून पोलीस निरीक्षकांनी आरोपीला सोडून दिले हे खरे आहे काय, पोलीस स्टेशनला कोणत्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेराव घातला होता, त्यामध्ये प्रमुख कार्यकर्ते कोण होते, सरकारी कामात हस्तक्षेप केला म्हणून संबंधित कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले काय ? सावंतवाडीमध्ये जो गांजा मिळाला त्याची किंमत 20 लाख रुपये आहे हे खरे आहे काय, हा गांजा परराज्यातून आला होता, तेव्हा परराज्यातील पोलीस त्या संदर्भात शोध घेत आहेत काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या घटनेमध्ये आरोपीला पकडल्यानंतर अन्य व्यवसाय देखील बंद करुन त्यांना पकडावे म्हणून पोलीस स्टेशनला घेराव घालण्यात आला होता. ओरापीला सोडण्यात आलेले नाही. ओरापी कोर्टातून जामिनावर सुटला आहे. या दोन्ही घटनेतील आरोपींवर नियमाप्रमाणे कारवाई केलेली आहे. संबंधित आरोपीला का पकडता म्हणून पोलीस स्टेशनला लोकांनी घेराव घातला होता, ही बाब खरी आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आरोपीला रविवारी पकडून सोडून दिलेले आहे. आरोपीला सोमवारी हजर करुन घेतले असा आमचा आक्षेप आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आरोपींवर गुन्हे नोंद केलेले आहेत. सन्माननीय सदस्य जे सांगत आहे त्याप्रमाणे झालेले नाही अशी माझी माहिती आहे. सन्माननीय सदस्यांनी जो आक्षेप घेतलेला आहे तो ग्राह्य मानून लोंकानी घेराव धातला म्हणून आरोपीला सोडून देण्यात येऊन सोमवारी हजर केले असेल तर त्याबाबत उच्च स्तरीय चौकशी करुन संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित केले जाईल. तसेच ज्यांनी घेराव घातला त्यांच्यावर शासकीय कामात हस्तक्षेप केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ रिझर्व्ह बँकेने बरखास्त करुन प्रशासक नियुक्त केल्याबाबत

(4) * 17957 **श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.धनंजय मुंडे , डॉ.निलम गोऱ्हे , श्री.नितीन गडकरी , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नागो गाणार , श्री.रामदास कदम , श्री.परशुराम उपरकर , श्री.संजय केळकर , श्री.दिपकराव साळुंखे** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन माहे मे, 2011 च्या पहिल्या आठवड्यात बँकेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने सदर बँकेला माहे मार्चमध्ये रु. 270 कोटी दिले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रशासक नियुक्त करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच संचालक मंडळानी केलेल्या अनियमिततेमुळे शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) असल्यास, सदर प्रशासकाच्या ताब्यातील कारभार संचालकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे काय,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता : (1) व (2) होय.

(3) बँकेने साखर कारखान्यांना दयावयाच्या विविध प्रकारच्या कर्जाच्या एकूण मर्यादेपेक्षा जादा रकमेचे कर्ज दिलेले आहे, उणे नक्त मूल्य व अपूरे तारण मूल्य असलेल्या संस्थाना कर्ज वाटप केलेले आहे. संस्थांची मालमत्ता कर्ज वसुलीसाठी ताब्यात घेवून राखीव किंमती पेक्षा कमी किमतीत विकलेली आहे. तसेच संचालक व त्यांचे नातेवाईकांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

त्यामुळे बँकेचे नुकसान होवून तोटा वाढला आहे, भाडे कराराने चालविण्यास दिलेल्या साखर कारखान्यांकडून भाडे वसूल केलेले नाही. येणे कर्जाची वसुली परिणामकारक न झाल्याने 31% पर्यंत थकबाकी वाढून बँकेचे नक्त मूल्य व भांडवल पर्याप्तता उणे झालेली आहे. इत्यादी सर्वसाधारण कारणे आहेत. उपरोक्त कारणास्तव बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन बँकेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(4) व (5) रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 110-अे अन्वये बँकेवर प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची कारवाई करण्यात आली असून रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राज्य सहकारी बँकेने राज्य सरकारची परवानगी न घेता परस्पर 8 साखर कारखान्यांची विक्री करुन मोठया प्रमाणात केलेला घोटाळा

(6) * 18261 **श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य सहकारी बँकेने शासनाची परवानगी न घेता परस्पर 8 साखर कारखान्यांची विक्री करुन मोठ्या प्रमाणात घोटाळे केल्याची धक्कादायक बाब दिनांक 14 मे, 2011 रोजी वा दरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. तथापि मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्र. 67/2007 मध्ये दि.14 जानेवारी, 2010 रोजी दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सहभाग योजनेंतर्गत कर्ज पुरवठा केलेल्या सहकारी साखर कारखान्याकडील थकीत कर्जाच्या वसूलीसाठी संबंधित कारखान्याची मालमत्ता सिक्युरिटायझेशन ॲक्ट मधील तरतुदीनुसार ताब्यात घेऊन निविदा प्रक्रियेद्वारा विक्री केली आहे.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 4 आणि 6 हे एकाच विषयाशी संबंधित आहेत. तेव्हा हे दोन्ही प्रश्न एकत्रित करुन त्यावर चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनतेच्या दृष्टीने हा फार महत्वाचा प्रश्न आहे. राज्य सहकारी बँकेवरील संचालक मंडळ बरखास्त करुन त्या ठिक्राणी प्रशासक नेमण्यात आला. लेखी उत्तरामध्ये संचालकांनी त्यांच्या नातेवाईकांना प्रमाणापेक्षा जास्त कर्ज दिले हे मान्य केलेले आहे. त्याबद्दल मी समाधान व्यक्त करतो. या ठिकाणी संचालक मंडळ दोषी आहे हे मान्य केल्यानंतर संचालक मंडळावर नियम 72 (3) अन्वये कारवाई केव्हा करणार आहात ? महाराष्ट्र शासनाचे दिनांक 14.2.2008 रोजीचे परिपत्रक आहे त्यामध्ये उल्लेख आहे की, संचालक मंडळ असुरक्षित कर्जाचे वाटप करतील त्यांच्यावर एफ.आर.आय. दाखल करावा. तेव्हा आपण संचालकांवर एफ.आर.आय. दाखल करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन 2006 ते 2009-10 या काळात तपासणीमध्ये जे वैधानिक मुद्दे आढळून आले, तसेच सन 2009-10 मध्ये नाबार्डने केलेल्या तपासणीनुसार जे मुद्दे आढळून आले त्या आधारे हे उत्तर दिलेले आहे. संचालकांच्या नातेवाईकांना कर्ज दिले असा आक्षेप लेखा परीक्षकांनी आणि नाबार्डने घेतलेला आहे.आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे की, श्री.माणिकराव पाटील, चेअरमन यांच्या चिरंजीवाकडे 12 लाख रुपयांची थकबाकी आहे. चेअरमनची पत्नी आणि मुलगी संचालक असणाऱ्या प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला 2 कोटी रुपये कर्ज दिले आहे. या प्रकरणातील सद्य:स्थिती अशी आहे की, या दोन्ही प्रकरणातील कर्जाचे हप्ते वेळेवर भरलेले आहेत. त्यामुळे पुढील कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17957 व ता.प्र.क्र.18261..

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अनेक वर्षापासून बँकेत घोळ होत आहे. ऑडीटर्सनी वेगवेगळ्या प्रकारचे ताशेरे मारलेले असताना सहकार आयुक्तांनी स्वत: याबाबत कारवाई का केली नाही, शासन त्यांची चौकशी करणार आहे काय ? सातारा, सांगली, अहमदनगर आणि कोल्हापूर या बॅकांनी जवळपास 3 हजार 300 कोटी रुपयांच्या ठेवी शिखर बँकेतून काढून घेतल्या. म्हणजे अशा प्रकारची कारवाई होणार हे सर्वांना माहीत होते. कोणत्याही क्षणी कारवाई होऊ शकते यादृष्टीने सर्व कारवाई झाली होती. फक्त कारवाई होण्यास दिरंगाई होत होती. केंद्र सरकारने शिखर बँकेवर ही कारवाई करेपर्यंत मध्यंतरीच्या काळात जी दिरंगाई झाली त्यास कोण जबाबदार आहे याची राज्य स्तरावर तपासणी करण्यात आली काय, असल्यास त्याचा निष्कर्ष काय आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, दिनांक 31.3.2010 रोजी श्री.जोशी-नायर असोसिएट यांनी लेखापरीक्षण केले. त्याच वर्षी नाबार्डने देखील लेखापरीक्षण केले. लेखा परीक्षण अहवाल आणि नाबार्डच्या अहवालामध्ये खूप तफावत आहे. यातील मुद्दे पाहिले तर तारण गहाण खत न करता दिलेली कर्जे हा त्यामध्ये प्रमुख मुद्दा होता. म्हणजे जी कर्जे प्रोसेसमध्ये होती, ज्यांना गहाण खत मिळाले नाही म्हणून त्यावर लगेच आक्षेप घेण्यात आले होते. ऑडीटरने नेटवर्थ -294 कोटी दाखविला तर नाबार्डने -144 कोटी दाखविला. सी.आर.ए.आर ऑडीटरने -3.65 टक्के दाखविला तर नाबार्डने 1.5 टक्के दाखविला. हे सर्व पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, पुरेशा तरतुदी न केल्यामुळे अशा प्रकारचे आक्षेप घेण्यात आलेले आहेत. या निमित्ताने मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, बँकेचे दिनांक 31.3.2011 पर्यंत वैधानिक लेखा परीक्षण केलेले आहे त्यामध्ये बँकेची नेटवर्थ 404 कोटी 75 लाख दाखविली आहे. तर सी.आर.ए.आर.रेशिओ + 5.86 टक्के दाखविलेला आहे. या दोन बाबी मी प्रामुख्याने सांगितल्या कारण बँकींगसाठी रिझर्व्ह बँक लायसन्स देते त्यामध्ये नेटवर्थ पॉझीटिव्ह असला पाहिजे आणि सी.आर.ए.आर. 4 टक्क्याच्या पुढे असला पाहिजे अशी अट आहे. या अटींची पूर्तता बँकेने दिनांक 31.3.2011 अखेर केलेली आहे.

ता.प्र.क्र. 17957 व ता.प्र.क्र.18261..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, राज्य सहकारी बँक ही अत्यंत प्रतिष्ठीत बँक आहे. आशिया खंडातील पहिल्या क्रमांकाची बँक होती. या बँकेवर प्रशासक नेमणे आणि या बॅकेवर केंद्र सरकारमार्फत कारवाई होणे ही महाराष्ट्राच्या दृष्टीने भूषणावह बाब नाही. काही साखर कारखाने विक्रीला काढलेले आहेत किंवा ज्या प्रॉपर्टी विक्रीला काढलेल्या आहेत आणि जे कारखाने विकले गेलेले आहेत, त्यासाठी बेस प्राईस ठरविण्यात आली होती काय ? तसेच आलेली रक्कम बेस प्राईसपेक्षा जास्त आहे काय ?

यानंतर श्री.सरफरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17957 व 18261...

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तारांकित प्रश्न क्रमांक 18261 हा देखील याच संदर्भातील असल्यामुळे तो जोडून घेण्याबाबत विनंती केली. व त्या अनुषंगाने त्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी मला सांगितले पाहिजे की, राज्य सहकारी बँकेने माननीय हायकोर्टाने दिलेल्या आदेशानुसार सिक्युरिटायझेशन ॲक्टखाली या कारखान्याची मालमत्ता ताब्यात घेतली. त्यापैकी 6 संस्थांच्या मालमत्तांची त्यांनी विक्री केली. त्यामध्ये बालाघाट सहकारी साखर कारखाना जिल्हा लातूर यांची राखीव किंमत 23 कोटी 3 लाख 91 हजार होती व विक्री रक्कम 30 कोटी 51 लाख आहे. रिझर्व्ह प्राईसपेक्षा जास्त किमंतीने ती मालमत्ता विकली. त्याचप्रमाणे नरसिंह सहकारी साखर कारखाना, जिल्हा परभणी...

सभापती : मंत्रीमहोदयांनी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने दिनांक 14 जानेवारी 2008 रोजी एक परिपत्रक काढले. त्यामध्ये म्हटले आहे की, नागरी बँका, सहकारी पतसंस्था यांनी संस्थेला कर्ज मर्यादेचे उल्लंघन करुन विना तारण, अपूरे तारण घेवून कर्ज वाटप केले असेल त्यांच्याविरुध्द एफ.आय.आर. दाखल करावा" या परिपत्रकाची मंत्रीमहोदयांना माहिती आहे काय? असेल तर या उत्तरात "विविध प्रकारच्या कर्जाच्या एकूण मर्यादेपेक्षा जादा रकमेचे कर्ज दिलेले आहे, उणे नक्त मूल्य व अपूरे तारण मूल्य असलेल्या संस्थाना कर्ज वाटप केलेले आहे" हे मान्य केले आहे. त्यामुळे गृह विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण एफ.आय.आर. दाखल केला काय? केला नसेल तर कां केला नाही, व कधी करणार आहात?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिनांक 14 जानेवारी 2008 च्या परिपत्रकाचा उल्लेख केला आहे ते परिपत्रक पतसंस्था आणि नागरी बँकांच्या संदर्भात लागू आहे.

(अडथळा)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आता सांगितले की, ते परिपत्रक नागरी बँकाना लागू आहे. या ठिकाणी ही बँक नसली तरी ही पतसंस्थाच आहे. त्यांना बँकेचे लायसन्स मिळाले नसले तरी ती मोठया प्रमाणात असलेली संस्था आहे. त्यामुळे हे परिपत्रक त्या ठिकाणी लागू होते. या संदर्भात सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उल्लेख करणे बरोबर नाही. तिसऱ्या प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, "संचालक मंडळानी केलेल्या अनियमिततेमुळे शासनाने कोणती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारवाई केली वा करण्यात येत आहे"? संचालक आणि त्यांच्या नातेवाईकांना कर्ज वाटप करुन ही अनियमितता केलेली आहे. त्याचे समर्थन करीत असतांना त्यांनी नियमितपणे हप्ते भरले आहेत असे सांगणे बरोबर नाही. ही जर अनियमितता असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. कर्जाची वसूली झालेली आहे असे आपण गंमतीने सांगत आहात, म्हणजे त्यांनी आपल्यावर मेहरबानी केल्यासारखे सांगत आहात. त्यामुळे या ठिकाणी झालेली अनियमितता ही दखलपात्र असल्यामुळे त्यांच्यावर सरकारकडून कारवाई झाली पाहिजे, ती आपण कां केली नाही? दुसरा प्रश्न असा की, भाडे कराराने चालविण्यास दिलेल्या साखर कारखान्यांकडून भाडे वसूली झालेली नाही असे कारखाने किती व ते कुणाचे आहेत? त्या संदर्भातील भाडे वसूल करण्यासाठी आपण कोणती कारवाई केली?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी प्रथम सांगितले आहे की, सन 2007 ते सन 2009-10 पर्यंतची वैधानिक लेखापरीक्षण तपासणी झाली आहे आहे. त्या संदर्भातील वैधानिक लेखापरिक्षण आणि नाबार्डच्या इन्सपेक्शनमध्ये घेण्यात आलेल्या आक्षेपांच्या संदर्भातील हे उत्तर देण्यात आले आहे हे मी पहिल्यांदा सांगितले आहे. भाडे कराराने चालविण्यास दिलेल्या कारखान्यांकडून भाडे वसूली झालेली नाही असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्या भाडयाची एकूण रक्कम 3 कोटी 40 लाख इतकी असून त्या संदर्भातील कारखान्यांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही.

(गोंधळ)

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 18865...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, संचालक मंडळाला पाठीशी घालणाऱ्या या सरकारचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

अशुधीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

मौ.करंजी (ता.आष्टी, जि.बीड) येथील एका दलित महिलेच्या घरात घुसून तिच्यावर केलेला बलात्काराचा प्रयत्न

(५) * १८८६५ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.करंजी (ता.आष्टी, जि.बीड) येथील एका दलित महिलेच्या घरात घुसून तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली असता सदर महिला घडलेल्या घटनेची तक्रार ता.आष्टी पोलीस स्टेशनला करण्यास गेली असता तत्कालीन ठाणे अंमलदार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आणि करंजी येथील एका सेवानिवृत्त हवालदार यांनी आरोपीशी संगनमत करुन सदर प्रकरण दडपून टाकल्याचे माहे मे, २०११ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हेगारांवर अनेक गुन्हे दाखल असतानाही सदर गुन्हेगारास पाठीशी घातले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर गुन्हेगारांवर व त्यांना पाठीशी घालण्याऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) व (२) हे खरे नाही.

फिर्यादीने दिनांक २७.०५.२०११ रोजी पोलीस स्टेशन आष्टी येथे फिर्याद दिल्यानंतर गु.र.नं.७७/२०११ कलम ३५४, ५०४, ५०६ भा.दं.वि. प्रमाणे त्याच दिवशी ११.३० वाजता दखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या गुन्ह्याशिवाय यापूर्वी आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल नाहीत. आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रश्न येत नाही.

(३) गुन्ह्याच्या तपासात आरोपीस अटक करण्यात येऊन न्यायालयीन कोठडीत पाठविले आहे तसेच आरोपीविरुध्द पुरावा उपलब्ध झाल्याने दोषारोप पत्र क्र. ६६/२०११ दिनांक १५.७.२०११ अन्वये खटला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, आष्टी न्यायालयात दाखल करण्यात आला असून कोर्ट केस नंबर ३८२/२०११ आहे.

(४) विलंब नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, उत्तरामध्ये 354, 504 व 506 ही जी तीन कलमे लावण्यात आलेली आहेत त्यांचा अर्थ काय आहे? या आरोपीविरुध्द कोणता पुरावा उपलब्ध झाला आहे? आरोपीला किती दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, आरोपींना 6 तारखेला अटक केली व 1 दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, आरोपींकडून कोणता पुरावा उपलब्ध झाला आहे, तसेच या ठिकाणी कलम 354, 504 व 506 लावण्यात आलेले आहेत या कलमांचा अर्थ समजावून सांगणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या महिलेने केलेल्या तक्रारीवरुन ही कलमे लावण्यात आली. त्या महिलेचा विनयभंग केला, तिचा हात धरला या अनुषंगाने ही कलमे लावण्यात आली आहेत.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आरोपीचे नाव काय आहे?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, आरोपीचे नाव मधुकर मच्छिंद्र आजबे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाच्या ३ हजार कोटींच्या प्रस्तावाबाबत

(७) * १८६९६ श्री.रामदास कदम , श्री.परशुराम उपरकर , श्री.दिवाकर रावते , डॉ.दिपक सावंत :

सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाचा ३ हजार कोटींचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला केंद्र शासनाची मंजूरी मिळविण्यासाठी राज्य शासनाने माहे जून, २०११ अखेरपर्यंत कोणता पाठपुरावा केला व मंजूरी केव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे,

(३) तसेच सदर प्रकल्पाला किती निधीची आवश्यक आहे त्यापैकी किती निधी प्राप्त झाला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.छगन भुजबळ : (१) अंशत: खरे आहे.

(२) मुंबई - गोवा महामार्गाच्या पनवेल ते इंदापूर (कि.मी. ००/०० ते ८४/००) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येणार असून कामाची निविदा निश्चिती झालेली आहे. या कामाची किंमत ९४३.०० कोटी रुपये आहे.

इंदापूर ते झाराप (कि.मी ८४/०० ते ४५०/००) या ३६६ कि.मी. लांबीच्या भागाचे चौपदरीकरण करण्याकरीता सुसाध्यता अहवाल तयार करण्याच्या कामास केंद्रशासनाने मंजुरी दिली असून सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर कामाची सुसाध्यता अहवालानुसार अंदाजे किंमत रुपये ३६९९.०० कोटी आहे. सुसाध्यता अहवालाची क्षेत्रीय स्तरावर पडताळणी झाल्यानंतर ऑगस्ट, २०११ अखेर केंद्रशासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

केंद्रशासनाची मंजुरी प्राप्त झाल्यावर चौपदरीकरणाच्या कामाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

झाराप ते पत्रादेवी (कि.मी. ४५०/०० ते ४७१/००) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीपथावर असून सदर काम मे २०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) पनवेल ते इंदापूर (कि.मी ००/०० ते कि.मी ८४/००) या लांबीतील काम बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वावर करण्यात येणार असल्यामुळे निधीची आवश्यकता नाही.

ता.प्र.क्र. १८६९६....
श्री. छगन भुजबळ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इंदापूर ते झाराप (कि.मी. ८४/०० ते ४५०/००) या ३६६ कि.मी. लांबीच्या भागाच्या चौपदरीकरण कामाच्या सुसाध्यता अहवालानुसार कामाची अंदाजित किंमत रुपये ३६९९ कोटी असून सदर अहवालास केंद्रशासनाची मंजुरी प्राप्त झाल्यावर कामाबाबतचे पुढील नियोजन करण्यात येईल.

झाराप ते पत्रादेवी (कि.मी. ४५०/०० ते कि.मी. ४७१/००) या लांबीतील चौपदरीकरणाच्या कामाची सुधारित किंमत रुपये १८३.४३ कोटी होती. त्यापैकी रुपये १५७ कोटी खर्च झाला असून कामाची सुसुधारीत किंमत रुपये २६८.७७ कोटी आहे. सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर रुपये ८५.३४ कोटी प्राप्त झाल्यास या लांबीतील काम पूर्ण होईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मुंबई-गोवा महामार्ग गेल्या अनेक वर्षापासून चर्चेमध्ये आहे.या महामार्गावर अनेक अपघात होत आहेत, अनेक लोकांना आपले जीव गमवावे लागत आहेत. या दृष्टीने हा महामार्ग लवकर होण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत? दुसरा प्रश्न असा की, या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव केव्हापासून प्रलंबित आहे, हे चौपदरीकरण किती दिवसात पूर्ण होणार आहे? यामध्ये प्रोसिजरल डीले होत असेल तर तो कमी करुन लवकरात लवकर हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी गरज असेल तर आपण सन्माननीय पंतप्रधानांना भेटण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळ नेऊन हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पावले उचलणार आहात काय?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी या विभागाची सूत्रे सन २००४ मध्ये हाती घेतल्यानंतर या प्रश्नासाठी दिल्ली येथे पहिली बैठक घेण्यात आली. त्यावेळी केंद्रीय मंत्री सन्माननीय श्री. शरद पवार साहेबांना घेऊन मी सन्माननीय मंत्र्यांकडे गेलो. तेव्हापासून या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा सातत्याने आग्रह धरलेला आहे. त्याचप्रमाणे नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या अध्यक्षांकडे सातत्याने महाराष्ट्र सरकारने व विविध नेत्यांनी सुध्दा आग्रह धरल्यामुळे काही प्रमाणात काम सुरु झाले. उदा. झाराप ते पत्रादेवी या कामासाठी केंद्र सरकारने पैसे दिले व अर्थसंकल्पामध्ये ते काम घेण्यात आले. आता पळसपे ते इंदापूर पर्यंतच्या रस्त्याचा अभ्यास करुन व निविदा काढून फायनान्शिअल क्लोजर करणे या सर्व गोष्टी होऊन ९७५ कोटीं

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १८६९६...

श्री. छगन भुजबळ...

रुपयांच्या ८४ कि.मी. च्या पहिला टप्प्याचे काम सुरु होत आहे. त्यासाठी केंद्र सरकारने एजन्सी फिक्स केली आहे, फायनान्शिअल क्लोजर झाले आहे. आता या क्षणी त्या ठिकाणी कामगारांसाठी ऑफिसेस तयार करणे, पूल बांधणे इत्यादी कामे करण्याठी सॉईल टेस्टिंगची कामे सुरु झाली आहेत. पाऊस कमी झाल्यानंतर इंदापूरपर्यंतचे चौपदरीकरणाचे काम फूल स्पीडने निश्चितपणे सुरु होईल अशी अपेक्षा आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18696 . . ..

श्री.छगन भुजबळ . . ..

सभापती महोदय, झाराप-पत्रादेवी या कामासाठी जो खर्च करावयाचा आहे, त्याबाबत सांगावयाचे तर केंद्र शासनाचे अधिकारी वारंवार तेथे आल्यानंतर त्यांनी काही ठिकाणी सब-वे वाढविले, काही ठिकाणी ब्रिजेस वाढविले, त्यामुळे सदरहू कामाचा खर्च वाढला. या वाढीव कामाचा खर्च केंद्र शासनाने द्यावा म्हणून आपण आग्रह धरला आणि केंद्र शासनाच्या माननीय मंत्री महोदयांकडे या संदर्भातील फाईल गेलेली आहे. यानंतर इंदापूर पासून झाराप पर्यंतचा जो भाग आहे, त्याचे साधारणपणे तीन भाग आहेत. परंतु त्याचा खर्च जवळजवळ पावणेचार ते चार हजार कोटी रुपयांचा आहे. त्याचा सिक्युरिटी अहवाल, अभ्यास अहवाल प्राप्त झालेला आहे आणि लवकरच हे अहवाल केंद्र शासनाकडे स्क्रुटीनीसाठी पाठविण्यात येतील. त्यानंतर यासंबंधातील पुढील प्रोसीजर सुरु होईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ साहेबांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. फक्त याबाबतीत एक-दोन गोष्टी स्पष्ट होणे आवश्यक आहे. पनवेल-इंदापूर रस्ता हा बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा या पध्दतीने इंदापूरपर्यंतच्या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम होणार आहे. माझा असा प्रश्न आहे की, सदरहू काम केव्हा सुरु होणार आहे? दुसरा प्रश्न असा की, इंदापूर ते झाराप यामध्ये जवळजवळ 450 कि.मी.इतके अंतर आहे आणि त्यामध्ये तीन टप्पे घेण्यात आलेले आहेत. मला एक गोष्ट समजली नाही की, "झाराप ते गोवा" संबंधातील काम मुंबईपासून सुरु न करता परस्पर गोव्याच्या बॉर्डरवर काम कसे सुरु करण्यात आले? ही बाब स्पष्ट झाली तर अधिक चांगले होईल. तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"सदर कामाची सुसाध्यता अहवालानुसार अंदाजे किंमत रुपये 3699.00 कोटी आहे." परंतु जेव्हा सुरुवातीला एस्टीमेट करण्यात आले, तेव्हा या कामासाठी पैसे मंजूर झालेले आहेत असे आपण सांगितले होते. परंतु आता अधिकचा खर्च करावयाचा आहे. कारण केंद्रामधून काही अधिकारी आले आणि त्यांनी अधिक काम वाढविले.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी प्रश्न विचारवा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा विषय मोठा आहे.

सभापती : मला याची कल्पना आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी नेहमी स्पेसिफीकच प्रश्न विचारीत असतो. पण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक अपवाद म्हणून आपण कृपा करुन मला समजून घ्यावे अशी माझी विनंती आहे. मी याठिकाणी कुठेही राजकीय भाग आणत नाही. माझी अशी विनंती आहे की, या कामासाठी जवळजवळ चार हजार कोटी रुपयांचा निधी लागणार आहे आणि वाढीव कामासाठी केंद्र शासनाकडून निधी मंजूर करुन घ्यावयाचा आहे. पण इंदापूर पासून पुढे जे काम करावयाचे आहे, ते तात्काळ सुरु करणार आहात काय? कारण माननीय मंत्री श्री.छगन भुजबळसाहेब यांनी तेथील रस्त्यावर होणाऱ्या अपघातांचे आकडे पाहिले तर ते मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे या कामाची तातडी आहे. सध्या देखील तेथील रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले असून, लवकरच गणपती उत्सव सुरु होणार आहे. म्हणून एका बाजूला काम सुरु करीत असताना किमान गणपती येण्यापूर्वी या सगळया रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम केले जाईल काय ? तसेच इंदापूर पासून पुढच्या टप्प्याच काम कधीपासून सुरु करणार आहात ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सध्या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरु आहे. पण निश्चितपणे गणपती उत्सवाच्या अगोदर कुठेही अडचण रहाणार नाही अशा प्रकारची काळजी घेण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच गोव्यापासून काम सुरु केले आहे, त्याबाबत सांगावयाचे तर पर्यटनासाठी जाण्याकरता सोयीचे व्हावे म्हणून तेथील रस्त्यांची कामे घेण्यात आली आहेत हे खरे आहे. पण ते काम केंद्र शासनाच्या बजेटमधून घेण्यात आले आहे, बी.ओ.टी.वर घेण्यात आलेले नाही. परंतु तिकडून जो दुसरा रस्ता आहे, त्याचे काम केंद्र शासनाने बजेटमधून घेण्याचे ठरविले. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे इंदापूरपर्यंतचे काम सुरु झालेले आहे. त्याठिकाणी सॉईल टेस्टींगचे काम, इतर जे काम आहे, ब्रिजेसच्या बाबतीतील काम आहे, ते पावसाळ्यानंतर फूलस्वींगमध्ये सुरु होईल. त्यादृष्टीने त्यांची कार्यालये वगैरे तयार होत असून पहिल्या टप्प्याचे काम सुरु होईल. पण मी सांगितले की, पुढील जे काम आहे, त्याचा अभ्यास अहवाल प्राप्त झाला आहे आणि यानंतर तो केंद्र शासनाकडे पाठविला जाईल. जर केंद्र शासनाला काही शंका असतील ते क्लिअर करावे लागतील. ते झाल्यानंतर केंद्र शासन त्या कामांची टेंडर मागविणार आणि टेंडर मंजूर झाल्यानंतर केंद्र शासन जी एजन्सी निश्चित करील, त्यांना पुढील सहा महिने फायनान्शिअल क्लोजरसाठी, बँकेच्या पैशासाठी, तयारीसाठी देण्यात येतात अशा प्रकारची ही प्रक्रिया आहे. हे काम अतिशय मोठे असल्यामुळे,साधारणपणे 5 हजार कोटी रुपयांचे हे काम आहे आणि आपल्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते केंद्र शासनाच्याच माध्यमातून करावे लागते.त्यामुळे आपण सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. मला ही गोष्ट मान्य आहे की, तेथे दुर्दैवाने जास्त अपघात होत आहेत. आम्ही याबाबतीत देखील केंद्र शासनाला सातत्याने कळवित आहोत की, याठिकाणी दुर्दैवाने अपघात होत आहेत, त्यामुळे जास्तीतजास्त लवकर ही प्रक्रिया गतीमान करावी. यासाठी सातत्याने आपले महाराष्ट्रातील खासदार,मंत्री महोदय तेथे जाऊन प्रयत्न करीत आहेत आणि लवकरच हे अधिवेशन संपल्यानंतर या सर्व विषयांच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांना बरोबर घेऊन दिल्ली येथे संबंधित मंत्री महोदयांची भेट घेईन. कारण सर्वसाधारणपणे केंद्र शासनाने एखाद्या रस्त्याचे काम बी.ओ.टी.च्या माध्यमातून करण्याचे ठरविल्यानंतर त्याची जी प्रक्रिया आहे ती 48 महिन्यांची आहे. ती कशी कमी करता येईल यासाठी आम्ही दिल्लीला जाऊन प्रयत्न करु.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब यांनी सदरहू रस्त्याच्या कामासाठी खूप प्रयत्न केले त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. माझा प्रश्न असा आहे की, झाराप ते पत्रादेवी या रस्त्याच्या कामासाठी केंद्र शासनाकडून निधी न आल्यामुळे ते काम गेल्या वर्षापासून बंद आहे. त्यासाठी आपण प्रयत्न करणार आहात काय? तसेच दुसरा महत्वाचा प्रश्न आहे की, कोकण रेल्वेचे काम करीत असताना ते सगळया ठिकाणी एकाच वेळी सुरु करण्यात आले. आपण या रस्त्याच्या कामाचे तीन टप्पे केलेले आहेत. जसे आता 84 कि.मी.चा पहिला टप्पा राहील आणि झाराप पासून उलट्या दिशेला म्हणजे मुंबईच्या दिशेला रस्ता करण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ? कारण तेथे जागेची अडचण नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब यांनी प्रश्न विचारला की, गोव्याच्या हद्दी पर्यंत महामार्ग क्र.17 अतिशय चांगले रस्ते आहेत. पण झारापच्या पुढच्या बाजूला सिंधुदूर्गच्या हद्दीमध्ये 36 कोटी रुपये खर्च करुन जो रस्ता तयार केला, तो खराब झालेला आहे त्यामुळे संबंधितांवर आपण कारवाई करणार आहात काय आणि गणपती पूर्वी रस्त्यांवरील खड्डे भरणार आहात काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, या संदर्भात केंद्र शासनाचेच अधिकारी काम सुरु झाल्यानंतर तेथे गेले आणि आणखी कामाचे स्वरुप वाढविले. त्यामुळे त्याचा खर्च वाढला. आता केंद्र शासनामध्ये जे नवीन मंत्री आलेले आहेत, त्यांच्याकडे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकच्या खर्चाच्या संबंधातील फाईल गेलेली आहे. लवकरच पैसे मंजूर होतील आणि सदरहू काम सुरु होऊ शकेल. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत, तशा प्रकारची तेथे परिस्थिती असेल तर त्याची संपूर्णपणे चौकशी केली जाईल आणि रस्ते दुरुस्त केले जातील.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

. . . .क्यु-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 25 जुलै, मंगळवार, दिनांक 26 जुलै व गुरुवार, दिनांक 28 जुलै 2011 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : सोमवार, दिनांक 25 जुलै, मंगळवार, दिनांक 26 जुलै व गुरुवार, दिनांक 28 जुलै 2011 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

. . . .क्यु-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2011-2012 चे अंदाजपत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2010-2011 चे सुधारित अंदाजपत्रक" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : सुधारित अंदाजपत्रक सभागृहासमोर ठेवण्यात आले.

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ, पुणे यांचे सन 2007-2008 ते 2009-2010 या वर्षाचे लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

. . . .क्यु-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा सातवा, आठवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : अंदाज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

यानंतर श्री.बरवड . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना परीक्षा न घेता ज्येष्ठतेनुसार शासन सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता

मु. शी. : राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना परीक्षा न घेता ज्येष्ठतेनुसार शासन सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, भगवान साळुंखे, धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अंशकालीन कर्मचारी आणि त्यांची शासनाच्या सेवेमध्ये नियुक्ती हा विषय खूप दिवस आंदोलनाचा झालेला आहे. त्यांची वयाची मर्यादा शासनाने 46 वर्षापर्यंत वाढविली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु एका बाजूने 46 वर्षापर्यंत वयाची मर्यादा वाढविली आणि दुसऱ्या बाजूने 2 वर्षे नियुक्त्यांवर, भरतीवर बंदी आणली. माझा असा प्रश्न आहे की, यांच्या बाबतीत आपल्याला सहानुभूतीपूर्वक विचार करता येईल का ? याचे कारण असे की, ज्यावेळी आपण वयोमर्यादा वाढविली त्याच वेळी भरतीवर बंदी सुध्दा होती. दुसरी बाब अशी की, ज्यांना आपण अजून सेवेत सामावून घेऊ शकलेलो नाही असे किती अंशकालीन कर्मचारी राहिलेले आहेत ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हे खरे आहे की, गट 'क' आणि गट 'ड' मधील सरळसेवा भरतीवर वित्त विभागाची बंदी आहे परंतु ती बंदी केवळ अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठीच नसून सर्वांसाठी आहे. परंतु आता अंशकालीन कर्मचाऱ्यांना भरतीची एक संधी अशा प्रकारे निर्माण झालेली आहे की, सध्या काही पदांना त्या बंदीतून सुट आहे. ग्रामसेवक, तलाठी, कृषी सेवक, शिक्षण सेवक या पदांसाठी ते अर्ज करु शकतात तसेच आता आपण 2 ऑगस्ट, 2011 ला मागासवर्गीयांच्या अनुशेष भरतीसाठी जो स्पेशल ड्राईव्ह घेतलेला आहे तिकडेही ते अर्ज करु शकतात. वित्त विभागाची जी एक अट होती की, प्रधान सचिव (सेवा) यांची जी समिती आहे त्या समितीसमोर विशेष परवानगी घ्यावी, ती अट अनुशेष भरतीसाठी 2 ऑगस्ट, 2011 ला काढण्यात आलेली आहे. आता ती अट नाही. आता सरळ भरती करता येते. त्यामुळे अनुशेषाच्या भरतीमध्ये किंवा जी पदे सुटलेली आहेत त्यामध्येअंशकालीन कर्मचाऱ्यांना सुध्दा अर्ज करण्यास वाव आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ MMP/

पृ. शी. : राज्यातील पोलीस मोटर परिवहन विभागात सुरु असलेल्या घोटाळ्याच्या संदर्भात पोलीस महासंचालकांकडे करण्यात आलेली तक्रार

मु. शी. : राज्यातील पोलीस मोटर परिवहन विभागात सुरु असलेल्या घोटाळ्याच्या संदर्भात पोलीस महासंचालकांकडे करण्यात आलेली तक्रार याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, नागो गाणार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, निवेदनाने माझे समाधान झालेले आहे.

श्री. नागो गाणार : सभापती महोदय, गैरप्रकार आणि भ्रष्टाचाराबाबत 1998 ते 2005 या कालावधीतील हा प्रश्न आहे. जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्या विरुध्द चौकशी सुरु आहे आणि न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत असे निवेदनात म्हटले आहे. परंतु झालेल्या विलंबाचा कालावधी खूप मोठा आहे. खटले तत्काळ निकाली निघतील याबद्दल काही प्रयत्न केले जाणार आहेत का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, ही बाब निदर्शनास आल्यावर ताबडतोब ओपन चौकशी करुन खटले दाखल करण्यात आले आहेत. आरोपी निश्चित झालेले आहेत त्यामुळे लवकरात लवकर याचा निर्णय लावण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मेळघाटातील आदिवासी कुपोषित बालकांच्या मृत्यूचे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रमाण

मु. शी. : मेळघाटातील आदिवासी कुपोषित बालकांच्या मृत्यूचे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रमाण याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

सभापती : नियम 93 अन्वये सूचना देणारे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी सदरहू निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

प्रा. फौजिया खान (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अलिबाग, (जि. रायगड) तालुक्यातील बहिरीचापाडा, माणकुळे खार, नारंगी खार आदी भागात उधाणाच्या भरतीचे पाणी भातपिकाखालील जमिनीमध्ये शिरणे

मु. शी. : अलिबाग, (जि. रायगड) तालुक्यातील बहिरीचापाडा, माणकुळे खार, नारंगी खार आदी भागात उधाणाच्या भरतीचे पाणी भातपिकाखालील जमिनीमध्ये शिरणे याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. बाळासाहेब थोरात (खारजमीन मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 .सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, खारे पाणी शिरल्याचे निवेदनामध्ये मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे शासन शेतकऱ्यांना किती नुकसान भरपाई देणार आहे ? ठेकेदार वाळू नाही असे कारण सांगतो पण ते कारण खरे नाही. त्यामुळे ठेकेदाराने वेळेवर काम पूर्ण केले नाही म्हणून त्याच्यावर कारवाई करणार का आणि त्याला काळ्या यादीत टाकणार का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये शेतकऱ्यांचे तसे नुकसान झालेले नाही कारण बऱ्याच दिवसापासून ती झडप खराब झालेली आहे.

श्री. कपिल पाटील : बरेच दिवस ती झडप खराब झालेली आहे असे माननीय मंत्री महोदय मान्य करीत आहेत. याचा अर्थ इतके काळ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. उलट जास्त नुकसान झाल्याचे माननीय मंत्री महोदय मान्य करीत आहेत.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य नारंगी योजनेच्या बाबतीत बोलत आहेत. ते जे क्षेत्र आहे तेथील झडप बराच काळ तशीच राहिली, ही वस्तुस्थिती आहे. ती जागा खारलॅण्ड म्हणूनच असते. ती जमीन आपण बांध घालून पिकांच्या लागवडीखाली आणत असतो. त्या ठिकाणी पूर्णपणे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. नवीन जमीन निर्माण करणे आणि शेतीखाली आणणे अशा प्रकारचा हा प्रकल्प आहे. यामध्ये 151 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या पध्दतीने या वर्षामध्ये पूर्ण नूतनीकरण आणि हा बांध तयार करीत आहोत आणि ती जमीन पुढच्या काळामध्ये पिकाखाली येणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बेलासीस रोड, मुंबई सेंट्रल येथील महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याच्या परवानगीशिवाय वेश्या व्यवसाय करणाऱ्या गेस्ट हाऊसेसच्या मालकांवर कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष

मु. शी. : बेलासीस रोड, मुंबई सेंट्रल येथील महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याच्या परवानगीशिवाय वेश्या व्यवसाय करणाऱ्या गेस्ट हाऊसेसच्या मालकांवर कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...9 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, पोलिसांनी कारवाई केलेली आहे त्यामुळे या निवेदनामुळे माझे समाधान झालेले आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : तापी पतसंस्था चोपडा,जि.जळगाव, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच शिवनेर नागरी सहकारी पतसंस्था, जुन्नर, जि. पुणे या संस्थांच्या कर्ज वाटपात झालेली अनियमितता

मु. शी. : तापी पतसंस्था चोपडा,जि.जळगाव, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच शिवनेर नागरी सहकारी पतसंस्था, जुन्नर, जि. पुणे या संस्थांच्या कर्ज वाटपात झालेली अनियमितता याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6.सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...11...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेमध्ये मी तीन विषय एकत्र केलेले आहेत. तापी पतसंस्था, चोपडा, जि. जळगाव त्याच बरोबर पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संबंधित सोमेश्वर विविध कार्यकारी सेवा संस्था, निंबूत ता. बारामती आणि शिवनेर नागरी सहकारी पतसंस्था, जुन्नर या तीनही संस्थांच्या संदर्भात चौकशी चालू आहे, विचाराधीन आहे असे उत्तर दिलेले आहे. शिवनेर पतसंस्थेच्या बाबतीत 2010 पासून चौकशी चालू असल्याचे उत्तर गेल्या एप्रिल महिन्यापासून देण्यात येत आहे. 2007 पासून त्या ठिकाणी आपल्याला त्रुटी आढळून आलेल्या आहेत. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात सुध्दा 2005 ते 2011 च्या दरम्यान सहा वर्षे हा सगळा अपहार झालेला होता. तापी पतसंस्थेच्या संदर्भात देखील 2007 पासूनचे दोन तीन वर्षाचे रेकॉर्ड आपल्या समोर आहे. यामध्ये आलेले सगळे लेखा परीक्षण अहवाल तपासून त्यामध्ये ज्या त्रुटी असतील किंवा जी दिरंगाई झालेली आहे त्या बाबतीत कारवाई करण्याची जबाबदारी सहकार आयुक्तांकडे असते. त्या संदर्भात कारवाई करण्याच्या बाबतीत त्यांनी पूर्वी काय पावले उचलली होती ? आंदोलनानंतर आणि सगळे बुडाल्यानंतर कारवाई सुरु झालेली आहे. त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या बाबतीत काय चौकशी केली ? वेळोवेळी त्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई झाली त्याबद्दल निवेदनामध्ये काहीही माहिती दिलेली नाही. दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली ? पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत जे आरोपी आहेत त्यांच्या बाबतीत अजून सुध्दा चार्जशीट दाखल झालेली नाही. शिवनेरच्या संदर्भात सगळे जामिनावर सुटलेले आहेत. कायदेशीररित्या या लोकांना लवकरात लवकर अटक करावयास पाहिजे. काही लोक प्रत्यक्षात फरार आहेत आणि क्रेडीट कार्डावर व्यवहार करीत आहेत. अशा वेळी त्यांना ताबडतोब अटक करणे आणि कायदेशीर करणे ही कारवाई शासन कधीपर्यंत करणार आहे ? या तीनही पतसंस्थांच्या संदर्भात माझा प्रश्न आहे. तसेच सहकार विभागाकडून आयुक्त स्तरावर तसेच विभागाच्या स्तरावर वेळोवेळी जी दिरंगाई झाली त्या बाबतीत शासनाने काय कारवाई केलेली आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आयुक्त कार्यालयाकडून आणि सहकार विभागाच्या अधिकारी स्तरावरुन जी दिरंगाई झालेली आहे त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ MMP/

श्री. प्रकाश सोळंके .....

विचारलेला आहे. यामध्ये एक गोष्ट मला आपल्या लक्षात आणून द्यावयाची आहे की, पतसंस्था असतील किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक असेल, वैद्यनाथन समितीच्या शिफारशी आपण स्वीकारल्यानंतर जे मेमोरंडम ऑफ अंडरस्टॅण्डींग केले त्याप्रमाणे आता या सगळ्या संस्थांचे लेखा परीक्षण चार्टर्ड अकाऊंटंट यांच्या माध्यमातून केले जाते. या संस्थांच्या बाबतीत शासनाच्या असे निदर्शनास आले की, या लेखा परीक्षणाच्या माध्यमातून अतिशय चांगले रिपोर्ट या सर्व संस्थांना मिळालेले आहेत. त्यामुळे जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या किंवा आयुक्तांच्या वगैरे जेव्हा लक्षात आले किंवा सहकार विभागाच्या अधिकाऱ्याच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी चाचणी लेखा परीक्षण पुन्हा करुन घेतले. ते लेखा परीक्षण केल्यानंतर त्यामध्ये झालेले गैरव्यवहार उघडकीस आलेले आहेत. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी ज्या तीन संस्थांचा उल्लेख केलेला आहे त्यामध्ये गुन्हे नोंद करण्याचे काम केलेले आहे. काही आरोपींना अटक झालेली आहे. काही आरोपींना जामीन असल्यामुळे अटक होऊ शकलेली नाही. काही लोक मयत झालेले आहेत. सोमश्वर विविध कार्यकारी संस्थेच्या संदर्भातील काही कर्जदार असे आहेत की, ते अस्तित्वातच नाहीत. म्हणजे व्यक्ती अस्तित्वात नाही, सातबारा अस्तित्वात नाही, कलम 8(अ) ची माहिती अस्तित्वात नाही आणि सगळी कागदपत्रे बनावट आहेत त्यामुळे त्याचाही तपास अद्यापपर्यंत होऊ शकलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.: माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेतील शुल्काची रक्कम न मिळणे

मु.शी. : माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेतील शुल्काची रक्कम न मिळणे याबाबत सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना वितरित केलेल्या निवेदनात दुरुस्ती करावयाची आहे काय ?

प्रा.फौजिया खान : नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, नियम 93 अन्वयेच्या सूचनेत मुख्य तक्रार अशी होती की, उच्च शिक्षणाच्या बाबतीत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फी माफी मिळाली पाहिजे ती मिळत नाही. या निवेदनात या संदर्भात एकही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे नमूद केलेले आहे. यासंबंधी अनेक तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्या शालेय शिक्षण खात्याकडे पोहोचल्या नसतील. मी या तक्रारींची स्वत: दखल घेतली होती. या तक्रारी मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांकडे पाठवितो. या संबंधी माझे तीन प्रश्न आहेत. फ्री सीटचे पैसे दिले जातात किंवा ज्यांना शिष्यवृत्ती दिली जाते ती पेमेण्ट सीटला दिली जात नाही. हे पैसे पेमेण्ट सीटच्या मुलांना किमान फ्री सीट इतके पैसे किंवा जेवढी रक्कम अनुज्ञेय आहे तेवढी रक्कम दिली जाणार आहे काय, फ्री सीटच्या बाबतीत ज्या तक्रारी करण्यात आल्या आहेत त्यांचा आढावा घेतला जाणार आहे काय, त्यांच्या कारणांचा शोध घेतला जाणार आहे काय, केंद्र सरकारची योजना आपल्याकडे आलेली आहे. ज्यांना इतर कोणतीही शिष्यवृत्ती किंवा मदत मिळत नाही. अशांना 15 हजार रुपये मिळणार आहेत. त्याचा राज्याने फायदा उचलला पाहिजे. कारण भारत सरकारचा तो पैसा आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या योजनेला ठळक प्रसिध्दी दिली जात नाही, वर्तमानपत्रात अगदी छोटीशी जाहिरात दिली जाते. शाळांना हे कळविण्याची शिक्षणाधिका-यांची जबाबदारी आहे. परंतु त्यांना कळविले जात नाही. या योजनेची शेवटची तारीख 15 ऑगस्ट आहे. याची पहिली तारीख मे महिन्यातील होती. त्यावेळी राज्यात शाळांना सुट्टी असते. त्यावेळी शिक्षणाधिका-यांना असे वाटते की, शाळा बंद आहेत, त्यामुळे ते काही करीत नाही. केंद्र सरकारच्या योजनेची मुदत 15 ऑगस्टला संपणार आहे. पेमेण्ट सीट असली तरी फ्री सीट एवढी रक्कम दिली जाईल काय, सर्व तक्रारींची चौकशी केली जाईल काय आणि केंद्र सरकारच्या योजनेसाठी मुदत वाढवून घेतली जाईल काय ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

प्रा.फौजिया खान : या प्रश्नाचे तीन भाग आहेत. यातील पहिला भाग असा आहे की, फीची शालेय स्तरावर प्रतिपूर्ती केली जाते. उच्च व तंत्र शिक्षण अंतर्गत वैद्यकीय, इंजिनिअरिंग व व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या पाल्यांच्या बाबतीत आणि केंद्र शासनाच्या योजनेबाबत दुसरा प्रश्न विचारलेला आहे. आज दहावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जात आहे, त्यामुळे तो प्रश्न मिटलेला आहे. तिसरा प्रश्न व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फीच्या प्रतिपूर्तीसंबंधीचा आहे. शैक्षणिक शुल्क सवलत योजनेचा आढावा घेण्याचे प्रस्तावित आहे. त्या योजनेचा आढावा घेतला जाणार आहे. केंद्र शासनाच्या योजनेच्या संदर्भातील 2005 पासूनची माझ्याकडे आकडेवारी आहे. त्यावेळी जेवढे अर्ज येत होते त्यापेक्षा यावर्षी अधिक अर्ज आलेले आहेत. त्यामुळे या योजनेसाठी तारीख वाढवून घेण्याचा प्रश्न येत नाही. केंद्र शासनाच्या या योजनेची मुदत 31 ऑगस्टला संपणार आहे. परंतु शासनाने 15 ऑगस्ट ही शेवटची तारीख ठरविलेली आहे. कारण अर्जांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांचे विश्लेषण करण्यासाठी विभागाला 15 दिवसांचा कालावधी लागणार आहे. या योजनेसाठी योग्य त्या प्रमाणात अर्ज प्राप्त झालेले आहेत.

4....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :कलीना, सांताक्रुझ,पूर्व येथे राज गॅलेक्सी नावाचे अनधिकृत निवासी संकुल उभे करणे

मु.शी. : कलीना, सांताक्रुझ,पूर्व येथे राज गॅलेक्सी नावाचे अनधिकृत निवासी संकुल उभे करणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 8 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनात असे नमूद केले आहे की, मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सि.एस.टी.रोड, कलीना, सांताक्रुझ, पूर्व मुंबई येथील सि.टी.एस.नंबर 6757, 6892, 6894, 6917 बी, 6918, 6933, 6922, 6928, 6937बी, 6938, सर्व्हे नंबर 158 हिस्सा नंबर 20 (पी.) या मिळकतीपैकी, सि.टी.एस.नंबर 6933 व 6937 (मौजे कोलेकल्याण) या भूखंडावर मे.पटेल एण्टरप्रायझेस तसेच न.भू.क्र.6928 (मौजे कोलेकल्याण) या भूखंडावर श्री.आर.सी.अगरवाल व इतर यांच्या नावे निवासी इमारतींना परवानगी देण्यात आलेली असून उर्वरित न.भू.क्रमांकावर कोणतेही इमारत प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले नाहीत." या जागेचा जो मूळ मालक आहे त्यांनी माझ्याकडे तीन वेळा तक्रार केलेली आहे. या भूखंडाची खरेदी-विक्री झालेली नाही. रेकॉर्डवर जी खरेदी-विक्री दाखविली आहे ती बोगस आहे. या व्यवहाराची मूळ मालकाला काहीच माहिती नाही. "विकासकाने नोंदणीच्या बाबतीत मुंबई महानगरपालिका, महसूल विभाग व सहकार विभाग यांची फसवणूक केली असल्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी व विकासकावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा नोंदवावा" अशा स्वरुपाचे मी महसूल व वन विभागाच्या प्रधान सचिवांकडे पत्र दिलेले होते. परंतु या व्यवहाराची नोंदणी योग्य झालेली आहे असे निवेदनात म्हटलेले आहे. या भूखंडाच्या मूळ मालकाला माहिती नसताना परस्पर खरेदी-विक्री करण्यात आली आहे. त्या जागेवर राज गॅलेक्सी नावाचे संकुल या लोकांनी उभे केले आहे त्याची संपूर्ण चौकशी शासनाकडून केली जाणार आहे काय, ज्यांनी कोणी हे कारस्थान केले असेल त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करुन हे सर्व काम थांबविले जाणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी लेखी निवेदनात स्पष्ट उत्तर दिलेले आहे. परंतु त्या व्यतिरिक्त सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे आहे. त्यामध्ये थोडीशी विसंगती दिसून येते. म्हणून त्यांनी मला स्पेसिफिक पत्र द्यावे. त्यानुसार संपूर्ण चौकशी केली जाईल. त्यांनी सांगितल्या प्रमाणे चौकशी करुन त्यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : सभागृहात दर शुक्रवारी औचित्याचे मुद्दे घेण्यात येतात. परंतु आज अपवाद म्हणून औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. स्वारगेट चौक हा बेंगलोर हायवेवरुन पुणे शहरात प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे. त्या ठिकाणी परिवहन महामंडळाचे बस स्टॅण्ड आहे. तसेच स्वारगेट चौकात पीएमटीच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे मुख्य स्थानक सुध्दा आहे. त्या ठिकाणी वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. ती दूर करण्यासाठी एमएसआरडीसीने स्वारगेट चौक ते मार्केट यार्ड पर्यंतच्या उड्डाण पुलाला मान्यता दिली होती. त्या उड्डाण पुलाचा एकूण खर्च 110 कोटी रुपये होता. त्यापैकी 60 कोटी रुपये महानगरपालिकेने अनामत रक्कम म्हणून भरले आहेत. त्यानंतर अनेक वेळा बैठका झाल्या आहेत. परंतु पुढे काहीही प्रगती होऊ शकली नाही. गेल्या वर्षी या खात्याचे माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर यांच्या दालनात बैठक झाली होती. त्या बैठकीला महानगरपालिकेचे व एमएसआरडीसीचे अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी एक कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला होता. तसेच नोव्हेंबर, 2010 मध्ये या पुलाचे भूमिपूजन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. आता नोव्हेंबर, 2010 ही मुदत संपून गेलेली आहे. त्या चौकात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे एमएसआरडीसीमार्फत या कामाला केव्हा सुरुवात करणार आहे याबाबतचे निवेदन हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज ठाणे शहरामध्ये एक अत्यंत दुर्दैवी व क्लेशदायक घटना घडलेली आहे. विद्यार्थी रिक्षाने शाळेत जात असताना टँकर आडवा आला त्यामुळे कु.वैभव रामकृष्ण, सरस्वती न्यू इंग्लीश स्कूलच्या विद्यार्थ्याचा जागच्या जागीच मृत्यू झाला आहे. रिक्षाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी प्रवास करीत होते. परंतु टँकर आडवा आल्यामुळे रिक्षा चालकाने ब्रेक दाबला व त्यात या विद्यार्थ्याचा जागच्या जागी मृत्यू झाला आहे. तसेच दोन विद्यार्थी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अशा प्रकारच्या घटना गेल्या वर्षभरात अनेक वेळा झालेल्या आहेत. मी वैयक्तिक स्तरावरुन परिवहन विभागाकडे, पोलिसांकडे पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केलेला आहे. मधल्या काळात एक बैठक सुध्दा झाली होती. त्या भागात वाढते नागरीकरण लक्षात घेता व वाहतुकीच्या नियमनाच्या बाबतीत खूप तक्रारी आलेल्या आहेत. या निमित्ताने मी ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे. त्यावर शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की राज्यामध्ये कायम विना अनुदानाच्या 8644 तुकडयांना मान्यता दिलेली आहे. त्या तुकडया 10 वर्षे चालू आहेत. या तुकड्यांचा "कायम" हा शब्द न काढल्यामुळे आज शाळाबंद आंदोलन करुन आझाद मैदान येथे उपोषण सुरु करण्यात आलेले आहे. तेव्हा या प्रश्नामध्ये लक्ष घालावे अशी मी शासनाला विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"आज जैतापूर प्रकल्पाच्या विरोधात कोकणातील 2000 लोक दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर उपोषणाला बसलेले आहेत. माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये हजर नाहीत. या जैतापूर प्रकल्पाच्या माध्यमातून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम चालू आहे. जैतापूर येथे 150 पोलिसांचा बंदोबस्त लावून कंपाऊंड वॉल बांधण्याचे काम चालू आहे. या प्रकल्पाला शेतक-यांनी जमिनी दिलेल्या नाहीत. पोलिसांच्या दंडुकेशाहीने जमिनी घेतल्या जात आहेत. या प्रकल्पामुळे कोकण संपूर्णपणे बेचिराख आणि उद्ध्वस्त होणार आहे. आज या प्रकल्पाच्या विरोधात दिल्ली येथील जंतरमंतर मैदानामध्ये कोकणातील 2000 लोक उपोषणाला बसलेले आहेत. भविष्यामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्र रस्त्यावर येऊ शकेल याची गांभीर्याने नोंद शासनाने घ्यावी. जैतापूर प्रकल्प हा विनाशकारी आहे. संपूर्ण महाराष्ट्राला उद्ध्वस्त करणारा आहे. हा प्रकल्प रद्द करावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे."

श्री. दिवाकर रावते : महाराष्ट्रातील लोक जंतरमंतर मैदानावर उपोषणाला बसलेले आहेत. सर्व खासदार त्या ठिकाणी उपोषणाला बसलेले आहेत. तेव्हा या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना तातडीने या सभागृहामध्ये बोलावून शासनाची भूमिका स्पष्ट करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : सभागृहामध्ये सामाजिक न्याय विभागाचे मंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांच्या कानी ही बाब घालावी अशा सूचना मी देत आहे.

श्री. रामदास कदम : या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलवावे अशी आमची विनंती आहे.

सभापती : मी या संदर्भात सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांना या सभागृहाच्या भावना सांगितलेल्या आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"गेल्यावर्षी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये लेप्टोस्पायरोसिस रोगाची लागण झाल्यामुळे 26 लोकांचा मृत्यू झालेला होता. या वर्षी देखील या लेप्टोस्पायरोसिस रोगाची साथ येण्याचा संभव निर्माण झालेला आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन लेप्टोस्पायरोसिसमुळे एकही बळी जाणार नाही अशा प्रकारचे नियोजन करावे, जेथे डॉक्टर नाहीत त्याठिकाणी डॉक्टर उपलब्ध करुन द्यावेत अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"60 हजार टन कोळसा आणि इंधन तेल घेऊन एक जहाज मुंबईच्या समुद्र किनारी बुडालेले आहे.त्यामुळे समुद्रामध्ये तेलाचा तवंग पसरलेला आहे. हा काळ माशांच्या प्रजननाचा आहे. या तेलाच्या तवंगामुळे समुद्राचे पाणी दूषित झालेले आहे. त्यामुळे मासेमारीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होणार आहे. तेव्हा याबाबतीत कोळी बांधवांना नुकसान भरपाई मिळावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे."

डॉ. नीलम गो-हे : काल या विषयाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली होती. मच्छीमारांचे नेते सांगतात की माशांच्या उत्पादनावर परिणाम होणार नाही. या बाबतीत अजून शासनाने निवेदन केलेले नाही.

सभापती : या विषया संबंधी मी निवेदन करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्या प्रमाणे शासना कडून निवेदन करण्यात येईल.

--

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"विधिमंडळाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विधानमंडळ सचिवालयाने सर्व सन्माननीय सदस्यांसाठी चांगले आणि आकर्षक असे अमृतमहोत्सवी वर्षाचे एम्ब्लेम असलेली लेटरपॅड छापलेली आहेत. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना ती लेटरपॅड घ्यावीशी वाटतात, त्यावर लिहावेसे वाटते. परंतु एका कागदाची किंमत साधारणत: 2 रुपये आहे. याबाबतीत थोडासा फेर विचार करावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपणास विनंती करीत आहे."

सभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"जळगाव जिल्ह्यातील भुसावळ नगरपालिकेमध्ये भरपूर अनियमितता झालेल्या आहेत. एका घमेली उचलणा-या माणसाला चीफ इंजिनिअर केलेले आहे. "आदर्श" घोटाळा झाला. त्या बाबतीत शासनाने काही लोकांना सस्पेण्ड केलेले असून चौकशी चालू आहे. भुसावळ नगरपालिका क्षेत्रामध्ये बेकायदेशीर कन्स्ट्रक्शन चालू आहे, फाईल्स गायब झालेल्या आहेत. याबाबतीत शासनाने लक्ष द्यावे अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो."

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"परळी वैजनाथ हे 1130 मेगावॉट वीज निर्मिती करणारे केन्द्र आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून परळी येथील सर्व संच पूर्ण क्षमतेने काम करीत नाहीत. या वीज केन्द्रातून 1200 मेगावॉट वीज निर्मिती होणे आवश्यक होते. परंतु 450 ते 500 मेगावॉट एवढीच वीज निर्माण होत आहे. ओला कोळसा येत असल्यामुळे तो जाळण्यासाठी करोडो रुपयाचे तेल लागत आहे. त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या वीज केन्द्रातून पूर्ण क्षमतेने वीज निर्माण होत नसल्यामुळे महाराष्ट्रातील लोडशेडिंगचे प्रमाण वाढलेले आहे. या अतिशय महत्वाच्या, निकडीच्या आणि सार्वजनिक महत्वाच्या बाबीची शासनाने नोंद घेऊन निवेदन करावे यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"26/11च्या मुंबई हल्ल्यानंतर सागरी सुरक्षा मजबूत करण्याची मोठी जबाबदारी आहे. एमटी पवित हे प्रचंड जहाज मुंबई किना-यावर धडकले. दुर्दैवाने भारतीय नौदल, कोस्टगार्ड, मुंबई पोर्टट्रस्ट आणि मुंबई पोलीस यापैकी कोणत्याही यंत्रणेला या जहाजाचा पत्ता नव्हता. विशेष म्हणजे 990 टन वजनाचे जहाज ओमान जवळील समुद्रातून भरकटत आले. जहाजावर कुणीही खलाशी नव्हते. सर्व यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव या घटनेमुळे समोर आला. जशी एअर ट्राफिक कंट्रोलची सिस्टिम असते त्याप्रमाणे नेव्हलची सुध्दा व्हेईकल मॅनेजमेण्ट सिस्टिम असते. मुंबई किना-यासाठी आवश्यक अशी नेव्हल रडार सिस्टिम नाही. राज्याच्या गृह खात्याने लवकरात लवकर यंत्रणा सुसज्ज कराव्यात अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे."

सभापती : विधानमंडळ सचिवालयाच्या अधिका-यांना मी सूचित करतो की, या ठिकाणी जे औचित्याचे मुद्दे सन्माननीय सदस्यांनी मांडलेले आहेत ते त्या त्या विभागाला कळविण्याची काळजी घ्यावी आणि या औचित्याच्या मुद्यांची उत्तरे सन्माननीय सदस्यांना लवकरात लवकर कशी मिळतील हे पहावे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"1मुंबईतील रस्त्यांची झालेली दुरवस्था, विशेषत: पश्चिम उपनगरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडून वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, काही ठिकाणी रस्ता उंच असणे तर काही ठिकाणी खोलगट भाग असणे, त्यामुळे गाड्या पाहिजे त्या गतीने जाण्यात होत असलेला विलंब,

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

त्याचप्रमाणे रस्त्यावरील सिग्नल्स जवळजवळ असल्याने सिग्नलजवळ वाहनांच्या लागत असलेल्या रांगा, सिग्नल्सच्या योग्य वापरासाठी आधुनिक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून सुधारणा करण्याची आवश्यकता, रस्त्याच्या दुरुस्तीबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची उदासीनता, रस्ते त्वरित दुरुस्त करण्याबद्दल व सिग्नल यंत्रणा दुरुस्त करण्यासाठी शासनाने केलेली व तातडीने करावयाची आवश्यकता असा मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, आम्ही आमच्या भाषणातून सभागृहात जे मुद्दे मांडतो त्याची अधिकारीवर्गाकडून साधी दखल घेतली जात नाही किंवा काय अडचणी आहेत या संदर्भात विचारपूस केली जात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजाबाबत

सभापती : आज सकाळी सभागृहाच्या विशेष बैठकीमध्ये नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्यात आलेली आहे. ही चर्चा अपूर्ण असून दोन-तीन माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत व त्या नंतर मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्येचा विषय हा अत्यंत संवेदनशील आहे. सकाळी काही अंशी चर्चा झालेली असली तरी अनेक माननीय सदस्यांना या प्रस्तावावर त्यांचे विचार मांडावयाचे आहेत. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या ऑन लेग आहेत. माननीय महिला सदस्यांना त्यांचे विचार मांडण्याची संधी मिळालीच पाहिजे. परंतु आम्हाला देखील संधी मिळावी, ही विनंती आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्येच्या विषयावर आपले विचार मांडण्यासाठी दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांना संधी देण्यात आली आहे. परंतु हा विषय व्यापक असल्यामुळे ज्यांना ज्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत त्यांना बोलण्याची संधी मिळावी यासाठी अधिक वेळ उपलब्ध करुन द्यावा, अशी विनम्र विनंती आहे.

सभापती : नियम समितीमध्ये सभागृहाच्या कामकाजाच्या वेळेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्यासमवेत व कामकाज सल्लागार समितीमध्ये देखील तो निर्णय नक्की करण्यात आला आहे. स्त्रीभ्रूण हत्येचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. जे मत माननीय सदस्यांचे आहे तेच माझे आणि आपणा सगळ्यांचे देखील आहे. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावरील चर्चा अडीच तासात संपवावयाची अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे. परंतु स्त्रीभ्रूण हत्येचा विषय संवेदनशील असल्यामुळे अडीच तासाऐवजी तीन तासात ही चर्चा पूर्ण करु. भाषण करण्याबाबत वेळेची मर्यादा ठेवली पाहिजे. प्रत्येक माननीय सदस्यांना पाच-पाच मिनिटे बोलण्यासाठी वेळ दिला तर किमान 5-6 माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : या प्रस्तावावर विशेष बैठकीमध्ये दीड तास चर्चा झालेली आहे. उर्वरित दीड तासाच्या वेळेत मंत्रीमहोदयांचे उत्तर देखील होणार असल्यामुळे माननीय सदस्यांना विचार मांडण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होणार नाही. कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये आणखी एक प्रस्ताव आहे. त्या संदर्भात वेळेचे नियोजन कसे केले जाणार आहे?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : एकूण 100 मिनिटांचा वेळ आपल्याला उपलब्ध होणार आहे. 1.30 वाजता बैठक मध्यंतरासाठी स्थगित होऊन दुपारी 2.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा सुरु होईल. तीन लक्षवेधी सूचनांपैकी एक लक्षवेधी सूचना आज चर्चेला घेतली जाणार नाही.

श्री.शिवाजीराव मोघे : तिसऱ्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना आजच घेण्यात यावी.

सभापती : ठीक आहे. आता सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. दरम्यानच्या काळात माझ्या दालनात माननीय विरोधी पक्षनेते, माननीय गटनेते यांच्याशी पुढील कामकाजासंबंधी चर्चा करण्यात येईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

<u>मावळ तालुक्यातील शेतक-यांवर झालेल्या गोळीबाराबाबत</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मावळ तालुक्यात पवना धरण असून या धरणातील पाणी दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न शासनातर्फे सुरु असल्यामुळे त्या विरोधात तेथील शेतक-यांनी आज रास्ता रोको केला होता. शांतता मार्गाने रास्ता रोको करीत असलेल्या शेतक-यांचे आंदोलन दाबून टाकण्यासाठी, चिरडून टाकण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केला. आपले पाणी वाचवण्यासाठी शेतकरी रस्त्यावर आले असतांना हे सरकार शेतक-यांवर गोळया चालवित आहे. यामध्ये दोन शेतकरी ठार झाले असून 16 शेतकरी जखमी झाले असून त्यामध्ये एक महिला सुध्दा जखमी झालेली आहे. अशा परिस्थितीत सरकार शेतक-यांचा आवाज बंद करणार असेल तर या राज्यामध्ये आम्ही हे चालू देणार नाही. आमच्या धरणातील पाणी तुम्ही पळवू नका अशी सर्वपक्षीय कृती समितीची मागणी होती. धरणासाठी त्या भागातील शेतक-यांनी आपल्या जमिनी दिल्यामुळे हे शेतकरी निर्वासित झाले असून या शेतक-यांचे पुनर्वसन चांगल्या पध्दतीने झालेले नाही. या ठिकाणी धरण बांधून पाणी साठवले गेले असतांना त्यांच्या पाण्यावर डल्ला मारला जात असल्यामुळे तेथील शेतक-यांनी विरोध केला होता. त्यामुळे या विषयावर ताबडतोब चर्चा झाली पाहिजे. या घटनेच्या संदर्भातील सत्य परिस्थिती गृहमंत्र्यांनी सदनाला देण्याची आवश्यकता आहे. शेतक-यांवर झालेल्या गोळीबाराची माहिती आम्हाला मिळत नाही तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. त्यामुळे या घटनेच्या संदर्भात आमची आपल्याला विनंती आहे की, शेतक-यांवर गोळीबार झालेला असल्यामुळे आज सभागृहापुढील कोणतेही कामकाज घेऊ नये. या घटनेच्या संदर्भातील निवेदन गृहमंत्र्यांनी ताबडतोब करण्याची आवश्यकता आहे.

श्री. दिवाकर रावते : विधी मंडळाचे अधिवेशन सुरु असतांना लोकांवर आंदोलन करण्याची वेळ येते यावरुन सरकार कशा पध्दतीने कामकाज करीत आहे हे दिसून येते. हे सरकार निर्घृणपणे जनतेच्या हक्कावर घाला घालीत आहे. याचा परिणाम म्हणून स्वपक्षीय कृती समितीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

पवना धरणातील पाणी पळवण्याच्या निषेधार्थ हायवेवर रास्ता रोको केला होता. पवना भागातील शेतकरी या ठिकाणी अजून सुध्दा जमा झालेले आहेत. आताच माझ्या मुलाने मला फोनवरुन सांगितले की, "या ठिकाणी अजूनही गोळीबार सुरु असून मी गाडी सोडून आलो असून माझ्या समोरच्या गाडीतील ड्रायव्हरला गोळी लागल्यामुळे तो मृत झालेला आहे. या क्षणाला सुध्दा गोळीबार सुरु असून पाच-पाच किमी. लांबीच्या लांबच लांब रांगा हायवेवर लागलेल्या आहेत".

सभापती महोदय, या ठिकाणची परिस्थिती अजूनही गंभीर आहे. आमचे दुर्दैव असे आहे की, आम्ही आजच शेतक-यांच्या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात चर्चा करणार होतो. जर शेतक-यांवर अशा परिस्थितीमध्ये गोळीबार होत असेल, आपल्या हक्काच्या पाण्याकरिता शेतकरी मृत्यूला सामोरे जात असतील आणि अधिवेशनात आम्ही काम करावे अशी जर आपली अपेक्षा असेल तर ती दुर्दैवी ठरेल असे मला वाटते. आज आम्ही कोणतेही कामकाज करण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही. आता सुध्दा हायवेवर गंभीर परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या शेतीचे पाणी पळविण्याच्या संदर्भात त्या ठिकाणी गंभीर लढा निर्माण झालेला आहे. शेतक-यांच्या रास्ता रोको आंदोलनाला आता एक वेगळेच वळण लागलेले आहे. त्यामुळे मी आपल्याला विनंती करतो की, शेतक-यांवर झ ालेल्या गोळीबाराच्या संदर्भात आमच्या भावना अत्यंत प्रक्षुब्ध आहेत. अधिवेशन सुरु असतांना आपल्या राज्यातील शेतक-यांना मृत्यूला सामोरे जावे लागत असल्यामुळे आम्ही आज कामकाज करण्याच्या मन:स्थितीमध्ये नसल्यामुळे गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या शेतक-यांच्या संदर्भात आमच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. आमच्या भावना या आंदोलकांच्या भावना आहेत असे समजून सभागृहाचे आजचे कामकाज तातडीने तहकूब करावे अशी विनंती मी आपल्याला करीत आहे त्यामुळे यासंदर्भात आपण योग्य तो निर्णय त्वरित घ्यावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पवना येथील शेतक-यांच्या रास्ता रोकोंवर पोलिसांनी जो गोळीबार केलेला आहे त्यासंदर्भात विचार मांडलेले आहेत. या ठिकाणच्या ग्रामस्थांची मागणी अत्यंत साधी आहे. आमच्या येथे धरण असून आमच्या धरणातील पाणी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत घेऊन जाणार, हे पाणी नेत असतांना वाटेमध्ये 18 गावे येतात, आम्हाला पाणी मिळत नाही, आमच्या गावाला पाणी मिळत नाही त्यामुळे त्यातील पाणी आम्हाला देण्यात यावे एवढी साधी मागणी 18 गावातील शेतकरी वर्षानुवर्षा पासून करीत आहेत. परंतु हे शासन या मागणी पूर्ण करण्यासाठी काहीच करीत नाही. काल नागपूरच्या प्रकरणाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले होते की, पोलिसांनी आंदोलकांना शांतपणे विनंती केली, अमुक केले, तमुक केले. वारक-यांच्या संदर्भात जेव्हा अशी घटना घडली होती तेव्हा सुध्दा असेच उत्तर शासनाकडून देण्यात आले होते. खालच्या अधिका-यांना पाठीशी घातले जात असल्यामुळे खालच्या अधिका-यांचा मस्तवालपणा यामुळे वाढत चालला आहे. या शासनाकडून माणसे मारल्याचे समर्थनही केले जाते. शेतक-यांवर गोळया घातल्या जात असतांना आम्ही सभागृहाचे कामकाज करणे हे आम्हाला शोभादायक वाटत नाही. खरे म्हणजे आजच्या घटनेच्या संदर्भात गृहमंत्र्यांनी सभागृहात माहिती द्यावयास पाहिजे होती परंतु तशा प्रकारची कोणतीही माहिती अद्यापपावेतो सदनाला देण्यात आलेली नाही. गृहखाते व सरकार अधिका-यांच्या चुकांवर पाघंरुण घालण्याचे काम करते व त्यामुळेच या अधिका-यांची हिंमत वाढते. या कारणामुळेच आज शेतक-यांवर गोळया झाडण्यात आलेल्या आहेत. आज शेतक-यांवर जो गोळीबार करण्यात आलेला आहे त्या घटनेचा खरे म्हणजे आपण सर्वांनी निषेधच केला पाहिजे व त्यासाठीच सभागृहाचे कामकाज थांबवण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. पवना धरणाच्या परिसरातील शेतक-यांना या धरणाचे पाणी मिळावे यासाठी तेथील शेतकरी उपोषणाला बसले होते. आम्हाला आमच्या हक्काचे पाणी मिळाले पाहिजे अशी त्या परिसरातील शेतक-यांची मागणी आहे. पवना धरणासाठी आम्ही जमिनी दिल्या, आमच्या डोळयासमोर आमचे पाणी दुसरीकडे जात असतांना आम्हाला पाणी दिले जात नाही त्यामुळे आम्हाला पाणी दिले जावे अशी सातत्याने मागणी करुनही या ठिकाणच्या शेतक-यांना पाणी दिले जात नाही. खरे तर या शेतक-यांना पाण्याची मागणी करण्याची आवश्यकताच नव्हती. लोकशाहीचा व शेतक-यांचा गळा

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.रामदास कदम ....

घोटून त्यांच्या हक्काचे पाणी पळवले जात आहे. म्हणजे "जिसके हाथ में लाठी, उसकी भैस." या राज्यात लोकशाही नाही तर केवळ हुकुमशाही सुरु आहे. जैतापूरला सुध्दा हुकुमशाही सुरु आहे. जैतापूर येथील शेतक-यांची हक्काची जमीन हुकुमशाही पध्दतीने घेतली जात आहे. आमची जमीन ही आमची आई समान असल्यामुळे आम्ही जमिनी देणार नाही असे शेतकरी सांगत असतांना सुध्दा जैतापूर येथील शेतक-यांच्या जमिनी शासन बळजबरीने, जबरदस्तीने घेत आहे. जैतापूर येथील शेतक-यांनी जमिनी दिल्या नाहीत म्हणून पोलीस त्यांच्यावर गोळया घालत आहेत. हे सरकार फक्त शेतक-यांवर गोळया घालण्याचेच काम करीत आहे. शेवटी सहनशीलतेला काही तरी मर्यादा असतात. सभागृह सुरु असतांना शेतक-यांवर गोळया घातल्या जात आहेत. आम्ही विधिमंडळाला लोकशाहीचे मंदिर मानतो परंतु हे सरकार सभागृहाच्या बाहेर लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम करीत आहे. अशा परिस्थितीत आम्हाला न्याय कोण देणार आहे ?

सभापती महोदय, आपण न्यायासनावर बसलेला आहात. मघाशी मी औचित्याच्या द्वारे मुद्दा काढला होता व त्यामध्ये जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात कोकणातील 2000 लोक दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर उपोषण करीत आहेत असे सांगितले होते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

हे शासन काय करीत आहे ? आपण शेतकऱ्याला राजा मानतो. परंतु राजा आता तमाशात आणि नाटकात शिल्लक राहिलेला आहे.शेतकऱ्यांना संपविण्याचे काम सरकारकडून होत आहे. सभागृहाचे कामकाज सुरु असताना बाहेर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांकडून गोळीबार करण्यात येत आहे अशा वेळेला आम्ही सभागृहात काय बोलायचे, कसली चर्चा करायची ? तेव्हा माझी मागणी आहे की, आजच्या दिवसाचे कामकाज येथेच थांबवावे. जी घटना घडली आहे त्याबाबत माहिती घेऊन नंतर चर्चा करावी अशी माझी विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शरमेने मान खाली घालावी अशी घटना घडलेली आहे...

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रातिनिधीक स्वरुपात दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी आपली मते मांडलेली आहेत. आपण सर्व जण माझ्याकडे सभागृह तहकूब करा अशी मागणी करीत आहात आणि या विषयावर सर्व सन्माननीय सदस्य बोलण्याची परवानगी मागू लागले तर आपली मागणी पूर्ण करणे मला शक्य होणार नाही. या विषयावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांना मी बोलण्याची संधी देईन. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी देखील बोलण्यासाठी हात वर केलेला आहे मी त्यांना बोलण्याची संधी देतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आमच्या नेते मंडळींनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो वस्तुस्थितीला धरुन आहे. मला त्यामध्ये छोटीशी माहिती समाविष्ट करायची आहे. कारण मी पुणे जिल्ह्यात काम करते. मी बहुर येथे स्वत: जाऊन आली आहे. बंद वाहिनीमधून पिंपरी-चिंचवडसाठी पाणी नेऊ नये म्हणून पवना नगरमधील शेतकरी आंदोलन करीत आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, रावेतपाशी पवना नदीतून पिंपरी-चिंचवडसाठी पाणी उचलावे. पिंपरी-चिंचवड रहिवाशांना पाणी मिळू नये अशी त्यांची भूमिका नसून पवना धरणातील पाणी साठा कमी होऊ नये म्हणून पवना नदीतून पाणी उचलावे अशी मागणी निदर्शक करीत आहेत. रेकॉर्डवर निदर्शकांच्या दृष्टीने योग्य माहिती समोर यावी म्हणून मी हे सांगत आहे. बहुर गावाजवळ जो गोळीबार झालेला आहे त्यामध्ये दोन शेतकरी दगावले आहेत. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. त्या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

अजूनही गोळीबार सुरु आहे. तेव्हा तेथील परिस्थितीची माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. आंदोलकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने आम्ही येथे बोलण्यासाठी उभे राहिलो आहोत. मी सभागृहाचा वेळ घेतला असेल तर मी दिलगिरी व्यक्त करते. एक संवदेशनशील व्यक्ती म्हणून अशा प्रसंगामध्ये बोलणे मला आवश्यक वाटते. माझ्याकडून काही चूक झाली असेल तर मी दिलगिरी व्यक्त करते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सभागृह तहकुबीची सूचना मांडलेली आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. घडलेली धटना अतिशय गंभीर आहे. सभागृह सुरु झाल्याबरोबर तहकुबीची सूचना मांडली पाहिजे असे नाही. तहकुबीची सूचना सभागृहात कोणत्याही वेळी मांडण्यात येते. तेव्हा माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा आग्रह योग्य आहे. अधिवेशन सुरु असताना शेतकऱ्यांवर गोळीबार झालेला आहे ही मोठी वेदनादायी आणि क्लेशदायी गोष्ट आहे. ही सभागृहासाठी देखील वेदनादायी गोष्ट आहे. तेव्हा या प्रश्नावर ताबडतोब चर्चा सुरु करावी. आता त्या ठिकाणी नेमकी काय परिस्थिती आहे याची माहिती शासनाने सभागृहाला दिली पाहिजे.

श्री एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, अभी यहां पर पॉईंट ऑफ इन्फर्मेशन का मुद्दा उठाया गया. हम लोग भी बाहर गए हुए थे. हमको भी एसएमएस के द्वारा जानकारी मिली कि पूना हाईवे पर फायरिंग हुई है. उसमें कुछ लोगों की मृत्यू हुई है. इस मुद्दे को उठाना इनका अधिकार है. हम भी इस सभागृह के सदस्य है. हमारी भी भावना उन लोगों के साथ है. जिन लोगों की हत्या हुई है उनके प्रति संवेदनाएं व्यक्त करता हूं.

सभापति महोदय, इस बारे में सभागृह के पटल पर तुरंत जानकारी रखनी चाहिए ताकि वहां पर क्या हुआ, इस बात की सही जानकारी मिल सके, तब तक सदन का काम चलना चाहिए.

उप सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याची मागणी केलेली आहे. मी सभागृहाला विचारु इच्छितो की, या घटने संदर्भातील निवेदन शासनाकडून आजच पाहिजे काय ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, शासन घडलेल्या घटनेची माहिती घेत आहे. सर्व वरिष्ठ अधिकारी घटना स्थळी गेलेले आहेत. तेव्हा या घटने संदर्भातील निवेदन करण्यासाठी आम्हाला एक-दोन तासांचा अवधी मिळावा अशी विनंती आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की त्यांनी कृपया शांत बसावे. माननीय मंत्री महोदय काय माहिती देत आहेत ते सन्माननीय सदस्यांनी कृपया ऐकून घ्यावे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भातील माहिती घेण्यासाठी त्यांना एक-दोन तासांचा वेळ द्यावा. काही तरी असत्य माहिती समोर येण्यापेक्षा माननीय मंत्री महोदय जी सत्य माहिती देत आहेत ती आपण ऐकून घ्यावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी अजून तणाव आहे. सर्व वरिष्ठ अधिकारी घटना स्थळी आहेत. आजूबाजूच्या परिसरातील वरिष्ठ अधिकारी देखील तेथे पोहोचले आहेत. डी.जी. आणि मी माहिती घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. सविस्तर माहिती मिळण्यासाठी आम्हाला दोन तासांचा अवधी द्यावा. त्या नंतर सभागृहाला विस्तृत निवेदन करण्यात येईल.

उप सभापती : या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि विरोधी पक्षातील सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. घडलेला प्रकार निश्चितपणे गंभीर आहे. त्या संदर्भात निवेदन होणे गरजेचे आहे. या घटनेच्या संदर्भात शासनाकडून दोन तासात निवेदन करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. परंतु घडलेली घटना आणि माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना लक्षात घेऊन मी सभागृहाची बैठक आता स्थगित करीत आहे.

सभा□हाची बैठ□ आता स्था□□ होऊन उद्या बुधवार, दिनां□ 10 ऑगस्ट, 2011 रोजी स□ळी 10.00 पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीमध्ये नियम 260 अन्वयेच्या स्त्रीभ्रूण हत्ये संदर्भातील प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता भरेल.

(सभा□हाची बैठ□ दुपारी 2 वाजू□ 17 मि□□टां□□, बुधवार, दि□□ 10 ऑगस्ट 2011 रोजीच्या स□ळी 10.00 वाजेपर्य□ स्था□□ झाली)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही